पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १४ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ मार्च २०२२

# महायुद्ध



पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १४ । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ मार्च २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बाराहपुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com
(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

• जाहिरात विभाग संपर्क
९८२११४४५४०९ / ८८०५१५१४५२

अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त

• द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** चोर, शिपाई आणि चिखलाच्याही देशा – ३ / **कव्हर स्टोरी :** जगभर पसरणार महायुद्धाच्या झळा – **विजय नाईक** ६ / डिजिटल भारत, की आभासी भारत! – **देवीदास तुळजापूरकर** १२ / महिलांना गरज आत्मसन्मानाची – **उत्तम कांबळे** १४ / बिनसुट्टीची एकमेव शाळा – **प्रकाश खंडेलोटे** १६ / विचारधारा : वाटा आणि वळणे – **दत्ता देसाई** – २० / **व्यक्तिविशेष –** महिला पत्रकारांचा आदर्श : कविता देवी – **प्रतिनिधी** २३ / **आज–कालचे प्रश्न –** पंक्चरवाला – २७ / **ग्रंथपरिचय :** लकवा भरलेल्या स्वातंत्र्याचा वेध – **रत्नकला बनसोड** २८ / स्वभाषांचा क्षय म्हणजे स्वसंस्कृती आणि कलांचाही क्षय – **डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी** ३० / बाबासाहेबांचे वैचारिक अनुबंध : श्रीधरपंत टिळक – **प्रा. डॉ. रोहिदास जाधव** ३२ / **कविता :** – **डी.के. शेख**, उस्मानाबाद / – **भीमराव धुळूबुळू, मिरज** / – **आबासाहेब पाटील**, मंगसुळी, जि. बेळगाव – ३८ / रेखाटने – **धनंजय गोवर्धने**

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# चोर-शिपाई आणि चिखलाच्याही देशा

महाराष्ट्रात गेल्या वर्षभरामध्ये सुरू असलेले भ्रष्टाचाराचे आरोप-प्रत्यारोप पाहता या प्रदेशात चोर-शिपायांची संख्या वाढली आहे आणि चिखलाचे साम्राज्यही सर्वत्र पसरले असल्याचे दिसते. स्वच्छतेबाबत अग्रेसर असलेल्या या महान प्रदेशात सर्वत्र चिखल, डबकी, डास, दुर्गंधी का पसरते आहे, असा सामान्य माणसाला प्रश्न पडावा. अर्थात, आतापर्यंत तरी आरोपांचे युद्ध आहे. विरोधकांनी एक आरोप केला तर सत्ताधाऱ्यांनी साडेतीन आरोप करावेत. मग विरोधकांनी सात करावेत, मग यांनी साडेसतरा करावेत. आरोपांचे ढग इतके वाढत गेले, की ते आजी-माजी मुख्यमंत्र्यांपासून, मंत्र्यांपासून, अधिकाऱ्यांपासून ते उच्चपदस्थांपर्यंत पोहोचले. जो तो उठतो आणि अगदी सहज आरोप करतो. काहींनी तर आरोप करण्याचे व्रत घेतले आहे, मोहीम सुरू केली आहे. असे आरोप सामान्य माणसाने केले असते तर त्यांना जेलची हवा खावी लागली असती. अब्रूनुकसानीच्या दाव्याला सामोरे जावे लागले असते. पण सध्याच्या आरोपांचा खेळ आणि चोर-चोर, शिपाई-शिपायाचा खेळ अतिअब्रूवान लोकांनी म्हणजे नेत्यांनीच सुरू केला असल्यानं त्यांना कोण विचारणार. सभागृहात त्यांना काही बोलण्याचे स्वातंत्र्य असते आणि बाहेरही तसेच असते. बाई-बाटलीपासून सुरू झालेले आरोप, संस्था-पैसा असा प्रवास आता खुनाच्या आरोपापर्यंत पोहोचला. आरोपातली रक्कम काही किरकोळ नाहीय. वीस हजार कोटी, दहा हजार कोटी, शेकडो एकर जमिनी, प्लॉट अशी करत करत लाखो कोटींच्या घरात पोहोचली आहे. पूर्वीही आरोप व्हायचे, पण त्याबाबत एक रीत होती. तिला गांभीर्य होते. आता शक्तीप्रदर्शन करत, मोर्चा काढत, राडा करत आरोप होतात. पूर्वी संसदबाह्य शक्ती, चळवळी उभारणाऱ्या शक्ती असे आरोप करायच्या. आता संसदेत शक्ती बनलेल्या व्यक्ती असे आरोप करतात. आरोप करतानाची भाषाही बदललीय. झोपडपट्टीतल्या दादा-बाबाच्या तोंडी शोभावी अशी भाषा आता झालीय. नैतिकतेच्या थडग्यावर उभे राहून आपण आरोप-आरोपांचा खेळ करतोय, हेही कुणी लक्षात घ्यायला तयार नाही.

महाराष्ट्रात तीन पायांचे लंगडे म्हणजे आघाडीचे सरकार आले आणि आरोपांचा पाऊस सुरू झाला. भाजप आणि राष्ट्रवादीचे पहाटे कोंबडा बोंबलतानाचे काही तास सत्तेवर आलेले सरकार पुढे अस्तित्वात राहिले असते तर चोर-शिपायांचा खेळ चालू राहिला असता का, असा प्रश्न निर्माण होतो. जर हेच पक्ष सत्तेवर असते तर दिल्लीतल्या किंगमेकर कारभाऱ्यांनी इडीचे अस्त्र महाराष्ट्राच्या दिशेनं सोडले असते का, आपले विरोधक टिप्पून टिप्पून ते चालवले असते का? सोमय्यांनी रोज पत्रकार परिषद घेऊन अशी पोलखोल केली असती का, असेही प्रश्न कोणी सामान्य जनता आणि स्वाभिमानी महाराष्ट्राने विचारले असते तर उत्तर काहीच मिळालं नसतं. याचा अर्थ राजकारणातले आणि सत्तेतले सारे शुद्ध आहेत असं कोणी म्हणणार नाही. सत्ता भ्रष्ट बनवत असते. खरंच ती भ्रष्ट बनवत असते, या न्यायाने अनेकांच्या पायाला माती लागलेली असते. काही सत्तेच्या जोरावर मातीतच चालणे पसंत करतात. सत्तेचे पांघरूण अगदी मस्त असते. कोणत्याही ऋतूत ते वापरता येते. कशाचेही समर्थन करता येते. गोडसेची भूमिका का केली आणि घोडी का पळवली. आदी कोणत्याही प्रश्नाचे समर्थन करण्याची शक्ती सत्ता देत असते. ती सर्वांनाच मिळत असते. मुद्दा आहे तो हा, की अनेक वर्षे विरोधकांमध्ये आणि सत्तेत असलेल्या मंडळींनी असा आताचाच मुहूर्त शोधून चिखलफेकीचा खेळ का सुरू केला. घरात घुसण्याची, कॉलर ताठ करण्याची, बाह्या सरसावण्याची भाषा आताच का सुरू केली. तोंडाला कुत्रे बांधल्यासारखे बरळण्याचा जनतेवर, मतदारांवर काय परिणाम होत असेल, घटनात्मक संस्थांच्या विश्वासार्हतेचे काय होत असेल याचा विचार करण्यासाठी कुणाकडे वेळ नाही.

गेल्या वर्षभरात या आरोपांच्या खेळात पोलिस, ईडी, सीबीआय, राज्यपाल आदी अनेक संस्थांच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक वरिष्ठ अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात, तर काही तशा उंबरठ्यावर उभे आहेत. नट-नट्या या खेळात अडकत आहेत. अनेक कुटुंबातल्या महिलांना संशयाच्या फेऱ्यात अडकवले जात आहे. छ. शिवाजी, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या वैचारिक मुशीत वाढलेल्या प्रदेशात असे अपेक्षित होते काय किंवा त्यांच्या जयजयकाराचा नैतिक हक्क आपण टिकवला काय, असे आजचा किंवा उद्याचा काळ नक्कीच विचारणार आहे.

स्वतःच्याच प्रयोगशाळेत स्वतःच स्वतःच्या चारित्र्याचे दाखले तयार करणारा भाजप असो, हिंदुत्वाचा बेगडी अभिमान बाळगणारी शिवसेना असो किंवा राष्ट्रवादीसारखे मोठे नाव वापरणारा पक्ष असो किंवा फुकटचा पास घेऊन गॅलरीतून हे सारे बघणारी काँग्रेस असो, या सर्वांच्या समोर एकच प्रश्न असेल आणि तो म्हणजे, खरंच महाराष्ट्र

चिखलांचा प्रदेश बनतोय का आणि चोर-शिपायांची गर्दी वाढते आहे काय? या सर्वांनी आपापले निवडणूक जाहीरनामे वाचावेत. त्यात काय सांगितलं होतं आणि काय घडलं हेही पहावं. जनतेच्या मौनाला मान्यता समजू नये आणि तिच्या कोणत्या प्रश्नावर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी आमने-सामने येऊन संघर्ष केला हेही पत्रकार परिषदा घेऊन सांगावं. आता तर पत्रकार परिषदा न घेण्याचा परिपाठ दिल्लीतल्या कारभाऱ्यांनीच सुरू केला आहे. विकासाच्या प्रश्नांवर भाषण करायचं नाही, जनतेला छळणाऱ्या, पोळणाऱ्या प्रश्नावर बोलायचं नाही असे जणू काही राजकारण्यांनी ठरवले आहे. वाढती बेकारी, महागाई, सर्व महत्त्वाच्या परीक्षांमध्ये पसरत चाललेला भ्रष्टाचार, कोरोनानंतर विस्कटलेली, चिंध्या पिराप्रमाणे झालेली अर्थव्यवस्था, महिलांवरील वाढते अत्याचार, वाढता मूलतत्त्ववाद यावर काहीही बोलायचे नाही. बोलायचे तर कोणी किती पैसे खाल्ले, कुणाची भूक किती वाढली आणि कुणाची ढेरी किती वाढली हे चर्चेचे प्रश्न आहेत. ते महत्त्वाचे आहेत याविषयी दुमत असण्याचं कारणच नाही. पुन्हा तोच प्रश्न राहतो तो म्हणजे कोणी कोणावर धोंडा मारायचा. आरोपाच्या मोसमात एक गोष्ट बरी झाली आणि ती म्हणजे बहुतेकजण काचेच्या घरात राहू लागले आहेत. एक निवडणूक जिंकला की आपला प्रतिनिधी राजेशाही थाटात कसा जगू शकतो हेही सामान्य माणसाला कळलंय. त्यातूनच सत्तेला अवास्तव महत्त्व येते. प्रचंड मोठी आणि जीवघेणी स्पर्धाही सुरू होते. लोकशाही मनगट आणि थैलीच्या प्रभावाखाली आली की काय काय घडू शकेल याचा इशारा डॉ. बाबासाहेबांनी अगोदरच देऊन ठेवला होता. नवे संस्थानिक, नवे राजे-महाराजे आणि नवे दादा-भाऊ जन्माला घालण्याच्या व्यवस्थेला म. गांधींनीही विरोध केला होता. शेवटी उलटंच झालं किंवा होतंय. बाबासाहेबांना पुतळ्यात आणि स्मारकात बांधून न ठेवता त्यांच्या विचारांच्या उजेडात चालण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

लोकशाहीत विरोधी पक्ष नुसताच सक्षम असून चालत नाही, तर त्याचा अजेंडाही सक्षम असावा लागतो. सर्वात महत्त्वाचे त्याचे काम जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडणे आणि जनतामय होणे, सरकारवर अंकुश ठेवणे, लोकांचा आवाज सभागृहात नेणे. महाराष्ट्रातला विरोधी पक्ष सध्या काय करतोय आणि केंद्रातला सत्ताधारी विरोधकांचे काय करतोय. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी तो कमरेवर आणि कमरेखाली वार करतोय. महाराष्ट्रातले विरोधक तेच करताहेत. सरकार कधी पडणार आणि ते कसं पाडायचं याच एका गोष्टीनं त्यांना झपाटलय. या रोगामुळे जनता बाजूलाच राहिली आणि सरकार पाडण्याचा खेळ भरात आला. विरोधकांच्या विरोधालाही चारित्र्य आणि मूल्य असावं लागतं आणि तसंच सत्ताधाऱ्यांच्या कारभारालाही. त्याचा विचार न करता मूल्यांच्या थडग्यावर वार-प्रतिवार, घात-प्रतिघात, वाद-युक्तिवाद, एकेरीतली भाषा, अरेरावीची भाषा, शासकीय यंत्रणांचा राजकारणासाठी वापर आदी गोष्टी घडत असतील आणि जनतेचे प्रश्न सोडवण्याऐवजी चिखलाचा सेल लावून त्याचाच खेळ खेळला जाणार असेल तर लोकांचा राजकारणावरचा आणि लोकशाहीवरचा विश्वास डळमळीत व्हायला लागेल. चिखल फक्त राजकारणाच्या चेहऱ्यावरच उडत नाही तर अशा प्रकारात तो लोकशाहीच्या चेहऱ्यावरही उडत असतो. हे सरकार पडणार म्हणून रोज कुडमुड्या जोशांसारखे भाकीत करणारे आणि फेविकॉल लावून तीन पायांची खुर्ची टिकवून ठेवणारे या सर्वांनी ध्यानात घ्यायला हवे. मतदारांची भूमिका अधिक महत्त्वाची आहे. हा सारा खेळ सुरू आहे तो त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचाच. मतदारांनीच विचार करावा, की खरंच आपण कोणत्या कारणांसाठी कोणते प्रतिनिधी निवडले आहेत. मढी पुरायला जागा का मिळाली नाही, ओठ ओले करायला शुद्ध पाण्याचा पुरवठा का होत नाही, रिकाम्या मनगटांना काम का मिळत नाही आणि हे सारे प्रश्न कोण सोडवणार आहे, सरकार की अयोध्येतला कोणी देव? ●●●

## काही आत काही संशयाच्या फेऱ्यात...















पाक्षिक
स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी
# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!
खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ७२० | ६०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३६० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १८० | १५० | |

चेक किंवा डीडी ने पेमेंट
मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------
चेक/डीडी क्र. --------------------.
किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----
नाव : -------------------- पत्ता : --------------------
-------------------- शहर : --------------------
राज्य : -------------------- पिन कोड : -------------------- फोन नं. (घर) : --------------------
मो. नं. : -------------------- इ-मेल : --------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता
२९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा.

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.



# जगभर पसरणार महायुद्धाच्या झळा





**विजय नाईक**
(हवाई, अमेरिका)

**अमेरिका आणि युरोपीय महासंघाच्या नेत्यांनी कितीही इशारे दिले, तरी पुतिन बधण्याची शक्यता नाही. २०१४ मध्ये क्रिमियाला गिळंकृत करण्यापूर्वी युक्रेनला नाटोचा सदस्य बनविले असते, तर या आक्रमणापासून युक्रेन वाचला असता.**



युक्रेनवर रशियाने केलेल्या आक्रमणाबाबत लेख लिहीत असताना रशियन सैन्य कोणत्याही क्षणी युक्रेनची राजधानी कीव्हमध्ये शिरेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अध्यक्ष पुतिन यांनी अण्वस्त्रसिद्धतेचा इशारा दिला आहे. राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार, ४ लाख युद्धग्रस्त युक्रेनियन नागरिकांनी सीमा ओलांडून शेजारच्या देशांत पलायन केले आहे. रशियाची क्षेपणास्त्रे शहरांवर डागली जात आहेत. बेलारूसच्या मार्गे रशियाचे रणगाडे युक्रेनमध्ये शिरल्याचे सर्व वाहिन्यांवरून जगाने पाहिले.

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बाय़डेन यांनी युक्रेनला ३५० दशलक्ष डॉलर्सचे लष्करी साह्य जाहीर केले. मानवीय संकटाकडे पाहता, अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री अँन्थनी ब्लिंकेन यांनी ५४ दशलक्ष डॉलर्सच्या साह्याची घोषणा केली असून, चीन व ब्राझील वगळता जगातील बव्हंश देशांनी पुतिन यांना युद्ध थांबविण्याची सूचना केली आहे. पंतप्रधान मोदी यांनी पुतिन यांच्याबरोबर झालेल्या दूरध्वनीदरम्यान वाटाघाटींच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याची सूचना केली.

**पुतिन बधण्याची शक्यता नाही**

अमेरिका व युरोपीय महासंघ रशियाशी दोन हात करण्यासाठी युक्रेनला शस्त्रास्त्र पाठवित आहेत. युक्रेनचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की रशियन सैन्याला थोपविण्याची शिकस्त करीत आहेत. रशियन सैन्याशी लढण्यासाठी कीव्ह व अन्य शहरांतील नागरिक रस्त्यावर उतरलेत, परंतु त्यांचा टिकाव लागण्याची शक्यता दिसत नाही. युक्रेनकडे दोन ते अडीच लाख सैन्य असून, तेवढेच राखीव दलही आहे. रशियाकडे तब्बल पंधरा लाखांचे सैन्य आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत कीव्ह व युक्रेनमधील महत्त्वाची शहरे पुतिन यांच्या ताब्यात जातील, अशी चिन्हं आहेत.

जगाच्या दबावामुळे पुतिन यांनी झेलेन्स्की यांना बेलारूसची राजधानी मिन्स्क येथे वाटाघाटीसाठी आमंत्रित केले. ते त्यांना अमान्य असल्याने वाटाघाटी आता बेलारूस व युक्रेनच्या सीमेवर होणार, असे दिसते.''वाटाघाटीसाठी कोणत्याही अटी मान्य होणार नाहीत,'' हे झेलेनस्की यांनी आधीच स्पष्ट केलय. त्या कोणत्या दिशेने जाणार की फिस्कटणार, हे येत्या आठवड्यात कळेल.

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन तसेच युरोपीय महासंघाच्या नेत्यांनी कितीही इशारे दिले, तरी पुतिन बधण्याची शक्यता नाही. किंबहुना २०१४ मध्ये युक्रेनचा लचका तोडून क्रिमियाला गिळंकृत

## नाटो काय आहे ?

नाटो म्हणजे उत्तर अटलांटिक करार संघटना. याला उत्तर अटलांटिक संघ असेही म्हटले जाते. नाटो हा २८ युरोपियन देश आणि दोन उत्तर अमेरिकन देश यांच्यामधील आंतरसरकारी लष्करी गट आहे. दुसऱ्या जागतिक युद्धाच्या परिणामस्वरूप स्थापन झालेल्या या संघटनेने उत्तर अटलांटिक कराराची अंमलबजावणी केली. या करारावर ४ एप्रिल १९४९ रोजी सह्या करण्यात आल्या. नाटोने सामूहिक सुरक्षेची एक यंत्रणा तयार केली असून, ज्यायोगे त्याचे स्वतंत्र सदस्य राष्ट्र, बाह्यशक्तींकडून हल्ला झाला तर त्यास प्रतिसाद म्हणून परस्पर संरक्षणासाठी सहमत असतील. नाटोचे मुख्यालय बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे, तर याच देशातील मॉन्स येथे अलाईड कमांड ऑपरेशन्स (एसीओ) चे मुख्यालय आहे. नाटोच्या स्थापनेच्या वेळी (१९४९) सदस्य राष्ट्रांची संख्या फक्त १२ होती. ती पुढे ३० पर्यंत पोहोचली. अगदी अलीकडे म्हणजे २७ मार्च २०२० रोजी उत्तर मॅसिडोनियाने नाटोचे सदस्यत्व स्वीकारले. इच्छुक सदस्य म्हणून नाटोने नुकतीच बोस्निया, हर्जिगोविना आणि जॉर्जिया, युक्रेन यांना मान्यता दिलेली आहे. दरम्यान, युक्रेनला कधीही सदस्य म्हणून न स्वीकारण्यासाठी नाटोला कायदेशीर बंधने घालण्याची इच्छा, नाटोचा बिगरसदस्य राष्ट्र असलेल्या रशियाचे अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनवरील हल्ल्यापूर्वी व्यक्त केली होती. **सदस्य राष्ट्रे** : बेल्जिअम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आयलँड, इटली, लक्झम्बर्ग, द नेदलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, ब्रिटन, संयुक्त राष्ट्रे, ग्रीस, तुर्की, जर्मनी, स्पेन, झेक प्रजासत्ताक, हंगेरी, पोलंड, बल्गेरिया, इस्टोनिया, लॅटविया, लिथुआनिया, रोमानिया, स्लोवाकिया, स्लोवेनिया, अल्वानिया, क्रोएशिया, मॉन्टेनिग्रो आणि उत्तर मॅसिडोनिया.

करण्यापूर्वी अमेरिका व युरोपीय महासंघाने युक्रेनला नाटोचा (नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) सदस्य बनविले असते, तर सुरू असलेल्या आक्रमणापासून युक्रेन वाचला असता. पुतिन यांची दादागिरी थांबेल, या भरवशावर बायडेन व युरोपीय महासंघ राहिला. अफगाणिस्तानातील अमेरिकन सैन्याची माघार हा पुतिन यांच्यासाठी एक संदेश होता. त्यानंतर केवळ सात महिन्यांत सर्व तयारीनिशी आपले मनसुबे जाहीर करीत पुतिन यांनी युक्रेनवर हल्ला करून दुसऱ्याच दिवशी लुगांक्स व डोनेस्क हे दोन प्रांत स्वतंत्र गणराज्ये झाल्याचे घोषित केले. अर्थात, त्यांना कोणत्याही राष्ट्राने वा राष्ट्रसंघाने मान्यता दिलेली नाही. याचा अर्थ, क्रिमियानंतर युक्रेनचे आणखी दोन लचके पुतिन यांनी घेतले. त्याकडे जग संतापाने, निराशेने पाहात राहिले. आता उरलेला युक्रेन ते गिळंकृत करीत आहेत.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक युद्धं झाली. लोकशाहीचे रोपण करण्यासाठी अमेरिकेने इराक, लीबिया, व्हिएतनाम व अफगाणिस्तानवर युद्धं लादली. परंतु ते देश गिळंकृत केले नाहीत. उलट रशियाने युक्रेनवर आक्रमण करून क्रिमिया घशात घातला. १९९१ मध्ये सोव्हिएत महासंघाचे विभाजन झाल्यानंतर त्यातील जमेल त्या देशांना पुन्हा प्रभावाखाली आणणे हे उद्दिष्ट पुतिन यांनी पुढे ठेवले. त्याच दिशेने गेल्या काही वर्षात त्यांची पावले पडली आहेत.

**रशियाची सुरक्षा धोक्यात**

सोव्हिएत महासंघाच्या जोखडातून स्वतंत्र झालेले देश जसजसे नाटोचे सदस्य झाले, तसे युरोपीय महासंघ व नाटो यांचा पूर्वेकडे होणारा विस्तार पुतिन यांना सलतोय. महासंघातून स्वतंत्र झालेले अर्मेनिया, अझरबैजान, इस्टोनिया, जॉर्जिया, कझाकस्तान, किरगिजस्तान, लाटविया आज नाटोचे सदस्य आहेत. नाटो व युक्रेनच्या संबंधांकडे पाहिल्यास असे दिसते, की १९९१ ते १९९४ या काळात युक्रेन नाटोच्या सहकार्य मंडळाचा सदस्य झाला. नंतर 'पार्टनरशिप फॉर पीस प्रोग्राम'चा सदस्य झाला. २०१६ मध्ये वॉर्सा येथे झालेल्या नाटोच्या शिखर परिषदेत युक्रेनला सर्वंकष साह्य देण्याचे ठरले. २०१७ मध्ये युक्रेनच्या संसदेने नाटोच्या संरक्षण धोरणाबाबत



होती. युक्रेन हे रशियाच्या धान्याचे कोठार होते. रशियाच्या संरक्षणाचे, अण्वस्त्रनिर्मितीचे व उत्पादन प्रकल्प तेथे होते. युक्रेन हे रशियातील एक महत्वाचे शैक्षणिक केंद्र होते व आजही आहे. कझाकस्तानमध्ये जगातील युरेनियमचे सर्वात मोठे साठे आहेत. त्यामुळे या पूर्वाश्रमीच्या दोन्ही प्रांतांना त्यावेळेपासून महत्व आहे. रशियातील खनिज तेल व नैसर्गिक वायू पूर्व व पश्चिम युरोपला पाठविण्यासाठी रशियाने आजवर युक्रेनमधील पाईपलाईन्सचा वापर केला आहे. आणखी महत्वाची बाब म्हणजे, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर युक्रेनमध्ये लोकशाही प्रस्थापित झाली. ते रशियातील एकाधिकारशाहीविरूद्ध होते. १९८९ मध्ये बर्लिनची भिंत कोसळली व पूर्व व पश्चिम बर्लिन एकत्र आले. त्यामुळे युरोपातील लोकशाहीचे वारे पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहू लागले. रशियाच्या जोखडातून मुक्त झालेल्या कोणत्याही देशाला पुन्हा रशियाच्या अधिपत्याखाली जायचे नव्हते. त्यात काही देशात लोकशाही, तर काही देशात अधिकारशाही आली. तरी अधिकारशाही असलेल्या देशांतील प्रमुखांना रशिया अथवा पुतिन यांचे वर्चस्व नको होते. आजही ते मान्य नाही. भौगोलिकदृष्ट्या ते रशियाच्या जवळ नाहीत. त्यामुळे युक्रेनप्रमाणे त्यांच्यावर रशिया आक्रमण करण्याची शक्यता नाही.

**तीन देशांत चुरस**

आज जगात प्रामुख्याने आपले प्रभाव क्षेत्र वाढविण्यासाठी तीन देशांत चुरस चाललेली दिसते. ती राष्ट्रे म्हणजे, अमेरिका, रशिया व चीन. जगातील निरनिराळ्या 'कॉनफ्लिक्ट झोन्स'च्या (युद्ध क्षेत्र)

## युक्रेन काय आहे




सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर (१९९१) ज्या १५ प्रांतांनी बाहेर पडून स्वतःला स्वतंत्र राष्ट्र म्हणून जाहीर केले, त्यात युक्रेनचाही समावेश होता. हा विकसित देश असून मानव विकास निर्देशांकात तो ७४ व्या क्रमांकावर आहे. तो गरिबी आणि भ्रष्टाचारामुळे त्रस्त आहे. तथापि, विस्तृत सुपीक शेतजमिनीमुळे युक्रेन धान्याची निर्यात करणारा जगातील सर्वात मोठा देश आहे. या देशाचे क्षेत्रफळ ६०३,६२८ चौरस किलोमीटर असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने रशियानंतर पूर्व युरोपमधील हा सर्वात मोठा देश आहे. लोकसंख्येच्या बाबतीत युरोपमधील हे ८ वे राष्ट्र आहे. युक्रेनच्या पूर्व आणि उत्तर दिशांना रशियाची सीमा आहे. उत्तरेलाच बेलारूसचीही सरहद्द आहे. पश्चिमेला पोलंड, स्लोव्हाकिया आणि हंगेरी, तर दक्षिणेला रोमानिया आणि मालदोवा देशांच्या सीमा आहेत. युक्रेनची राजधानी असलेले क्यीव हे देशातील सर्वात मोठे शहर आहे. १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनमधून बाहेर पडल्यानंतर युक्रेनने स्वतःला एक तटस्थ राष्ट्र म्हणून घोषित केले. त्याने रशिया आणि इतर राष्ट्रकुल राष्ट्रांसोबत एक मर्यादित लष्करी भागीदारी प्रस्थापित केली. १९९४ मध्ये नाटोशीही युक्रेनची भागीदारी प्रस्थापित झाली.

मुळाशी ही राष्ट्रे आहेत. अमेरिकेचा प्रभाव कमी होत असल्याने अमेरिका, युरोप यांना राजकीय व सामरिक आव्हान देण्यासाठी चीन, रशिया, पाकिस्तान व इराण ही चार राष्ट्रे एकत्र येताना दिसत आहेत. किंबहुना, त्यामुळेच की काय अमेरिकेने जसा इराक, लीबियात नेतृत्वबदल केला, तसा बदल अमेरिका सीरियात अद्याप करू शकलेली नाही.

आक्रमणामागील महत्वाचे उद्दिष्ट आहे, ते तेथे सत्तापालट करण्याचे. कारण यापूर्वी व्हिक्टर यानुकोविच यांना सत्तेत कायम ठेवण्यात ते अयशस्वी ठरले होते. यानुकोविच हे २००२ ते २००७ अखेर युक्रेनचे पंतप्रधान व नंतर २०१० ते २०१४ पर्यंत राष्ट्राध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दीत युक्रेनची वाटचाल एकाधिकारशाहीकडे झाली. त्याला विरोध करणाऱ्या लोकशाहीसाठी जनतेने सुरू केलेले आंदोलन इतके पेटले, की अखेर यानुकोविच यांचे शासन कोसळून पडले. आंदोलकांवर केलेल्या गोळीबारात ७७ लोक ठार झाले. त्यांनी युक्रेनच्या शासकीय तिजोरीतील तब्बल ७० अब्ज डॉलर्सचा अपहार केला. हंगामी सरकारने त्यांच्याविरूद्ध अटकेचा आदेश काढला. गुन्हेगार म्हणून इंटरपोलने त्यांच्या अटकेचे वॉरंट काढले. अखेर स्वतःला वाचविण्यासाठी यानुकोविच यांना रशियात पलायन करावे लागले. युक्रेनमध्ये २०१७ मध्ये त्यांच्यावर महाभियोग चालविण्यात आला. २०१९ पासून अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की यांनी युक्रेनमध्ये लोकशाही प्रस्थापित करण्याचे प्रयत्न चालविले आहेत. त्यात ते बऱ्याच अंशी सफलही झालेत.

**पुतिन यांची कोंडी करण्यासाठी**

युक्रेनमधील विरोधी पक्षनेते व्हिक्टर मेदवेदचुक हे पुतिन यांचे निकटस्नेही असून, त्यांच्या हाती अथवा आपल्याला हव्या असलेल्या नेत्याच्या हाती सत्ता गेल्यास बेलारूसप्रमाणे आणखी एक कळसूत्री बाहुले सरकार चालविण्याचे समाधान पुतिन यांना लाभेल. पुतिन यांची कोंडी करण्यासाठी 'नॉर्ड स्ट्रीम २' हा रशिया ते जर्मनी गॅसवाहू प्रकल्प रोखण्याची घोषणा अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी केली आहे. र

जगातील खनिज तेल व वायूचे सर्वात मोठे साठे रशियात आहेत. या प्रकल्पाने युरोपची इंधनाची गरज भासेल. प्रकल्प बंद झाल्यास युरोपच्या दृष्टीने दुहेरी संकट ठरणार आहे. त्याचा थेट परिणाम औद्योगिक उत्पादन व आर्थिक प्रगतीवर होईल. रशियाला विरोध केला नाही, तर युक्रेननंतर नाटोचे सदस्य असूनही क्रोएशिया, लाटव्हिया, इस्टोनिया, लिथुआनिया या राष्ट्रांना रशियाच्या संभाव्य वाढत्या दबावाला सामोरे जावे लागेल.

**म्हणून अमेरिकेचा रशियाला विरोध**

अमेरिकेच्या टीकाकारांनुसार, 'नॉर्ड स्ट्रीम २' प्रकल्पामुळे जर्मनी व युरोप रशियाच्या प्रभावाखाली येऊ नये, म्हणून अमेरिका रशियाला विरोध करीत आहे. वेगाने घडणाऱ्या या घडामोडींत भारताकडे बघ्याची भूमिका आलेली आहे. किंबहुना, सत्तेवर आल्यापासून पंडित नेहरूंबाबत खडेफोड करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अखेर त्यांनी स्वीकारलेल्या अलिप्त वा तटस्थतेच्या धोरणाचा पुरस्कार करावा लागत आहे. कारण, आपण अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांचे मित्र आहोत. आपण खनिज तेल, शस्त्रसामुग्री, क्षेपणास्त्रे, अणुभट्या चालविण्यासाठी लागणारे इंधन आदींसाठी रशियावर अवलंबून आहोत, तर अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री, खनिजे, धातू, अणुभट्टया, शस्त्रास्त्रे आदींसाठी भारत अमेरिकेवर अवलंबून आहे. त्यामुळे आपण त्याना ,नाराज करू शकत नाही. कुठेही मध्यस्थी करू शकणार नाही.

**भारतीय शिष्टाईपुढे समस्याच समस्या**

''रशिया व युक्रेनमधील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने सर्व प्रयत्न झाले पाहिजेत,'' असे भारताचे राष्ट्रसंघातील कायमचे प्रतिनिधी टी.एस.थिरूमूर्ती यांनी सुरक्षा मंडळाच्या बैठकीत बोलताना सांगितले. परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रिंगला यांनी घडामोडींबाबत दिल्लीतील पत्रकार परिषदेत भारतातर्फे चाललेल्या प्रयत्नांबाबत २४ फेब्रुवारी रोजी माहिती दिली, परंतु भारताच्या भूमिकेबाबत विचारलेल्या प्रश्नांना केवळ थातुरमातूर उत्तरे दिली. तेथे २० हजार

## रशिया काय आहे




१९९१ मधील विघटनापूर्वी रशिया हे बलाढ्य राष्ट्र सोव्हिएत युनियन म्हणून ओळखले जायचे. १९१७ मध्ये झालेल्या रशियन क्रांतीत कट्टरपंथी डाव्या क्रांतिकारकांनी झार निकोलस द्वितीयचा पाडाव केला आणि अनेक शतकांपासून असलेले रोमानोवाचे शासन संपुष्टात आणले. त्यानंतर सोव्हिएत युनियन अस्तित्वात आले. रशिया किंवा रशियन महासंघ म्हणून आता ओळखला जाणारा पूर्व युरोप ते उत्तर आशिया असा पसरलेला हा एक आंतरखंडीय देश आहे. क्षेत्रफळाच्या (१७,१२५,१९१ चौरस किलोमीटर) दृष्टीने हा जगातील सर्वात मोठा देश आहे. पृथ्वीवरील निवासी क्षेत्रापैकी एक अष्टमांश एवढे क्षेत्र या देशाने व्यापले आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धात मित्रराष्ट्रांचा जो विजय झाला, त्यात सोव्हिएत युनियनची (पूर्वाश्रमीचा रशिया) निर्णायक भूमिका होती. तेव्हापासून तो महाशक्ती म्हणून उदयास आला आणि शीतयुद्धाच्या काळात तो अमेरिकेचा स्पर्धक बनला. मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या कारकीर्दीत १९८८ ते १९९१ या काळातील अंतर्गत राजकारण, आर्थिक आणि वांशिक फुटीरता या कारणांमुळे सोव्हिएत युनियन फुटले. त्यात युक्रेनसह लॅटविया, लुथिआनिया, इस्टोनिया, जॉर्जिया, बेलारूस, अर्मेनिया, अझरबैजान, कझाकस्तान, किरगीझस्तान, मोलदोवा, तुर्कमेनिस्तान आणि उझबेकिस्तान आदी १५ प्रांतांनी बाहेर पडून स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषित केले. १९९१ मधील विघटनानंतर सोव्हिएत युनियनने रशिया किंवा रशियन महासंघ असे नाव धारण केले.

भारतीय अडकल्याचे सांगून त्यांना मायदेशी आणण्याच्या प्रयत्नांचा तपशील त्यांनी दिला. त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सुरक्षा समितीची बैठक झाली. या आक्रमणामुळे भारतीय शिष्टाईपुढे अनेक समस्या उभ्या राहिल्या असून, राष्ट्रसंघाच्या सुरक्षा मंडळाच्या परिषदेत तटस्थ भूमिका घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. मंडळातील ठरावाविरूद्ध रशियाने विशेषाधिकार (व्हेटो) वापरला. त्यामुळे रशियाची निंदा करण्याव्यतिरिक्त अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स काही करू शकलेले नाहीत. चीन सध्यातरी या फंदात पडलेला नाही, असं दिसतं. ''तिढा सोडविण्यास भारत हवे ते साह्य करण्यास तयार आहे,'' असे श्रिंगला म्हणाले खरे. पण रशिया वा अमेरिका त्यासाठी भारताकडे धाव घेण्याची शक्यता नाही. मध्यस्थी करण्याची भारताची ताकदही नाही. जेव्हा जेव्हा अन्य देशांत युद्ध झाले, तेव्हा भारताने (इराक, कुवेत, अफगाणिस्तान,चीन व आता युक्रेन) येथून अडकलेल्या भारतीयांना मायदेशी आणण्यास प्राधान्य दिले. आताही युक्रेन, रूमानिया, स्लोव्हाकिया, पोलंड, हंगेरी या राष्ट्रांशी संपर्क साधून भारतीयांना सुखरूप आणले जात आहे. इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान असताना भारत रशियाच्या गोटात होता. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकीर्दीत २००५ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्याबरोबर नागरी अणुऊर्जा करार झाल्यापासून आपण अमेरिकेच्या गोटात सामील झालो आहोत, असे जग मानते व ते बऱ्याच अर्थी खरे आहे. देशाची सव्वाअब्ज लोकसंख्या पाहता भारताला केवळ अमेरिका व रशियाच नव्हे, तर जगातील अनेक देशांवर अवलंबून राहावे लागते.

### अनेक देशांना फटका बसणार

'दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ,' अशी म्हण आपल्याकडे आहे. परंतु या संघर्षाबाबत तसे म्हणता येणार नाही. उलट दोघांच्या भांडणात आपल्यासह अनेक देशांची हानी होणार आहे. अमेरिकेबरोबर भारताच्या व्यापाराचे प्रमाण १४६.१ अब्ज डॉलर्स असून, रशियाबरोबरचे ९.४ अब्ज डॉलर्स व युक्रेनबरोबर केवळ २.३ अब्ज डॉलर्स आहे. यावरून व्यापारासंदर्भात भारताचे कुणाशी घनिष्ट संबंध आहेत, हे ध्यानी यावे. भारताची भूमिका रशिया, अमेरिका व युक्रेनला पसंत नसली, तरी भारताची ती अनिवार्यता असावी, असे त्यांनी मानायला हवे. लोकशाही असूनही भारताने अमेरिकेच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही. यामुळे बायडेन यांचे अनेक निकटवर्तीय नाराज आहेत. त्याचा परिणाम क्वाड गटातील ( अमेरिका, ऑस्ट्रेलिया, भारत व जपान ) परस्पर संबंधांवर होण्याची शक्यता आहे.

### भारतात महागाई वाढणार

प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ अरूण कुमार यांनी गेल्या आठवडयात लिहिलेल्या लेखात भारतावर युद्धाचे काय परिणाम होतील, याबाबत काही अंदाज व्यक्त केले आहेत. त्यानुसार,''भारतात चलनवाढ होऊन अन्नधान्याचे व पेट्रोल आदी इंधनांचे भाव वाढतील. गुंतवणुकीच्या क्षेत्रात घट व अनिश्चितता निर्माण होईल. भांडवली स्त्रोत मंदावेल. महसुली उत्पन्न कमी होईल. संरक्षण सामग्रीबाबत भारत रशियावर अवलंबून आहे. परंतु युद्धामुळे रशियाकडून होणाऱ्या पुरवठ्यास विलंब होईल. सुरू झालेल्या नव्या शीतयुद्धात भारताला आपल्या परराष्ट्र धोरणात परिस्थितीनुरूप बदल करावे लागतील. भारताला युक्रेनमधील घटनांचे थेट महत्व नसले, तरी त्यातून चीनला मिळणाऱ्या आक्रमक संकेतांकडे डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावे लागेल व संरक्षणसिद्धता ठेवावी लागेल.''

अधिकारशाहीबाबत मोदी यांनी पुतिन यांचे अनुकरण करण्याचे ठरविल्यास लोकशाहीला नव्या समस्यांना सामोरे जावे लागेल.

आणखी एक बाब म्हणजे, व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान व इराणचे सर्वेसर्वा अली खोमेनी या नव्या चौकोनाला सामोरे जावे लागेल. ●●●

## कोण कोणाच्या बाजूने

रशिया : एकेकाळी सोव्हिएत युनियनचा भाग असलेले बेलारूस, अर्मेनिया, कझाकस्तान, किरगिझस्तान हे रशियाच्या बाजूने उभे आहेत. रशियाचा जवळचा मित्र क्यूबानेही पुतीन यांना पाठिंबा दिला आहे. रशियन महासंघ आणि युक्रेन या दोघांशीही चांगले संबंध असल्यामुळे भारताने एक अलिप्त राष्ट्र म्हणून तटस्थ राहण्याची भूमिका घेतली आहे. दुसरीकडे, चीन मात्र वेगळा डाव खेळतो आहे. राजनैतिक उपाययोजनेद्वारे पाश्चात्य राष्ट्र आणि रशिया यांच्यात समतोल साधण्याचा त्याचा उद्देश आहे. दरम्यान, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे रशियाशी संबंध वाढवण्यास उत्सुक आहेत. म्हणून ते रशियाच्या युक्रेनवरील हल्ल्याचे समर्थन करू शकत नाहीत. बीजिंगचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी उभय देशांना संयम ठेवण्याची विनंती केली आहे.




युक्रेन : बेल्जिअम, कॅनडा, डेन्मार्क, फ्रान्स, आयलँड, इटली, लक्झमबर्ग, द नेदरलँड्स, नॉर्वे, पोर्तुगाल, ब्रिटन आणि संयुक्त राष्ट्रे या नाटोच्या सदस्य राष्ट्रांचा युक्रेनला संपूर्ण पाठिंबा आहे. नव्याने उद्‌भवलेला वाद शमविण्यासाठी जर्मनी आणि फ्रान्स यांनी घाईघाईने नुकतीच मॉस्कोला भेट दिली. राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी युक्रेनच्या दोन प्रांतांना वेगळी राष्ट्रे म्हणून मान्यता दिल्यानंतर संयुक्त राष्ट्रे आणि कॅनडा यांनी नॉर्ड स्ट्रिम टू या पाईपलाईनची मान्यता रोखली आहे. युक्रेनमधील दोन प्रांतांना लुहान्स आणि डोनेस्क अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे म्हणून रशियाने मान्यता दिल्याच्या परिणामी जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा या सर्व राष्ट्रांनी युक्रेनला आपला संपूर्ण पाठिंबा दिला आहे.

# डिजिटल भारत, की आभासी भारत!



देवीदास
तुळजापूरकर

**एकतर भारतात आर्थिकदृष्ट्या साक्षर खूप कमी जनसमूह आहेत तसे आधुनिक तंत्रज्ञानाविषयीदेखील जागरूकतादेखील खूपच कमी आहे. यामुळे फ्रॉडची संख्या खूप वाढतआहे आणि त्यात बळी जात आहे तो सामान्य माणसाचाच. ॲपवर आधारित कर्ज देणाऱ्या संस्थांनी तर सामान्य माणसांना हजारो कोटी रुपयांना गंडवले आहे.**




सध्याचे युग हे डिजिटल युग म्हणून ओळखल्या जाते. शिक्षण, आरोग्य, रोजगार, बँकींग, सामाजिक-राजकीय सभा, संमेलने, सार्वजनिक कार्यक्रम, सण-समारंभ सगळं काही डिजिटल. माहिती ज्ञान तंत्रज्ञान यातील प्रगतीनंतर आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने यंत्रमानवाला मैदानात उतरवल्यानंतर तर सगळं काही डिजिटल आणि आभासी. याचा प्रत्यय आता आपल्याला समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात उमटताना दिसत आहे.

वित्तीय क्षेत्र आणि बँकिंग क्षेत्रात तर डिजिटलचा खूपच बोलबाला आहे. खाते उघडायचे, पेमेंट करायचे, कर्ज घ्यायचे, पैसे पाठवायचे सगळे कांही डिजिटल. याचा आता इतका बोलबाला झाला आहे, की आता वर्षेनवर्ष आम्हाला बँकेत जावे लागत नाही असे फुशारकीने सांगणारे अनेक लोक आहेत. एवढेच नाही तर रिझर्व बँक आता पहिल्या अशा बँकेला परवाना देऊ पाहत आहे जिची कुठे शाखाच नसेल, असेल ते फक्त तंत्रज्ञान विषयक एक केंद्र. सगळं काही डिजिटल, आभासी. हे पुरेसे नाही म्हणून की काय आता रिझर्व बँक डिजिटल चलन बाजारात आणू पाहत आहे. क्रिप्टोकरेंसी या आभासी चलनाने तर जगभरात धुमाकूळ घातला आहे. भारतात न्याय पालिकेने नरोवाकुंजरो भूमिका घेत तिला ना कायदेशीर ठरवले ना बेकायदेशीर. कायदेमंडळांनी लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात कायदा प्रस्तावित केला होता. पण त्यांनी अजून तरी जन्म घेतला नाही याचा अर्थ सरकारदेखील या प्रश्नावरून द्विधा मनस्थितीत आहे. या क्रिप्टोकरेंसीचा दबावगट एवढा प्रभावी आहे, की त्यांनी चक्क प्रधानमंत्र्यांचे ट्विटर अकाउंट हॅक केले आहे आणि या कायद्याबाबतीत खोटे ट्विट प्रसृत केले. नाही म्हणायला या अर्थसंकल्पात या आभासी चलनाच्या व्यवहारातून मिळणाऱ्या उत्पन्नावर जबरी कर लागू केला आहे. याचा अर्थ क्रिप्टो करेंसीला वैध समजायचे काय? यावर मात्र न्यायपालिकेप्रमाणे सरकारची भूमिका नरोवाकुंजरो आहे. रिझर्व बँक मात्र सातत्याने क्रिप्टोकरेंसीबाबतचे त्यांचे विसंवादी मत आग्रहीपणे आणि वारंवार मांडत आहे. रिझर्व बँकेचे प्रयोजन चलनाचे नियोजन आहे, ज्या माध्यमातून रुपयाच्या मागणी आणि पुरवठायावर नियंत्रण ठेवत चलन, महागाई, व्याजदर यांचे नियमन केले जाते. क्रिप्टोकरेंसीसारख्या डिजिटल चलनामुळे या सगळ्या घडामोडीवरचे आपले नियंत्रण जाईल, आपले प्रयोजनच संपुष्टात येईल अशी भीती रिझर्व बँकेला वाटते पण जगभरातून आभासी चलन याबद्दल वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत. त्याशी ताळमेळ ठेवण्याचा एक भाग म्हणून भारतीय रिझर्व बँक स्वतःचे डिजिटल चलन जरुर आणू पाहत आहे. या दिशेने सावध पाऊल टाकत आहे. एकूणच आता वातावरण असे आहे की सबकुछ डिजिटल, आभासी. या पार्श्वभूमीवर जमिनी वास्तव पडताळून पाहणे आवश्यक आहे. भारताची लोकसंख्या आहे १४० कोटी, यात पुरुष ५२% तर स्त्रिया ४८%. या लोकसंख्येतील ३५% जनता शहरातून राहते तर ६५% ग्रामीण भागातून. या लोकसंख्येतील ४५% जनता इंटरनेट वापरते तर ३२% जनता समाज माध्यमाचा वापर करते तर ७९% जनता मोबाईलचा वापर करते. डिजिटल किंवा आभासी जगाचे हेच आहेत वाहक. देशात ६.६५ लाख खेडी आहेत ज्यातील २.२० खेड्यातून ब्रॉडबँडची सेवा उपलब्धआहे. भारतात १५ लाख शाळा आणि दोन हजार विद्यापीठे आहेत ज्यातील २.५ लाख शाळा, विद्यापीठे येथे वाय-फायची सेवा उपलब्ध आहे तर देशभरातून चार लाख सार्वजनिक ठिकाणे आहेत जिथे मोफत इंटरनेटचा वापर केला जाऊ शकतो. देशाची एकूण लोकसंख्या, एकूण खेडी, एकूण शाळा/ महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या तुलनेत मोबाईल, इंटरनेट, समाजमाध्यमे याशी जोडला गेलेले गेलेला जनसमूह पाहिला तर डिजिटल, आभास युग ज्याचा बोलबाला केला जात आहे तो शेवटी आभासीच




राहणार का? हा खरा प्रश्न आहे.

करोनाच्या काळात लस घेण्यासाठी प्रारंभी कोविनॲपचा वापर आवश्यक केला गेला होता पण याप्रश्नी दाखल केलेल्या सार्वजनिक हित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने आपले मत प्रदर्शन करताना असे स्पष्टपणे मांडले होते की ज्या समूहाला यासुविधा उपलब्ध नाहीत त्यांचे काय? सर्वसमावेशक विकास असे म्हणत, म्हणत डिजिटलायझेशनच्या प्रक्रियेत आपणच कोट्यावधी जनसमूहाला या विकासाच्या वर्तुळाबाहेर फेकत आहोत त्याचे काय?

भारत सरकारने या डिजिटल भारताच्या तयारीसाठी २०१५ मध्ये १.१३ लाख कोटी रुपयांची तरतूद केली होती. याशिवाय मुकेश अंबानी यांनी २.५ लाख कोटी रुपये तर सुनील मित्तल यांनी एक लाख कोटी रुपयांची तरतूद केली होती. पण या टेलिकॉम उद्योगातील सार्वजनिक क्षेत्रातील बीएसएनएल, एमटीएनएल यांची गत आपण जाणतो. हीच गत खाजगी क्षेत्रातील आस्थापनांची आहे. एकूणच टेलिकॉम उद्योगाची दुरावस्था लक्षात घेतली तर या डिजिटल भारताचं शिवधनुष्य आपण कसे पेलणार आहोत?

डिजिटल इंडियाचा आजच्याघडीला सर्वात जास्त वापर केला जातो तो बँकिंग क्षेत्रात. या बँकिंगमध्ये दर दिवशी २३१ फ्रॉड होतात. वर्ष २०२० मध्ये ८५,५४० फ्रॉड उघडकीस आले आहेत. यात सामान्य माणूस १.८६ लाख कोटी रुपयांना लुटला गेला आहे. यात वसुली झाली आहेते अवघे १६,१९७ कोटी रुपये. वर्ष २०२१ मध्ये ८३,६३८ फ्रॉड नोंदवले गेले आहेत. त्यात अंतर्भूत रक्कम आहे १.३८ लाख कोटी रुपये तर वसुली झाली आहे १०,१३१ कोटी रुपये.

२००८ ते २०२१ या तेरा वर्षात फ्रॉड नोंदवले गेले आहेत ३.१४ लाख. यात अंतर्भूत रक्कम होती ५.३१ लाख कोटी रुपये. ज्यात वसुली झाली आहे तीअवघी १% एवढी. डिजिटल युगाची सुरुवात झाली, त्यातही विशेषकरून निश्चलनीकरण प्रक्रियेनंतर ऑनलाइन व्यवहारांची संख्या जशी वाढली तसे फ्रॉडची संख्या वाढली आणि अंतर्भूत रक्कमदेखील वाढली तसे त्यातीलवसुलीचे प्रमाणदेखील खूप घटले.

एकतर भारतात आर्थिकदृष्ट्या साक्षर खूप कमी जनसमूह आहेत तसे आधुनिक तंत्रज्ञानाविषयीदेखील जागरूकतादेखील खूपच कमी आहे. यामुळे फ्रॉडची संख्या खूप वाढतआहे आणि त्यात बळी जात आहे तो सामान्य माणसाचाच. ॲपवर आधारित कर्ज देणाऱ्या संस्थांनी तर सामान्य माणसांना हजारो कोटी रुपयांना गंडवले आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर डिजिटल इंडिया, आभासी जग, पाच लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था ही सगळी स्वप्न जर समाजातील गरीब माणसांना, वंचित घटकांना वगळून पुढे जाणार असतील तर ती कशी पुढे जाऊ शकतील? या वंचित घटकांजवळ यातून निर्माण होणारी असुरक्षिततेची भावना समाजाच संतुलन बिघडवेल, अस्थैर्य माजले आणि अनागोंदीला निमंत्रण देणारे ठरेल त्याचे काय? •••

**(लेखक बँक क्षेत्रातील अभ्यासक आहेत.)**

# महिलांना गरज आत्मसन्मानाची



उत्तम कांबळे

**एकीकडे महिला राजकारणासह राष्ट्रपती, राज्यपाल, मुख्यमंत्री अशा संवैधानिक पदांवर काम करून आपली कर्तबगारी सिद्ध करीत असताना, तिच्यावरील अन्याय-अत्याचाराचे सत्र मात्र सुरूच आहे. याचा अर्थ, ती एकाचवेळी विकासाच्या आणि पिळवणुकीच्या वाटेवर दिसते. या दुष्टचक्रातून सुटका होऊन तिला आत्मसन्मान मिळाला पाहिजे.**



पृथ्वीवरच्या महिलांबाबत एक गोष्ट वैशिष्ट्यपूर्ण बनून राहिली आहे ती म्हणजे, बहुतेक सर्व गोष्टींची तीच निर्माती असते आणि जे काही ती निर्माण करते तेच तिला वर्षानुवर्षे संघर्ष करून व्यवस्थेकडे मागावं लागतं. ती माणूस जन्माला घालते; पण त्याच्याकडूनच संरक्षण आणि प्रतिष्ठा मागते. ती शेती जन्माला घालते; पण 'सातबारा'वर आपलंही नाव यावं यासाठी संघर्ष करत राहते. ती मुलं जन्माला घालते आणि मुलांच्या नावामागं आपलंही नाव यावं यासाठी याचना करत राहते. ती संगीत, कला, नृत्याची निर्माती असते आणि त्यावरही आपला हक्क मागून घ्यावा लागतो. ती पहिली शिक्षिका असते, पण शिक्षणात 'स्पेस' मागण्याची वेळ तिच्यावर येते. ती घरट्याचा शोध लावते; पण या घरट्यात आपल्याला जागा कशी मिळेल, याचा विचार करू लागते. ती सुगरण बनते आणि कुपोषितही होते. तिच्याशिवाय सृष्टीचा पाळणा हलत नाही; पण या पाळण्यात तिची संख्या वाढू नये म्हणून गर्भात आणि गर्भाबाहेर तिच्या नरडीला नख लावण्याचा प्रयोग सुरू असतो. ती सर्व काही असते; पण हे सर्व काही मिळवण्यासाठी तिला अखंड संघर्ष करावा लागतो आहे. व्यवस्था तिची सगळी मिळकत आपल्या नावावर करते आणि तिला किती, काय आणि कधी द्यायचं याबाबतचा तराजू आपल्याच हातात ठेवते. म्हणजे शिकार माकडांनी करायची आणि कोणाला किती लोणी द्यायचं हे बोक्यांनी म्हणजे व्यवस्थेनं ठरवायचं, असा हा मामला आहे.

**विकास अन् पिळवणूकही**

महिलांच्या गुलामीचे प्रयत्न जसे एकीकडे होत होते, तसे त्यांच्या मुक्तीचेही प्रयत्न होत आहेत. आपल्या देशात आधुनिक विचारांची आणि स्त्रीमुक्तीची परंपरा आहे. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी ती मोठी परंपरा आहे. व्यवस्थेनं स्त्रीला शूद्रातिशूद्र ठरवलं. व्यवस्थेनं तिला सती जाण्यास भाग पाडलं, तर रॉय यांनी तिला जळत्या चितेबाहेर काढलं. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षण सक्तीचं केलं. स्त्रियांना सन्मानाच्या नोकऱ्या दिल्या. पुनर्विवाहांना, आंतरजातीय विवाहांना मान्यता दिली. स्वत:च्या बहिणीचा आंतरजातीय विवाह करण्यासाठी पुढाकार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल लिहिलं. ते फेटाळलं गेलं असलं, तरी त्यातून पुढं स्त्रीमुक्तीचा मार्ग मोकळा झाला. राजकारणात महिलांसाठी राखीव जागा आल्या. अजून लोकसभेत त्या यायच्या आहेत. महिला

राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, न्यायमूर्ती, अंतराळवीर, लष्करी अधिकारी, कुलगुरू अशा वेगवेगळ्या पदांवर गेली. राजकारणात तिचं महत्त्व वाढलं. कारण ती म्हणजे देशातले निम्मे मतदार, निम्मं राजकारण असतं. तिच्यासाठी आता रोज सोयी-सवलती आणि उद्धारांच्या घोषणांचा पाऊस होतो. लोणावळ्यात जाऊ, खंडाळ्यात जाऊ ते थेट चंद्रावर जाऊ, असं सांगितलं जातं. ते खरंही आहे. अबलेकडून सबलेकडे असा तिचा प्रवास होताना दिसतो आहे. ही आनंदाची आणि सुखावणारी गोष्ट असली, तरी दुसरीकडे रोज तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या घटनाही पाहायला मिळतात. म्हणजे ती एकाच वेळी विकासाच्या आणि पिळवणुकीच्या वाटेवर आहे की काय, असं वाटायला लागतं.

**कायदे होऊनही अत्याचार सुरूच**

महिलांच्या वाट्याला बहुतेक गोष्टी येत असल्या आणि त्या आवश्यक असल्या, तरी तिची पिळवणूक थांबणार कशी, हा प्रश्न आहे. विकास गोगलगाईच्या गतीनं आणि पिळवणूक प्रचंड वेगानं होत आहे. स्त्री ही केवळ स्त्री आहे म्हणून, म्हणजेच लिंगभेदातून भारतात रोज ऐंशी स्त्रियांचे खून होतात आणि रोज सत्तर बलात्काराच्या घटना नोंदवल्या जातात. रोज सत्तर-ऐंशी म्हणजे तासाला दोन-तीन एवढं हे भयानक प्रमाण आहे. बसमध्ये, विमानात, जहाजात, धर्मस्थळात, शिक्षण क्षेत्रात कुठंही आणि कुणावरही बलात्कार होतात. खुनामागं लैंगिक संबंध, चारित्र्य वगैरे कारणं आहेत. शेतात, नोकरीच्या ठिकाणी, कोर्टात कुठंही तिची पिळवणूक होत असते. बालिकांवरील अत्याचारांत वाढ होत असते. बलात्कार करणाऱ्याला फाशीची शिक्षा आणण्यात आली, घरगुती हिंसाचार रोखणारे कायदे करण्यात आले, पिळवणुकीची व्याख्या व्यापक करण्यात आली, तरी गुन्हे काही थांबायला तयार नाहीत. यामागचं मुख्य कारण म्हणजे व्यवस्था आजही महिलेला पिळवणूक करण्याचं एक हक्काचं साधन मानते. दुभंगलेल्या मनाची ही व्यवस्था आहे. स्त्रीला स्वातंत्र्यही द्यायचं; पण तिच्यावरचा मालकी हक्कही सुरक्षित ठेवायचा, असा हा प्रकार आहे. स्वातंत्र्य देऊन भागत नाही, तर ते उपभोगण्याची व्यवस्थाही तयार करावी लागते. नुसतंच ज्ञानी बनवून चालत नाही, तर ते ज्ञान स्वेच्छेनुसार वापरण्याची मुभा द्यावी लागते. 'सातबारा'वर नुसतंच नाव आणून चालत नाही, तर त्या मालमत्तेचा वापर स्वेच्छेनुसार करण्याचं स्वातंत्र्य लागतं. नुसतंच शिक्षण देऊन चालत नाही, तर हवं ते शिक्षण घेण्याची मुभा लागते. नुसतंच नोकरी देऊन चालत नाही, तर कर्तबगारी व्यक्त करण्याची संधीही द्यावी लागते. तसं घडलं नाही तर फक्त देखाव्यातला सन्मान मिळतो, पण आत्मसन्मान काही मिळत नाही. माणसाला सारं काही मिळालं, पण आत्मसन्मान नाही मिळाला, तर जे मिळालं त्याला अर्थ उरत नाही. तो एक देखावा ठरतो. वरच्यानं खालच्यासाठी व्यक्त केलेली दया ठरते. आत्मसन्मानाशिवायचा माणूस शेवटी मानसिक गुलामच ठरतो. प्राणी आणि माणसातला फरक संपून जातो.

**आत्मसन्मानाच्या लढाईकडे जाण्यासाठी**

जगभर ज्या महिलामुक्तीच्या लढाया सुरू आहेत, त्यामागील काही कारणंही आता बदलत आहेत, काही नवी येत आहे. माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य द्या, देवाचं नाव उच्चारण्याचं स्वातंत्र्य द्या, भक्तिस्वातंत्र्य द्या, मतस्वातंत्र्य द्या, विवाहस्वातंत्र्य द्या, जगण्याचं स्वातंत्र्य द्या अशा अनेक टप्प्यांवरून या चळवळी सुरू आहेत. त्या पुढंही सुरू राहणार आहेत. या चळवळींत त्यांच्या वाट्याला शेवटचं स्टेशन यायला हवं ते आत्मसन्मानाचं! स्त्री मुळातच चिवट असते. तिच्यात जगण्याची आणि व्यवस्थेत टिकून राहण्याची ऊर्जाही प्रचंड प्रमाणात असते. तिला वजा करून कधी समाज आणि माणसाची मांडणी करता येत नाही. ती यापुढंही लढत राहणार आहे. जी स्वत:शी, व्यवस्थेशी लढते, तीच तर स्त्री असते. आता तिला आत्मसन्मानाचं शिखर दिसत असावं. दिसायला हवं. ते दूरवर असलं तरी ती तिथं स्वत:च्या शक्तीच्या जोरावर पोहोचणार आहे. तिला हवा तसा समाज ती तयार करणार आहे. कारण पूर्वी तिनं स्वत:चाच समाज तयार केला होता. मातृप्रधान समाज! तो व्यवस्थेनं हिसकावून घेतला. भ्रष्ट केला आणि गुलाम तयार केले. स्त्रीनं तयार केलेला समाज गुलाममुक्त असतो. स्त्रीमुक्ती दिनासाठी तिला शुभेच्छा द्यायला हव्यात आणि आत्मसन्मानाच्या लढाईकडे जाण्यासाठी बिगूलही वाजवायला हवं. हिरवा झेंडा दाखवायला हवा. स्त्रीमुक्तीचा दिन कितीतरी वर्षे तेच तर सांगतो आहे. ●●●



# बिनसुट्टीची एकमेव शाळा



**प्रकाश खंडेलोटे**

**कोणतीही आणि कधीही सुट्टी न घेता कर्डेलवाडीची जिल्हा परिषद शाळा देशातील एकमेव अशी बिनसुट्टीची शाळा आहे. ती पाहण्यासाठी देश-विदेशातील साडेतीन लाखांवर लोकांनी या शाळेला भेट दिली आहे.**



बेबीनंदा सकट



दत्तात्रय सकट

पुणे शहरापासून ७० कि.मी. अंतरावर पुणे-अहमदनगर हमरस्त्यालगत असलेली कर्डेलवाडीची द्विशिक्षकी जिल्हा परिषद शाळा केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशभरात गाजते आहे. रविवारी, सणावाराला कधीही बंद न राहणारी अर्थात, वर्षातले ३६५ दिवस सुरू राहणारी ही शाळा देशातील एकमेव अशी बारमाही शाळा आहे. सकट शिक्षक दाम्पत्याने मागील दोन दशकांमध्ये परिश्रमपूर्वक या शाळेला नावलौकीक मिळवून दिला. गुणवत्तापूर्ण शाळा म्हणजे काय, याचा एक आदर्शच त्यांनी घालून दिला आहे.

**शाळा पाहून शिक्षिकेला आलं होतं रडू**

दत्तात्रय सकट आणि त्यांच्या पत्नी बेबीनंदा सकट हे शिक्षक दाम्पत्य बदली होऊन २००१ मध्ये कर्डेलवाडीच्या शाळेत रुजू झाले, तेव्हा मोडकळीस आलेलं छप्पर, वीज, पिण्याचं पाणी आणि फर्निचरचा अभाव, तुटलेलं गेट, फुटलेली कौले, भेगाळलेल्या भिंती असं शाळेचं चित्र होतं. मोडकळीस आलेल्या या शाळेत अक्षरशः सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर होता. शाळेचं अस्तित्व दाखवणारी एकही गोष्ट अस्तित्वात नव्हती. शाळेचं हे एकूण स्वरूप पाहता गावकरी या शाळेला मसणवटीची शाळा म्हणायचे. शाळेत त्यावेळी ४० मुलं शिकत होती. पण त्यातल्या ९० टक्के मुलांना धड लिहिता-वाचताही येत नव्हतं. मुलांमध्ये शिक्षणाबद्दल आस्था नसल्यानं शिक्षणाचं कसलंही वातावरण तिथं नव्हतं. हे विदारक चित्र पाहून बेबीनंदा सकट यांना अक्षरशः रडू कोसळलं. पण शाळेच्या या दुरवस्थेबद्दल कुढत न बसता सकट दाम्पत्याने कंबर कसली आणि मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच शाळेचा चेहरामोहरा बदलायला हवा, असा मनाशी चंग बांधून कामाला सुरुवात केली. स्वतः कौले आणून शाळेच्या छताची दुरूस्ती केली. सिमेंट लावून भिंतीच्या भेगा बुजवल्या. यासाठीचा खर्च स्वतःच्या पगारातून ते करू लागले. काही जाणकार पालकांनी पुढे येऊन मदतीचा हात दिला. हळूहळू गावात शैक्षणिक वातावरण निर्माण होऊ लागलं.

आपण स्वतःचे घर जसे सजवतो, तसे ते मुलांच्या मदतीने शाळा सजवू लागले. मुलांनी इवल्याइवल्या हातांनी भिंती रंगवल्या,



शाळेसमोरील रस्ता नीट केला. शाळेसमोरून जाणाऱ्या नळाला पाईप जोडून एका पालकाने स्वतः शाळेत पाण्याची व्यवस्था करून दिली. (आज ती व्यक्ती हयात नाही; पण तिची मुले परदेशात उच्च शिक्षण घेत आहेत.)

**चार वर्षे सुरू होती १४ तास शाळा**

मुलांना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी गावकऱ्यांच्या मदतीने सकट शिक्षक दाम्पत्याने शाळेची वेळ वाढवण्यासह काही ठोस पावले उचलली. पहिली चार वर्षे शाळेची कार्यालयीन वेळ सकाळी ८ ते रात्री १० अशी ठेवली. ४ तास शाळा दुरूस्ती-देखभालीचे काम; तर १० तास अध्यापन, अशी कामाची वर्गवारी असायची. ग्रामशिक्षण समितीच्या बैठका या कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त रात्री ८ ते १० दरम्यान व्हायच्या. त्यामुळे सर्वांना यात सहभाग घेता येई. या गावचे बहुतांश पालक शेती आणि पशूपालन करणारे, शेतमजूर आणि हमाली या कामावर गुजराण करणारे आहेत. ते दिवसभर कामात व्यस्त असल्यामुळे रात्री किंवा शनिवारी सकाळी लवकर चावडीवाचनाचा कार्यक्रम घेऊन त्या माध्यमातून मुलांची गुणवत्ता त्यांना कळू लागली. गुणवत्तावाढीसाठी महिला मेळावे घेऊन त्यात महिन्यातून दोनदा चर्चासत्राचे आयोजन केले जाई. ज्यादा तासिका घेतल्या जायच्या. कोणत्याही दिवशी सुट्टी घेतली जात नव्हती, आजही घेतली जात नाही. शाळेच्या उपक्रमांना पालक, विद्यार्थी आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत गेला. २००१ ते २००३ या काळात शाळेत रंगरंगोटी, विद्युतजोडणी, शौचालय बांधणी झाली. शैक्षणिक साहित्य, दूरदर्शन संच आणि टेपरेकॉर्डर अशा दृकश्राव्य साहित्याचा वापर अध्यापनात होऊ लागला. क्रीडांगण निर्मितीतून स्वच्छ आणि सुंदर शाळा उभी राहिली. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये ४ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी प्रभावीपणे राबवला जाणारा शाळापूर्व तयारी वर्ग हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सकट यांनी अगदी २००१ पासूनच या शाळेत सुरू केला होता. या प्रकल्पामध्ये औपचारिक शिक्षण दिले जाते. बालकांना गाणी, गोष्टी, नृत्य, खेळ, गप्पांबरोबरच चित्र काढणे, रांगोळी काढणे आणि मणी ओवण्यास शिकवलं जातं. खेळ आणि सहलीतून मुलांवर संस्कार घडविले जातात. ही निर्वर्ग शिक्षणपद्धत आपल्या देशात फार प्रचलित नसली, तरी कर्डेलवाडीच्या शाळेत मात्र गेली २० वर्षे सकट हे गुणवत्तावाढीसाठी हा आगळावेगळा प्रकल्प राबवत आहेत.

**...अन् लोकांचा दृष्टिकोन बदलू लागला**

सकट दाम्पत्यामध्ये शिक्षणाप्रती असलेली आस्था आणि उपक्रमशीलतेमुळे बघता बघता शाळेची दैन्यावस्था जाऊन नवचैतन्यासह शाळा उभी राहिली. बदललेली शाळा पाहून विद्यार्थी खूश झाले. आता ही शाळा त्यांना आपली वाटू लागली, मुलांची हजेरी वाढू लागली. मुलांमध्ये अभ्यासात शिस्त आली. ती आवडीने अभ्यास करू लागली. गटागटाने लिहू-वाचू लागली. मुलांना प्रेरणा मिळावी म्हणून शाळेतर्फे आयोजित कार्यक्रमात वेगवेगळी बक्षिसे दिली जाऊ लागली. यामुळे मुलांमध्ये आनंदाबरोबरच सर्जनशीलता आणि कार्यप्रवणता वाढली. सन २००३ मध्ये शिष्यवृत्ती आणि प्रज्ञाशोध परीक्षेत शाळेतील १०० टक्के विद्यार्थी यशस्वी झाले होते. २००४ ते २०१४ पर्यंत या शाळेतील १०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. यातील अनेकांनी कृतज्ञता म्हणून शिष्यवृत्तीतील काही रक्कम शाळेला भेट दिली. या शैक्षणिक प्रगतीमुळे शाळेकडे, गावाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलू लागला.

**गुणवत्तेत अव्वल, लाखाचा पुरस्कार**

सन २००४ मध्ये शाळेला पुणे जिल्हा परिषदेने आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित केले. २००५ मध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या 'अध्यक्ष चषक' पुरस्कारानेही गौरविण्यात आले. २००६ मध्ये सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमात राज्यात अव्वल आल्याबद्दल महाराष्ट्र सरकारने १ लाख रुपयांचा पुरस्कार शाळेला दिला होता. याच काळात शाळेने व गावाने हगणदारीमुक्त गाव अभियानात झोकून देऊन काम केल्यामुळे 'निर्मलग्राम'चा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. असा पुरस्कार मिळवणारे कर्डेलवाडी हे शिरूर तालुक्यातील पहिलेच गाव ठरले. अनुकरणशील आणि लोककल्याणकारी उपक्रम राबविल्याबद्दल सन २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या काळात शाळेला शासनाचे १२ पुरस्कार, तर गावाला तंटामुक्तगाव, निर्मलग्राम, वनग्राम असे विविध पुरस्कार मिळाले.

**पटसंख्या तिपटीने वाढली**

एकमेकांच्या शैक्षणिक उपक्रमांची देवाणघेवाण करण्यासाठी ही शाळा २००८ पासून ब्रिटिश कौन्सिलशी संलग्न करण्यात आली आहे. नकाशावर नसलेलं गाव आता शैक्षणिक प्रगतीमुळं नकाशावर आलं. सकट दाम्पत्यामध्ये असलेली जिद्द, विद्यार्थ्यांप्रती सहृदयता, जिव्हाळा, शिक्षणावर असलेलं प्रेम, संवेदनशील मनं यामुळं गाव, शाळा, विद्यार्थी बदलत गेले. या शाळेत प्रामुख्याने दगडखाण कामगारांची मुलं मोठ्या संख्येनं आहेत. इतर मुलांपेक्षा ती अभ्यासात हुशार आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ४० वरून १५० पर्यंत पाहोचली आहे. विशेष म्हणजे, गुणवत्तेत अग्रेसर म्हणून या शाळेत जैन समाजाचीही मुले शिकतात. सुट्टी न घेता वर्षभर चालणारी शाळा गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबवत असते. मुलांमधील स्वयंशिस्त, अध्यापनाचे अद्भूत तंत्र, शेवटच्या विद्यार्थ्याला बरोबर

### एनसीईआरटीकडून दखल

कर्डेलवाडीच्या शाळेने गुणवत्तावाढीसाठी राबवलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी देशपातळीवर करण्याचा विचार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) करीत आहे. एनसीईआरटीने राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचालक कार्यालयाशी याबाबत पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार, एनसीईआरटीच्या सर्वेक्षण विभागाचे डॉ. विशाल पजानकर यांच्या नेतृत्वाखालील पथक लवकरच या शाळेला भेट देणार असून ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्याशी चर्चा करून अहवाल एनसीईआरटीकडे दाखल करणार आहे.

घेऊन जाण्याचे कसब, गतिमंद मुलांकडे विशेष लक्ष, अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्याला त्याच्या सहअध्यायाकडून मदत, त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण, सकारात्मक दृष्टिकोन, विद्यार्थ्यांप्रती स्नेहभाव हे या शाळेच्या गुणवत्तेचे रहस्य आहे. शाळेत साफसफाई असेल किंवा एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करणे असेल, यात सर्वच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.

**नैतिकतेचेही धडे दिले जातात**

मुलांवर श्रमसंस्कारांबरोबरच नैतिकतेचेही धडे दिले जातात. सर्व मुलं एकत्रित भोजन घेतात. एखादा मुलगा जेवणचा डबा आणला नाही, तर इतर सारेजण त्याला जेवू घालतात. डबा का आणला नाही याची चौकशी करतात. ती एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. गरीब-श्रीमंत, जात-धर्म असा भेद लहान मुलांमध्ये रुजला जाऊ नये म्हणून त्यांना नीतिमूल्यांवर आधारित माहितीपट दाखवले जातात. अगदी कोवळ्या वयातच त्यांना कौटुंबिक आणि सामाजिक प्रश्न समजावेत म्हणून शाळेत चर्चासत्रे घेतली जातात. यामध्ये मुलं आपली मतं आणि घरातील प्रश्नही मांडतात. प्रश्नांना कसे सामोरे जायचे, ते कसे सोडवायचे यावर ती त्यांची मतं मांडतात. यातून मुलांची सामाजिक प्रश्नांबद्दलची जाण अधिक प्रगल्भ होऊन त्यांच्यात प्रेम आणि सद्भाव रुजण्यास मदत होते आहे.

**गुणवत्तेचा आलेख उंचावत चाललाय**

शाळेच्या गुणवत्तेचा आलेख वरचेवर उंचावत असून पहिलीचा विद्यार्थी चौथी-पाचवीची गणित सोडवतो, तर बालवर्ग आणि पहिलीतील मुलगा भारतीय संविधानातील कुठलेही पान वाचतो. गुणवत्तेचा स्तर राखताना इथं प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता पाहून त्याला अध्ययनासाठी मदत तर केली जातेच, त्याचबरोबर मनोधैर्य व आत्मविश्वास वाढवण्यासाठी सतत प्रयत्न केले जातात. अभ्यासक्रम, पाठ्यक्रम या बाबी विद्यार्थ्यांसाठी असल्या तरी पहिलीच्या विद्यार्थ्याला चौथी-पाचवीच्या गणिताचा अभ्यास करायचा असेल, तर त्याला तशी संधी दिली जाते. या शाळेत परिघाबाहेरील शिक्षण पद्धतीचा अवलंब सातत्याने केला जातो. पहिलीच्या विद्यार्थ्यांना अपूर्णांक शिकवायचं म्हटलं तर त्यांना काही नवल वाटत नाही. चार-पाच दिवसांत विद्यार्थी ते शिकून घेतात. इथं अन्य शाळांपेक्षा भिन्न म्हणजे नवनवीन शिकणं चालू असतं. त्यामुळं सारं शिकून घेण्याची कुवत मुलांमध्ये विकसित झाली आहे.

**ग्रामविकासातही शाळा पुढे, शाळेच्या विकासासाठी ग्रामस्थांचं योगदान**

शैक्षणिक गुणवत्ता वाढीबरोबरच ग्रामविकासातही शाळेने खारीचा वाटा उचलला आहे. जलसाक्षरता अभियान, महिला उद्बोधनवर्ग, महिला बालआरोग्य मेळावे, पर्यावरण संवर्धन, घर तिथे परसबाग, जीवजंतू प्रतिबंधक उपाययोजना, ग्रामस्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन, शिवार भेटी, प्लास्टिकमुक्त गाव, आदर्श गाव भेटी अशा अनेक उपक्रमांमधून शाळेची नाळ गावाशी जोडली गेली आहे. त्यामुळे गावकऱ्यांनाही शाळा आपलीशी वाटू लागली. त्यातून मदतीचे हात पुढे आले. कुणी पंखा दिला, कुणी टीव्ही, कुणी फर्निचर, कुणी दिवे, कुणी पाणी शुद्धीकरण मशिन, चहा-कॉफी मशिन, वजनकाटा, सोळा लॅपटॉप, प्रिंटर, दीड लाख रुपये खर्च करून बोअरवेल अशी मदत केली. दगड फोडणाऱ्या हातांनीही शाळा डिजिटल करण्यासाठी म्हणून एक लाख रुपयांची मदत केली. गावकऱ्यांच्या मदतीने शाळेत सोलार सिस्टीमही उभारण्यात आली. प्रत्येक वर्गात इन्व्हर्टर, ५० इंची स्मार्ट टीव्ही आणि प्रत्येक वर्गासाठी एकाचवेळी स्वतंत्रपणे इ-लर्निंग अनुभवता येईल अशी व्यवस्था ग्रामस्थांनी केली. यात पुण्याची चैतन्य सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, स्माईल फाऊंडेशन, मुंबई व एव्हरी डेनिसन कंपनीचेही बहुमोल योगदान लाभले. शाळेच्या विकासासाठी शासनाच्या मदतीची गरज पडली नाही. शाळेविषयी वृत्तपत्रात छापून आलेल्या बातम्या आणि मासिकांमधील माहिती अनेक वाचून दानशूर मंडळींनी मदतीसाठी धनादेश पाठवले.

**शाळाबाह्य मुलं शिकू लागली, शाळेला हातभार लावू लागली**

इथल्या प्रत्येक मुलाला समजून घेतलं जातं. त्याला मुक्तपणे शिकायला आणि जगायला मिळतं. नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. आपल्या भावभावनांची इथं कदर होते, चांगल्या कामाला बक्षिसं मिळतात म्हणून मुलं शाळेकडं वळली. सण-उत्सव शाळेतच साजरे होऊ लागले. सणाला कधी मिठाई, तर कधी गोड जेवणं मिळू लागलं. त्यामुळं ही शाळा, शाळा न राहता आपलं घरच आहे ही कल्पना मुलांच्या मनात घर करून राहिली. दगडखाण कामगारांच्या मुलांना मातीत, दगडात रमण्यापेक्षा शाळा आपली वाटू लागली.

## सनदी अधिकारी, माजी विद्यार्थ्यांसह साडेतीन लाख लोकांची भेट

कर्डेलवाडीतील शाळेच्या प्रगतीने अनेकांनी तोंडात बोटं घातली आहेत. शिक्षक, शिक्षणाधिकारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार, विदेशी नागरिकांसह जवळपास साडेतीन लाख लोकांनी शाळेला भेट देऊन शैक्षणिक प्रगतीची वाहवा केली. सामान्य नागरिकांनाही या शाळेचे मोठे कौतुक. गायकवाड अण्णा म्हणून ओळखले जाणारे ७० वर्षीय गृहस्थ चक्क उन्हाळ्यात पाच किलोमीटर पायी येऊन शाळेला भेट दिली आणि प्रगतीचं तोंडभरून कौतुक केलं. राज्याचे तत्कालीन शिक्षण संचालक महावीर माने यांनी शाळेला खास भेट देऊन शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या सकट दाम्पत्याला शुभेच्छा दिल्या. २००५-२००६ मध्ये पुण्याचे तत्कालीन विभागीय आयुक्त डॉ. नितीन करीर यांच्यासह विभागातील आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शाळेला भेट दिलेली आहे. प्राचार्य प्रकाश बोकील यांनी तर बालमित्रांसोबत एक दिवस घालवला. महाराष्ट्रात विविध पदांवर कार्यरत असलेले शाळेचे माजी विद्यार्थी आवर्जून शाळेला भेट देतात. विद्यार्थ्यांसाठी खाऊ आणतात, त्यांच्याशी गप्पा मारतात, त्यांना एखादा विषय शिकवतात, खेळ शिकवतात, आपले अनुभवही सांगतात. अनेक अधिकारी खाजगी वाहने करून ७०० ते ८०० किलोमीटरवरून आले. चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधूनही आलेल्या अनेकांनी शाळेच्या प्रगतीबद्दल गौरवोद्गार काढले.

शाळाबाह्य मुले आता शिक्षणप्रवाहात आल्यामुळं त्यांनी दरिद्री अवस्थेतही शाळेला भरभरून दान दिलं. त्यांच्या मदतीनं शाळा डिजिटल झाली.

**पुरस्कारांनी सकट दाम्पत्याच्या कामाचा गौरव**

न्याय, समता, मानवता केंद्रस्थानी ठेऊन नवसमाजरचनेसाठी सद्सद्विवेकबुद्धी असणारे विद्यार्थी घडवण्याच्या हेतूने सकट दाम्पत्य काम करत आहे. शैक्षणिक विकासात दिलेल्या योदानाबद्दल बेबीनंदा सकट यांना राष्ट्रीय पुरस्कार तर दत्तात्रय सकट यांना राज्य पुरस्कार मिळाला आहे. संस्कारक्षम विद्यार्थी घडवणाऱ्या या शिक्षक दाम्पत्याला विविध संस्था आणि संघटनांचे जवळपास ४०० पुरस्कार मिळाले आहेत.

**अशिक्षित अन् श्रमिक पाल्यांना शिक्षणाचं अधिक महत्त्व**

शिक्षणाबाबत समाजात असलेल्या जागृतिविषयी बोलताना दत्तात्रय सकट सांगतात, माझ्या ३१ वर्षांच्या अध्यापनाच्या काळात शिकली-सवरलेली अशी पालक मंडळी भेटली, जी पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल अनभिज्ञ होती. आपल्या मुलाला लिहिता-वाचता येतं का, हेही त्यांना माहीत नसतं. आमच्या शाळेत नव्याने प्रवेश घ्यायला आलेल्या मुलांना लिहायला-वाचायला येत नसल्याचं दिसून आल्यानंतर, तुमचा मुलगा चौथीत शिकतोय तरी त्याला लिहिता-वाचता येत नाही, तुम्ही काय केलं आजवर, असा प्रश्न मी त्यांना करतो तेव्हा ते निरूत्तर असतात. मुलांच्या शिक्षणाबाबत जागरूक नसलेल्या अशा उच्चशिक्षित पालकांच्या तुलनेत, अशिक्षित आणि श्रमिक पालक मुलांच्या शिक्षणासाठी आग्रही असतात, त्यांची जबाबदारी स्वीकारतात. आपलं खडतर आयुष्य त्यांच्या वाट्याला येऊ नये म्हणून प्रयत्नशील असतात, याचा प्रत्यय ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी २३ नोव्हेंबर २०१४ रोजी 'सकाळ'च्या सप्तरंग पुरवणीत 'फिरस्ती' सदरात लेख लिहिल्यानंतर मला आला. 'शाळा एक शाळा' या लेखाच्या माध्यमातून आमची शाळा आणि तिथं चालणाऱ्या ज्ञानार्जनाविषयीची माहिती महाराष्ट्रातील घराघरात पोहोचली. लेख वाचून जसे ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अमेरिकेतील मराठी माणसांचे फोन आले, तसे सोलापूर, औरंगाबाद, बीड, जालना या जिल्ह्यातील दगडखाण कामगार, वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांचेही फोन आले. आमच्या पोराला तुमच्या शाळेत प्रवेश मिळेल का, अशी विचारणा करणारे ते फोन होते. त्यावर, इथं बोर्डिंगची सोय नाही. तुम्हाला घर करून राहावं लागेल, असं मी त्यांना सांगितलं. पोटाला चिमटा काढून मुलांना शिक्षण द्यायचं, अधिकारी बनवायचं असं स्वप्न पाहणारे अनेक श्रमिक, कामगार कर्डे लवाडीकडं धावले. रांजणगाव एमआयडीसीमध्ये काम करीत त्यांनी आपल्या मुलांना आमच्या शाळेत टाकलं, त्यांच्या आयुष्याला दिशा मिळावी म्हणून. ●●●

## हस्ताक्षर, गणिती क्रिया सारे काही अद्भूत

इथल्या मुलांचे हस्ताक्षर असो, डोळे दिपवणारी गणिती क्रिया असो, स्वयंअध्ययन असो की स्पर्धा परीक्षेची (शिष्यवृत्ती आणि प्रज्ञाशोध परीक्षा) तयारी, हे सारे अद्भूत आहे. शाळेला भेट देणारी प्रत्येक व्यक्ती आपल्या नजरेतून शाळा टिपते आणि शेरेबुकात नोंद करते.

## शाळेची मुलं बनताहेत शास्त्रज्ञ, अधिकारी

देशातील एकमेवाद्वितीय अशा गुणवत्तापूर्ण आणि बारमाही शाळेत शिक्षण घेतलेल्या अनेकांची आयुष्ये घडली आहेत. या शाळेचे विद्यार्थी असलेले दोघे पीएचडी मिळवून अमेरिकेत शास्त्रज्ञ म्हणून काम करत आहेत. चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण १०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली असून नवोदय विद्यालय आणि साताऱ्याच्या सैनिकी शाळेत प्रत्येकी एका विद्यार्थ्याने प्रवेश मिळवला आहे. दोन-तीनवेळा चाळणी परीक्षा घेऊन प्रवेश देणाऱ्या पुण्यातील 'ज्ञानप्रबोधिनी'मध्ये आजपर्यंत ४० विद्यार्थी गेले आहेत. एक मुलगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून आयकर अधिकारी, तर एक मुलगी अलीकडेच सीए बनली आहे.



# विचारधारा: वाटा आणि वळणे

समाज बदलणाऱ्या विचारधारांचा प्रवास कसा होता, तो आता कुठे आलेला आहे आणि उद्या त्याचे काय होणार आहे, याचा घेतलेला अभ्यासपूर्ण आढावा... (पूर्वार्ध)



दत्ता देसाई



आज कुटुंबाकुटुंबांमध्ये आणि आपल्या सभोवताली, देशात आणि जगात, आपण एक विशेष परिस्थिती अनुभवत आहोत. अस्वस्थ करणारे आपले हे वर्तमान एका संकटाने घेरलेले आहे. हे संकट कोण सामाजिक व जातीय-धार्मिक आहे म्हणतील, तर कोण हे आर्थिक वा विकासाचे संकट म्हणतील. काहीजण याला पर्यावरणीय संकट म्हणतील, तर काही जणांच्या मते हे संकट नैतिक-मानवीय आहे. याकडे लक्ष वेधणाऱ्या सर्व प्रगतिशील आणि चिकित्सक प्रवाहांची टिंगल उडवून सारे काही आलबेल आहे म्हणणारे प्रस्थापित-उजवे प्रवाहदेखील 'आपण संकटात आहोत' असेच नारे देत असतात-फक्त त्यांच्या मते 'राष्ट्र' वा त्यांचा धर्म हे संकटात असते! थोडक्यात काय तर 'संकट' आहेच. मुद्दा, ते नेमके काय आहे आणि त्या पलीकडे जायचे तर कसे, हा आहे!

या संदर्भात तीन ठळक पैलू महत्त्वाचे आहेत. एक, तीव्र विसंगती व कोंडी यांनी भरलेले वर्तमान 'वैश्विक संकट' याचे स्वरूप काय आहे. दुसरे, आजची सर्वसाधारण वैचारिक स्थितीशीलता आणि प्रचलित ज्ञान-विज्ञानांची अवस्था आणि तिसरे, या परिस्थितीत गेली काही दशके ज्याविषयी बोलले गेले आहे ते 'दुसरे प्रबोधन' काय असायला हवे. तसेच विविध परिवर्तनवादी विचारसरणींच्या व प्रवाहांच्या भूमिका काय असल्या पाहिजेत. विशेषत:, त्या अधिक मूलगामी व क्रांतिकारी होणे का गरजेचे आहे.

**वाढती एकाधिकारशाही**

कोणत्याही संकटात त्यावर मात करण्यासाठी आवश्यक असते सामूहिक भावना आणि एकीचे बळ.

पण आज ते आपण पुरेसे अनुभवतो आहोत का? आजची परिस्थिती नेमकी याच्या विरोधात आहे. एक तर, कोविडचे सामाजिक दुरावा वाढवणारे वातावरण आणि राजकारण हे सध्या संपूर्ण समाजजीवनावर वर्चस्व गाजवत आहे. हा विषाणू आणि ही महामारी हे दोन्हीही खरे आहेत आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक परिस्थिती चिंताजनक आहे, यात शंका नाही. पण या साथीत वापरला जाणारा 'सामाजिक अंतर' (सोशल डिस्टन्सिंग) हा शब्दप्रयोग योग्य नसल्याने त्याऐवजी 'शारीरिक अंतर' हा शब्द वापरावा अशी सूचना आली होती आणि ती योग्यही आहे. विशेषत: आपल्या येथे असलेल्या जातिभेदाच्या व आजही उघड वा छुप्या पध्दतीने ठाण मांडून बसलेल्या 'स्पृश्य-अस्पृश्य' आदी कल्पनांच्या पार्श्वभूमीवर ही सूचना अतिशय महत्त्वाची आहे. मात्र 'सामाजिक अंतर' हे प्रकरण केवळ एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. ते यासह आणखी पुढचे प्रकरण आहे. हे लक्षात घेतले पाहिजे, की हा शब्दप्रयोग होणे हे अपघाताने घडणारे प्रकरण नाही.

सध्याच्या जागतिक भांडवल व्यवस्थेची ती गरज आहे. तिला माणसा-माणसांमध्ये सामाजिक 'अंतर' हवेच आहे. त्यात जात-धर्म व प्रतिगामी परंपरा जितपत उपयोगी पडतील तितपत तिला हे सारे हवेच आहे. त्यासाठी सध्या या व्यवस्थेला केवळ सामाजिक 'अंतर'च नव्हे तर दुरावा व दुरावलेपण हवे आहे. गेल्या काही वर्षांत कोविडचा फायदा घेऊन हे अंतर व दुरावा वाढवण्याचा आटापिटा विद्यमान व्यवस्था करत आहे. या काळात ज्या प्रकारची केंद्रीकरणवादी राजकीय अर्थव्यवस्था आणि लोकशाहीविरोधी राजकारण रेटले जात आहे, त्यासाठी हे आवश्यक बनले आहे.

**जीवनाला विकृत वळण**

दुसरे, गेली काही दशके आपल्या देशातील आणि जगभरातील राजकीयच नव्हे, तर सामाजिक-सांस्कृतिक वातावरण हे उजवा वर्चस्ववाद व नवफासिवाद यांनी ग्रासलेले आहे. समाजात आक्रमक-दहशतीने ध्रुवीकरण आणि हिंसक-द्वेषपूर्ण फाळण्या घडवणे हे याचे वैशिष्ट्य आहे. जनतेची जातिधर्मनिरपेक्ष एकता व सकारात्मक-संघर्षात्मक सामूहिकता ही तुटत-विदीर्ण होत जावी, असे हे राजकारण आहे. हा 'उजवा' प्रवाह आतून भेदरट आणि बाहेरून सकारात्मक सामूहिकता तोडायची आणि दुसरीकडे समूहांचे रूपांतर झुंडशाहीत करायचे आणि त्याची सांगड एकाधिकारशाहीशी घालायची, असे घातक राजकारण तो करतो आहे. देशात गेली दीड-दोन दशके संस्थात्मक आणि संघटनात्मक, मूल्यात्मक आणि बौध्दिक-अकादमिक, शासकीय आणि राजकीय असे सर्वच पातळ्यांवर अध:पतन घडवणाऱ्या प्रवृत्ती वाढत चालल्या आहेत. त्यांना तो आणखी बळकट करतो आहे. एकंदरच सामाजिक-सांस्कृतिक जीवनाला तो अधिकाधिक विपरित आणि विकृत वळण देतो आहे.

हा प्रवाह केवळ नागरी समाजात व राजकीय क्षेत्रात एक प्रवाह म्हणून क्रियाशील आहे असे नाही. त्याने आता राज्यसंस्थेच्या तसेच शैक्षणिक-सांस्कृतिक जीवनाच्या सर्व अंगांवर कब्जा केलेला आहे. या उजव्या-हिंदुत्ववादी शक्ती आणि राज्यसंस्था या दोघांनी मिळून जनतेविरुध्द युध्द पुकारले आहे. उदा. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे अलीकडचे (नोव्हे. २०२१) वक्तव्य आहे : 'नागरी समाज ही युध्दाची नवी आघाडी आहे'! हा इशारा- खरे तर एका अर्थी ही धोरणात्मक दिशा-त्यांनी राष्ट्रीय पोलिस अकादमीत बोलताना दिली आहे. राज्यसंस्था व तिच्या यंत्रणा आणि नागरी समाज या दोघांच्यात द्वैत ठेवणे हा भांडवली-उदारमतवादी व्यवस्थेचा पायाच असतो. पण त्याचे रूपांतर उघड एकमेकांच्या विरोधात इतकेच नव्हे, तर आता 'शत्रुत्वा'त केले जात आहे!



त्यामुळे या 'उजव्या'युतीवर व एकाधिकारशाही-नवफासिवादी राजकारणावर परखड टीका करणे व प्रत्येक पावलावर त्याचा प्रतिकार करणे नि:संशय गरजेचे आहे. पण मुळात उजव्या दमनकारी प्रवाहाचा सार्वत्रिक उदय ज्या परिस्थितीमुळे झाला आहे, त्या परिस्थितीचे काय करायचे हा मुख्य प्रश्न आहे. म्हणजे या मूळ सामाजिक वास्तवाला भिडल्याशिवाय नवफासिवादाच्या रूपात जे मूलभूत सर्वंकष सामाजिक संकट आपल्यावर लादले जात आहे, त्याचा मुळातून निरास होणार नाही. आज सर्वाधिक प्राधान्य हे मूळ सामाजिक वास्तव बदलण्याला दिले पाहिजे. त्या संदर्भात ताबडतोबीचे मुद्दे हाताळले पाहिजेत.

**वर्तमान 'अस्तित्व'संकट : लोक निमूटपणे स्वीकारताहेत?**

सध्याचे संकट हे भांडवली व्यवस्थेत अधूनमधून येणारे 'नेहमी'चे तेजी-मंदीचे केवळ आणखी एक नवे चक्र नाही. हे संकट गुणात्मकदृष्ट्या वेगळे आहे. हे ज्याला 'संरचनात्मक' वा 'युगांतकारी' अरिष्ट म्हणतात त्या स्वरूपाचे आहे. ते सर्वार्थाने सार्वत्रिक व एक सर्वंकष संकट आहे. शंभर वर्षांपूर्वी, पहिले महायुध्द सुरू झाल्यावर रोझा लक्झेम्बर्ग या जर्मन क्रांतिकारी स्त्रीने या युगाविषयी एक महत्त्वाचे विधान केले होते. तिने याकडे लक्ष वेधले होते, की मानवजातीसमोर भयावह रानटी अवस्था अर्थात 'बर्बरावस्था की समाजवाद?' ('Barbarism or Socialism?') असे आव्हान उभे झाले आहे. आजचे संकट हे तेव्हाचे युध्दकालीन संकट आणि १९३० ची जागतिक महामंदी असे दोन्ही मिळून होईल, त्यापेक्षा महाप्रचंड

संकट आहे. निसर्गासह संपूर्ण मानवी अस्तित्वाला त्याने घेरले आहे. त्यामुळे आता आपण 'सर्वनाश की समाजवाद?'('Extinction or Socialism?') अशा अवस्थेला येऊन पोहोचलो आहोत. अशा कडेलोटाच्या अवस्थेकडे जात असतानाच यातून वाट काढण्याची एक जबाबदारी आणि संधी आजच्या पिढीसमोर उभी आहे.

आजच्या या स्थितीत मला माझ्या अगदी नवयुवा अवस्थेत गिरीभ्रमणाने जे शिकवले त्याची आठवण येते. बरीच पायपीट झालेली आहे, एका पाठोपाठ एक अशा अनेक चढणी चढून उंचावर आलेलो आहोत. चढणी संपतात की नाही असा ताण, तरीही बराच आनंददायी शीण आलेला आहे. अजून बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. एका पायाच्या बाजूला भीषण कड्यावरून खाली खोल घसरत जाणारी दरी, तर दुसरीकडे खांद्याला घसटत वर उंच चढत जाणारा कडा, अशी उरात धडकी भरवणारी चिंचोळी आणि घसरती पायवाट. पुढे एकही पाऊल टाकणे शक्य नाही असे वाटत असते, पण इथे जैसे-थे भूमिका अशक्य असते. मागे फिरणे अशक्यच आणि चुकून जमवले तरी तेही तितकेच जिवावर बेतणारे. परतीची वाटही तितकीच धोकादायक. दरीत कोसळण्याचा धोका आहेच. मग पुढे जाणेच श्रेयस्कर. पण हिमतीने आणि चहुबाजूचे भान ठेवत पुढे गेले, की एकदम झपकन समोर येतो विशाल भूप्रदेश, एखादे पठार, मैदान वा विस्तृत दरी आणि दाट हिरवाई.

आजची स्थिती ही काहीशी अशीच आहे. पण कडेलोटाच्या या परिस्थितीत कोंडी फोडून पुढे जाणाऱ्या सामाजिक शक्ती कोणत्या आणि नवे येऊ घातलेले जग कोणते, या प्रश्नांचा वेध घेणे महत्त्वाचे झाले आहे.

जगभरातील आणि भारतातीलही माणसे असे चढ आणि उतार, अशा कोंडी आणि अशी अरिष्टे, सत्ताधारी वर्गाने लादलेल्या अपेक्षा आणि 'डिझाईन्स' यापलीकडील माणसे आहेत. माणसे स्वभावत: सामाजिक, जनसामुदायिक आहेत. ती सर्जनशील-संघर्षशील आहेत. व्यक्ती म्हणून तसेच सामूहिकपणे ती खरोखरी 'स्वातंत्र्यप्रेमी' आहेत. आज जे भय आणि जी दहशत, जी उतरंड आणि एकाधिकारशाही लादली जात आहे, त्याविरोधात जागोजागी माणसे उभी राहताहेत. समाजमाध्यमे, कला, चळवळी आणि रस्त्यावरच्या कृती यातून आपला असंतोष आणि संताप व्यक्त करताहेत.

विस्थापित-स्थलांतरित-निर्वासित-आदिवासी आपल्या जीवावर उदार होऊन अस्तित्वासाठी झगडत आहेत. युध्द, हत्याकांडे, दंगली, दहशतवाद व हिंसाचार याविरुध्द लोक आवाज उठवताहेत. 'नैसर्गिक' आपत्ती, दुष्काळ, हवामानबदल समस्या आणि पर्यावरणीय अरिष्ट या विरोधात जगभर आबालवृद्ध स्त्रीपुरूष उभी राहताहेत. कोरोनासंकट, त्याची हाताळणी आणि आरोग्य व्यवस्थेचे तीनतेरा यापासून ते प्रचलित विकासाचे भीषण दुष्परिणाम याबद्दल आपला असंतोष नागरिक विविध आंदोलनांनी व्यक्त करताहेत. अमेरिकेतील 'ऑक्युपाय वॉलस्ट्रीट' ते 'ब्लॅक लाईव्हज मॅटर' पर्यंतची आंदोलने, लॅटिन अमेरिकेतील जनक्रांत्यांचे प्रयत्न, आफ्रिकेतील आणि पश्चिम तसेच पूर्व आशियातील लोकशाही उठाव ही त्याची ठळक उदाहरणे. भारतातही गेली काही वर्षे बरेच काही घडते आहे. जेएनयू-जमियासह ठिकठिकाणचे विद्यार्थी-विद्यार्थिनी,

## केंद्रीकरणामुळे संकट गंभीर

भांडवलाचे स्वप्न आणि 'व्यवहारवादा'चा मंत्र

आज प्रस्थापित जीवनात सर्वत्र व्यवहारवादाचा प्रभाव आहे. म्हणजे आज जे चालू आहे तेवढेच शक्य आहे आणि तेच कल्याणकारी आहे. आज व्यवहारात जे चालले आहे तेच योग्य आहे आणि तेच सदासर्वकाळ योग्य आहे, असा हा दृष्टिकोन आहे. यापेक्षा जे काही वेगळे असते ते अव्यवहार्य ठरवले जाते. आदर्श, तत्त्वे, मूल्ये, पर्यायी रचना आणि नव्या समाजाची स्वप्ने वगैरे बोलायला ठीक असते, पण ते तेवढेच; त्याला वास्तवात काही अर्थ नसतो! विशेष करून आजच्या एवढ्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात व रोकडा व्यवहार मागणाऱ्या बाजार व्यवस्थेत हे अगदीच निरर्थक झाले आहे, असे मानले जाते. हा व्यवहारवाद सामाजिक व राजकीय, कौटुंबिक व सांस्कृतिक असा सर्वत्र जीवनात प्रभावी झालेला आहे. तो आजच्या भांडवल व्यवस्थेचा झेंडा पुढे नेतो आहे.

सीएए-एनआरसीला विरोध करणारे विविध धर्मीय-प्रांतीय स्त्रीपुरूष, संतप्त युवा आणि कामगार-कष्टकरी, उद्धट-एकाधिकारशाही सरकारला नमवणारे शेतकरी आणि निषेध व्यक्त करणारे साहित्यिक-विचारवंत-कलाकार... असे बरेच काही इथे घडते आहे.

हे वास्तव आहे, की राजकीय प्रतिरोधशक्ती आणि एका अर्थी 'रोगप्रतिकारक'शक्ती हीदेखील केवळ सुट्या व्यक्तिंमध्ये नसते, तर ती सामूहिक असते हे सत्य. या काळात कोरोना-शासकीय दहशत यांच्या भयाला न जुमानता दिल्लीच्या सीमांवर वर्षभर लढणाऱ्या लक्षावधी शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. आपल्या देशातील आणि जगभरातील सामूहिकता पुन्हा एकदा क्रियाशील होते आहे. लोक जेव्हा दहशत आणि निराशा यांचा झाकोळ दूर करताहेत, अशाही काळात आपण जगतो आहोत. मात्र प्रस्थापित समाजजीवनात याला छेद देणारे वेगळेच काही आज घडते आहे.

भांडवल व्यवस्थेचे तिच्या जन्मापासूनचे जे 'स्वाभाविक' गतिशास्त्र आहे आणि तिने हृदयाशी जे स्वप्न कवटाळलेले आहे, ते जागतिकीकरणाच्या पर्वात अगदी उघडपणे समोर आले. या व्यवस्थेची खासियत काय आहे? तर प्रत्येक वस्तू, सेवा आणि व्यवहार हा खरेदी-विक्रीच्या नियमांनी चालावा. बाजारव्यवस्था आणि बाजारस्वातंत्र्य याच्या माध्यमातून अनिर्बंध व निरंतर उत्पादनवाढ होत राहावी. त्याला आधार देणारा निर्गल आणि विध्वंसक चंगळवादी 'विकास' होत राहावा. त्यातून 'सर्वांना' समृध्दी आणि संधी मिळत जाईल, असे म्हणत राहावे. त्यातून आपोआप न्याय, समता, बंधुत्व, मानवी स्वातंत्र्य वगैरे सारे मिळेल असा पोकळ वायदा करत राहावे. संकुचित स्पर्धाभाव हाच स्थायीभाव मानावा. औद्योगिक-नोकरशाही व्यवस्थेतून वर आलेला आणि तिला पोसणारा औपचारिक विवेकवाद हाच 'विवेक' मानावा. यांत्रिक विज्ञानवाद म्हणजे आजचे विज्ञान सांगते तेच सर्वोच्च व उचित असते, असा चिकित्सा न करणारा दृष्टिकोन उचलून धरावा. तज्ज्ञ आणि

**(उर्वरित पान ३५ वर...)**

# महिला पत्रकारांचा आदर्श : कविता देवी

**मुद्रित माध्यम ते डिजिटल माध्यमातील पत्रकारिता असा कविता देवी यांचा दोन दशकांचा प्रवास आहे. महिला, बालके, खाणकामगार, दलित वस्त्या, रस्ते आणि पाणी अशा प्रश्नांना केंद्रस्थानी मानून पत्रकारिता करणाऱ्या कविता देवी देशातीलच नव्हे तर जगभरातील महिला पत्रकारांचा आदर्श ठरल्या आहेत.**



आपल्या देशात अगदी सुरुवातीपासूनच पत्रकारिता क्षेत्रात पुरुषांचीच मक्तेदारी राहिलेली आहे. अलीकडे मात्र मोठ्या संख्येने महिला या क्षेत्राकडे वळत असल्याचे दिसते. त्यातही अभिजन वर्गाचेच वर्चस्व. अशाही स्थितीत उत्तर प्रदेशात जन्मलेल्या एका गरीब दलित शेतकऱ्याच्या मुलीने धाडसी पत्रकारिता करीत या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केलेला आहे. कविता देवी असे या महिला पत्रकाराचे नाव आहे. दलित, आदिवासी महिला तसेच वंचित आणि पीडितांसाठी 'खबर लहरिया' वृत्तपत्राच्या माध्यमातून पत्रकारिता करून कविता देवी यांनी जगभरातील प्रसारमाध्यमांना आपल्या कार्याची दखल घेण्यास भाग पाडले आहे. 'खबर लहरिया'च्या वाटचालीवर दिग्दर्शक सुस्मित घोष आणि सहदिग्दर्शिका रिंटू थॉमस यांनी बनवलेल्या 'रायटिंग विथ फायर' या माहितीपटाला यंदाच्या ऑस्कर पुरस्काराचे नामांकन मिळाले आहे. महिला पत्रकारांसाठी आदर्श ठरलेल्या कविता देवी या यामुळे जागतिक पातळीवर प्रकाशझोतात आल्या आहेत.

**बाराव्या वर्षी लग्न**

उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातील कुंजनपुरवा या छोट्याशा गावातील दलित कुटुंबात कविता देवी यांचा जन्म झाला. घरातील सहा भावंडांमध्ये त्या सर्वात थोरल्या. घरची गरिबी, त्यातच शिक्षणाचा अभाव. त्यामुळे वयाच्या बाराव्या वर्षीच त्यांचे लग्न लावून देण्यात आले. शिक्षण नाही, त्यात लग्न म्हणजे काय हे न कळण्याच्या कोवळ्या वयात संसाराची जबाबदारी त्यांच्यावर आली. दरम्यान, एका स्वयंसेवी संस्थेने त्यांच्या गावात एक केंद्र सुरू केले होते. त्या केंद्रात त्यांनी अभ्यासाला सुरुवात केली. सलग सहा महिने त्यांनी तिथे शिक्षण घेतले. त्याला अर्थातच गावातून, कुटुंबातून विरोध झाला. मात्र कविता देवींच्या प्रबळ इच्छाशक्तीपुढे घरच्या लोकांचा आणि गावाचाही विरोध निष्प्रभ ठरला. पुढे त्यांनी उच्च शिक्षण घेऊन पत्रकारितेतील मास्टर पदवी मिळवली. या छोट्याशा गावातील त्या पहिल्या शिक्षित महिला ठरल्या.

**छोट्या वृत्तपत्रातून पत्रकारितेला प्रारंभ**

समाजात वावरताना आपल्या आजूबाजूचे अनेक प्रश्न त्यांना दिसत होते. पण मांडण्याचे साधन त्यांच्याकडे नव्हते. त्याला कुठेतरी वाचा फोडावी म्हणून कविता देवी यांनी, 'निरंतर'तर्फे चालवल्या जाणाऱ्या 'महिला डाकिया' नावाच्या छोट्या वृत्तपत्रात काम सुरू केले आणि येथूनच त्यांच्या पत्रकारितेला प्रारंभ झाला. पुढे २००२ मध्ये त्यांनी 'निरंतर' या संस्थेच्या मदतीने 'खबर लहरिया' नावाचे पाक्षिक सुरू केले. सुरुवातीला त्यांच्यासोबत सात महिला होत्या. पुरुषप्रधान संस्कृतीने केलेले अन्याय, महिलांवरील लैंगिक अत्याचार पोलीस अत्याचाराचे प्रकार याबरोबरच दलित वस्त्या, रस्ते, पाणी आणि महिलांचे प्रश्न त्यांनी या माध्यमातून मांडले. ग्रामीण भागातील खाण कामगारांची होणारी पिळवणूक आणि त्यातून होणाऱ्या मृत्यूची लपवाछपवीही या महिलांनी उघड केली. अवघ्या दोन वर्षांत त्यांच्या पत्रकारितेने बाळसे धरले. त्यांच्या कामाचे कौतुक होऊ लागले. पुरस्काराच्या स्वरूपात २००४ मध्ये त्या महिलांना चमेली देवी जनपुरस्काराने गौरविण्यात आले. 'खबर लहरिया' सामान्यांचे वृत्तपत्र बनले. अन्याय-अत्याचाराची चीड आणि वंचितांच्या प्रश्नांची चाड असलेल्या अनेक महिला या वृत्तपत्राशी जोडल्या गेल्या. २०१४ पर्यंत या वृत्तपत्राच्या उत्तरप्रदेश आणि बिहारच्या ग्रामीण भागात सहा आवृत्त्या सुरू झाल्या. नंतर पाक्षिक स्वरूपात असलेलं हे वृत्तपत्र साप्ताहिक म्हणून प्रसिद्ध होऊ लागलं. २०१६ मध्ये त्यांनी एक डिजिटल वृत्तवाहिनी सुरू केली.

**भारताकडून ६ चित्रपटांचे प्रस्ताव**

दरवर्षी दिल्या जाणाऱ्या ऑस्कर पुरस्कारासाठी जगभरातून

### कविता देवींनी भूषविली अनेक पदं

कविता देवी यांनी संस्थेत अनेक पदं भूषविली आहेत. २०१९ पासून त्या मुख्य संपादक पदाबरोबरच डिजिटल वृत्तवाहिनीचे प्रमुख पदही सांभाळत आहेत. तिथे त्या 'कविता शो' नावाचा कार्यक्रमही करतात.



अनेक देश चित्रपट पाठवत असतात. भारतातून या वर्षी मरक्कर हा मल्याळम आणि जयभीम, कुळांगल हे तमिळ चित्रपट, मनसानमः हा तेलुगू भाषेतील आणि सोनसी हा हिंदी लघुपट तसेच 'रायटिंग विथ फायर' हा माहितीपट, असे सहा चित्रपट ऑस्कर नामांकनासाठी पाठवले होते. त्यात 'रायटिंग विथ फायर' ने बाजी मारली. 'रायटिंग विथ फायर' हा माहितीपट 'खबर लहरिया' या हिंदी साप्ताहिक वर्तमानपत्राच्या वाटचालीवर आधारित आहे.

**वेबसाईटही सुरू केली**

अवघ्या आठ पानांचं हे वर्तमानपत्र हिंदी किंवा इंग्रजीतून नव्हे तर, अवधी, बुंदेली आणि भोजपुरी या बोलीभाषांमधून प्रसिद्ध केलं जातं. याची खासियत अशी आहे, की हे वर्तमानपत्र फक्त आणि फक्त दलित स्त्रिया चालवतात. वार्तांकन करणं, संपादन करणं, छपाई, वितरण अशा सगळ्या आघाड्या या महिला सांभाळत आहेत. २००२ मध्ये सुरू झालेलं हे वर्तमानपत्र उत्तर प्रदेशासोबतच बिहारमध्येही लोकप्रिय आहे.२०१२ मध्ये 'खबर लहरिया'ने स्वतःची वेबसाईटही सुरू केली. या वेबसाईटवर बोलीभाषेतील बातम्या वाचायला मिळतात. असा प्रयोग करणारी ही एकमेव वेबसाइट आहे. २०१६ मध्ये आपलं स्वतःचं व्हिडिओ चॅनल सुरू करून 'खबर लहरिया'ने डिजिटल मीडिया पत्रकारितेत दमदार प्रवेश केला. हातात लेखनी धरणाऱ्या स्त्रिया आता गावोगावी व्हिडिओ कॅमेरा घेऊन फिरत आहेत. यामध्ये काम करणाऱ्या सर्व स्त्रिया दलित समाजातून आलेल्या आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत शेवटच्या पायरीवर असलेल्या या समाजाला न्याय काय असतो, याची पुरेपूर जाणीव आहे. तीच जाणीव 'खबर लहरिया'च्या निर्भीड पत्रकारितेचा मुख्य आधारस्तंभ आहे. राजकारण्यांनी दुर्लक्षित केलेल्या दुर्गम गावखेड्यांच्या कानाकोपऱ्यात जाऊन या स्त्रिया तिथल्या लोकांशी संवाद साधतात, त्यांचं म्हणणं नुसतं ऐकून न घेता त्यांची भावना त्या परखडपणे मांडतातही. बोलीभाषेतून संवाद साधण्याच्या त्यांच्या शैलीमुळे लोकांनाही खबर लहरियाची पत्रकारिता भावते. समाजाने आपल्या जातीवर, स्त्री असण्यावर लादलेली बंधने झुगारून या स्त्रिया बेधडकपणे आपलं काम करत असतात. खाणकाम करणाऱ्या मजुरांच्या शोषणावर, खाणकाम व्यवसायातल्या भ्रष्टाचारावर प्रश्न विचारताना त्या डगमगत नाहीत. खेड्यातल्या स्त्रियांचं होणारं लैंगिक शोषण 'खबर लहरिया'ने अगदी कसलाही आडपडदा न ठेवता जगासमोर आणले आहे. त्यांच्या बाईपणाच्या वेदनांना मोठ्या धाडसाने वाचा फोडली आहे. त्यामुळे गोरगरीब आणि वंचितांना त्यांच्याप्रती आपलेपणा वाटतो आहे. म्हणूनच पीडित महिलांचे अनेक नातेवाईक, आमचा इथल्या कोणत्याही माध्यमांवर विश्वास नाही, फक्त खबर लहरियाच आमचा वाली आहे, अशा भावना व्यक्त करताना दिसतात.

**ऑस्करला गवसणी**

'खबर लहरिया' न्यायाची भूमिका घेऊन काम करणारी आणि इथल्या पीडितांचं दुःख जाणून घेणारी आणि न्याय मिळवून देणारी संस्था असल्याची खात्री लोकांना पटलेली आहे. २०१५ मध्ये दिग्दर्शक सुस्मित घोष यांना इंटरनेटवर काही फोटो दिसले. भर उन्हात पेपर विकणाऱ्या स्त्रियांचे ते फोटो होते. आणखी खोलात शिरल्यानंतर या स्त्रिया 'खबर लहरिया'साठी काम करतात, असं त्यांना कळलं आणि तेव्हाच त्यांनी या विषयावर माहितीपट बनवायचं ठरवलं. त्यांच्यासोबत रिंटू थॉमस यांनी सहदिग्दर्शिका म्हणून काम पाहिले. जवळपास पाच वर्षे घोष आणि थॉमस खबर लहरियाबरोबर राहून त्यांच्या कामाच्या पद्धतीचा जवळून अभ्यास केला. प्रिंट मिडियापासून सुरू झालेला 'खबर लहरिया'चा डिजिटल मीडियापर्यंतचा प्रवास घोष आणि थॉमस यांनी 'रायटिंग विथ फायर'मध्ये चित्रबद्ध केला आहे. 'खबर लहरिया'चा जन्म कसा झाला आणि त्यातून महिला व बालकांच्या प्रश्नांना प्रेरणास्थानी ठेवून कशा पद्धतीने समाजात एक नवा पायंडा घातला गेला, याच चित्रण या माहितीपटात केलं आहे. सध्याच्या काळात पत्रकार आणि पत्रकारितेला निम्म्याहून अधिक जग हे विविध कारणांसाठी दोषी ठरवत असताना, 'रायटिंग विथ फायर' हा माहितीपट पत्रकार आणि पत्रकारितेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. या माहितीपटातून 'खबर लहरिया'चा थक्क करणारा प्रवास तर पाहायला मिळतोच, शिवाय 'खबर लहरिया'च्या पत्रकारांची संघर्षकथाही जाणून घेता येते.

## आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मान

आपल्या बोलीभाषेतून बातम्या देणाऱ्या 'खबर लहरिया'ला २००९ मध्ये युनेस्कोच्या 'किंग सेजाँग साक्षरता पुरस्कारा'ने गौरविण्यात आले. त्याचबरोबर २०१२ मध्ये टाइम्स नाऊकडून 'अमेझिंग इंडियन' आणि संयुक्त राष्ट्र जनसंख्या कोषकडून 'लाडली मीडिया' हा पुरस्कार देण्यात आला. २०१४ मध्ये जर्मनीत झालेल्या बेस्ट ऑफ ब्लॉग वार्षिक परिषदेत मानाचा 'ग्लोबल मिडिया फोरम पुरस्कार' देऊन 'खबर लहरिया'ला गौरवण्यात आलं. जगभरातल्या पत्रकारितेला आपल्या कार्याची दखल घ्यायला भाग पाडणाऱ्या 'खबर लहरिया'वरील 'रायटिंग विथ फायर' या माहितीपटावर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये कौतुकाचा वर्षाव करण्यात आला. ऑस्करच्या नामांकनासोबतच मानाच्या समजल्या जाणाऱ्या अनेक चित्रपट महोत्सवांमध्ये या माहितीपटाने तब्बल २८ विशेष पुरस्कारांवर आपलं नाव कोरलं आहे. स्वतंत्रपणे सिनेमे बनवणाऱ्यायांना प्राधान्य देणाऱ्या अमेरिकेतल्या सर्वात मोठ्या सनडान्स फिल्म फेस्टिवलमध्ये सर्वाधिक प्रभावशाली डॉक्युमेंट म्हणून 'रायटिंग विथ फायर'ला गौरविण्यात आलं आहे. ●●●

# हिजाब कशासाठी मागता आत्मसन्मान मागा की..



कर्नाटकातल्या काही मुस्लिम पोरींना महाविद्यालयात हिजाब परिधान करण्यास परवानगी नाकारल्यानंतर आंदोलन सुरू झाले. ते नेहमीप्रमाणे देशात ठिकठिकाणी पसरले. मुली हिजाब घालताहेत म्हणून त्यांना आव्हान देण्यासाठी हिंदुत्ववादी पोरांनी खांद्यावर-डोक्यावर भगवे पांघरूण शिक्षण संस्थांत प्रवेश केला. मग सुरू झालं लुटूपुटूचं छोटं धर्मयुद्ध...


उच्च न्यायालयानं हिजाबला तूर्त परवानगी नाकारल्यानंतर आता थोडं वातावरण शांत झालंय. गेल्या सात-आठ वर्षांत वेगवेगळ्या ठिकाणी धर्मवाद जागवणाऱ्या घटना घडत आल्या आहेत. त्यांची आता लाट आली आहे. काही तरी निमित्त घडतं आणि प्रकरण थेट धर्मापर्यंत पोहोचतं किंवा पोहोचवलं जातं. आताही तसंच घडत आहे. कळत-नकळत आपण हळूहळू मूलतत्त्ववादाकडे कसे झुकतो आहोत आणि प्रतिकांना धर्म कसे समजतो आहोत, हे जवळपास कमी अधिक प्रमाणात घडते आहे किंवा जागवले जात आहे, हे आपण तटस्थ होऊन पाहतो आहोत. प्रतिकांचा, चिन्हांचा आणि धर्माच्या मुख्य गाभ्याचा काही संबंध असत नाही. धर्म अधिक विस्तारण्यासाठी, कडवा बनवण्यासाठी काही स्वार्थी लोक मुद्दाम ते करतात आणि राजकारणात त्याचा भरपूर नफा कमावतात. अशा नफ्यांवर आयकर बसत नाही आणि बसला तर त्याचा हिसाब किताब कोणी दाखवत नाही.

तर हा हिजाब मूळ अरबी शब्द. चेहरा झाकून घेण्याचे एक लांब वस्त्र. त्याचा पुढे धर्मग्रंथाशी संबंध जोडला गेला. बुरख्यामागे चेहरा न दाखवणे, नम्रता वगैरे गोष्टी गृहीत धरल्या आहेत. काही देशांत बुरख्याची सक्ती आहे, तर काही देशांत तशी ती नाही. मुस्लिम राष्ट्रांमध्ये पंतप्रधान, अध्यक्षपदावर पोहोचलेल्या काही महिला बुरखा वापरत नव्हत्या हेही जगानं पाहिलं आहे. तर काही ठिकाणी 'बुरखा हटाव'च्या मोहिमाही चाललेल्या होत्या. भगव्या कपड्याचं तसंच आहे. हिंदू धर्माविषयी अभिमान व्यक्त करण्याकरता भगवे कपडे परिधान करावेत असे थेट कोणत्या ग्रंथात लिहिलेले नाही. हिंदूंचे देवही सहसा भगवी वस्त्रे धारण करत नाहीत. धर्माचे भक्त, अनुयायी आपल्या धर्माचा आपण अविभाज्य भाग आहोत यासाठी भगव्यासह अनेक प्रतिकांचा वापर करतात. या साऱ्या गोष्टी मूलतत्त्ववादाच्या लाटेत कोणी कुणाला सांगत नाही. पहिला संघर्ष होतो तो प्रतिकांमध्ये. मग धर्माकडे जाण्याचा प्रयत्न होतो. धर्म अध्यात्माचा, स्वशोधाचा विषय राहत नाही, तर तो प्रतिकांचा भाग बनवला जातो. भारतीय राज्यघटनेत वस्त्रस्वातंत्र्य, आहारस्वातंत्र्य आहे. प्रत्यक्षात या स्वातंत्र्याला गालबोट लागाव्यात अशा घटना घडत असतात किंवा जाणीवपूर्वक राजकीय स्वार्थासाठी किंवा मूलतत्त्ववाद वाढवण्यासाठी किंवा माणसाला धर्मांध बनवण्यासाठी घडवल्या जातात. समाजात धार्मिक वृत्तीच्या माणसांची संख्या कमी असते आणि कर्मकांडाला, प्रतिकांना धर्म समजणाऱ्यांची संख्या अधिक असते. तर मुस्लिम मुलींनी बुरख्यासाठी आंदोलन छेडले. महाविद्यालये बंद पाडली. काही ठिकाणी जाळपोळ झाली. दोन गट एकमेकांना भिडले. भगवा विरूद्ध बुरखा किंवा हिजाब असं चित्र तयार झालं. ते भारतातील सामाजिक, धार्मिक ऐक्यासाठी सुसंगत नव्हतं. धर्मनिरपेक्षतेशी सुसंगत नव्हतं. धर्म हा व्यक्तिगत भाग असतो, या जाणिवेतून सर्वसामान्यांना आता बाहेर काढण्यात आलं आहे आणि तो आता सार्वजनिक ठिकाणी करावयाच्या शक्तीप्रदर्शनाचा भाग बनतो आहे.

मुस्लिम महिलांपुरतं बोलायचं झाल्यास त्या विकासापासून अद्याप लांब आहेत किंवा त्यांच्या विकासाची गती गोगलगाईसारखी आहे. तलाक पद्धतीत त्यांचीच पिळवणूक अधिक झाली. देशातील शिक्षणाचे प्रमाण आणि मुस्लिमांमधील महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण यात खूप अंतर आहे. कसेबसे त्याने दोन अंक गाठले आहेत. शिक्षण घेतलेल्या मुलींना अपवादानेच नोकऱ्या मिळतात. अशा परिस्थितीत त्यांनी आपल्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, ते मोफत मिळावे, नोकऱ्या मिळाव्यात, उद्योगांच्या संधी मिळाव्यात या मागण्या करण्याची आवश्यकता आहे. अशा मागण्या केल्या तर यातून त्यांचा आत्मसन्मान वाढेल. पण हे सारे मुस्लिम मुलींना कोण सांगणार? त्या कधी ऐकणार? बुरखा म्हणजे धर्म नव्हे आणि भगवा रंग म्हणजेही धर्म नाही. तो त्या पलीकडे दूरवर असतो. मनाच्या डोहात खोलवर उडी मारून तो पहावा लागतो, जपावा लागतो. पण असे प्रबोधन आता संपले आहे. त्यासाठी प्रबोधनाची पहाट पुन्हा उगवावी लागणार आहे. पण चेहऱ्यावरचा बुरखा बाजूला करून, रंग बाजूला करून ती पहावी लागणार आहे. तरूण पिढीलाच मूलतत्त्ववादाचे हत्यार बनवले जाते. त्यांना भेडसावणारे प्रश्न सोडवण्याची इच्छा किंवा हिंमत व्यवस्थेत नसते. मूळ प्रश्नावरून त्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी अशा भानगडी काढल्या जातात. ज्या कोणत्याच धर्मानं सांगितलेल्या नसतात.

## गांधी-नेहरूंची निंदा म्हणजेच निवडणूक प्रचार

लोकशाहीमध्ये निवडणुका अटळ आणि निवडणुकांमध्ये प्रचार अटळ असतो. प्रचार म्हणजे मते द्या आणि



मते देऊ नका एवढ्यापुरताच मर्यादित नसतो, तर मते मागणारे कोण आहेत, त्यांनाच मते का द्यायची, ते निवडून आल्यानंतर देश, समाज आणि लोक कसे घेऊन जाणार आहेत, कोणत्या दिशेला घेऊन जाणार आहेत, त्यांना प्रश्न कसे समजतात, प्रश्नांची काय उत्तरे त्यांच्याकडे आहेत, त्यांचा जाहीरनामा काय सांगतो, मतदारांना जबाबदार राहण्याचे त्यांचे मार्ग कोणते, मागच्या वेळी दिलेल्या आश्वासनांचे काय, संसदेत आणि बाहेर त्यांनी कोणती कामे केली, कोणत्या कामांना फळे आली आदींचा तपशील मांडण्याचे कार्य निवडणूक प्रचारात करायचे असते. लोकशाहीत तेच अपेक्षित असते. आपल्याकडे प्रारंभीची काही वर्षे असे चालत होते. निवडून येणारा उमेदवार किंवा सरकारचा प्रतिनिधी असणारा उमेदवार आपल्या मतदारसंघात जाऊन आपल्या कार्याचा म्हणजे केलेल्या आणि करावयाच्या कामाचा अहवाल मांडत असे. प्रश्नोत्तरे होत असत. प्रत्यक्ष लोकशाही असलेल्या स्वित्झर्लंडमध्ये जसे होते तसे काही प्रमाणात आपल्याकडेही होत असे. याला अपवाद फक्त संस्थानिक म्हणजे पूर्वीचे राजेरजवाडे अपवाद असत. आजही तेच अपवाद असतात.

नरेंद्र मोदी सत्तेवर आले आणि प्रचाराचे तंत्र व प्रचारातील आशय बदलला. मोदींचा प्रचार म्हणजे गांधी-नेहरू घराण्याला शिव्याशाप, त्यांची निंदानालस्ती, त्यांना देशाचे दुष्मन आणि खलनायक बनवणे. केवळ प्रचारातच नव्हे तर संसदेतही ते जेव्हा जेव्हा बोलण्याची संधी घेतात म्हणजे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा असेल किंवा देशाला उद्देशून भाषण असेल त्यात फक्त गांधी-नेहरू घराण्याला शिव्याच असतात. मोदींना काँग्रेसमुक्त भारत करायचा आहे आणि त्यासाठी काँग्रेसची पाळेमुळे असलेले गांधी-नेहरू संपवायचे आहेत. परदेशात गेले, की ते म. गांधींच्या, बुद्धाच्या देशातून आलो म्हणतात आणि भारतात परतले, की गांधी-नेहरूंनी देशाची वाट लावली म्हणतात. भाजपमध्ये सर्वत्र वाढत असलेली घराणेशाही लपवून ठेवतात आणि गांधी घराणेशाही टीकेसाठी वापरतात. काँग्रेसने भारताची वाट लावली असे सांगतात. स्वातंत्र्योत्तर काळात जेवढे काही नैसर्गिक आणि अनैसर्गिक प्रश्न आले त्यास ते काँग्रेसला जबाबदार धरतात. देशाची फाळणी असेल, दुष्काळ असेल, दारिद्र्य असेल, पंजाब-काश्मीरमधील दंगली असतील, लाहोर पाकिस्तानला मिळणे असेल, दरडोई उत्पन्न असेल सारे काही काँग्रेसमुळे घडले असे कसलाही पुरावा न देता ते सांगतात. कशाचाही संबंध कशाशीही जोडतात. कोणताही प्रसंग असो, काँग्रेसलाच ते लक्ष्य करतात. लता मंगेशकरांना श्रद्धांजली वाहताना काँग्रेस सरकारने हृदयनाथ मंगेशकरांवर अन्याय कसा केला हे सांगतात. एकूण काय तर काहीही करून काँग्रेसला गाडायचे, एवढाच त्यांचा निवडणूक प्रचार होता. कोणी त्यांच्याकडे पुरावा मागत नाही आणि मागितलेच तर तो राष्ट्राचा अपमान होतो. २०५० पर्यंत देशाला हिंदू राष्ट्र करायचे या भावनेने हिंदुत्ववादी पेटून उठले आहेत आणि या आड येणाऱ्या सर्वांना ते निवडणूक प्रचारात लक्ष्य करत होते. उत्तर प्रदेशात योगी ८०-२० आकडा मांडत होते. ८०-२० म्हणजे ८० टक्के हिंदू आणि २० टक्के मुस्लिम. पंजाबात मोदी तेथील हत्याकांडाला काँग्रेस कशी जबाबदार होती, हे सांगत होते आणि त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत गुजरातमध्ये झालेल्या मुस्लिमांच्या कत्तलीला कोण जबाबदार याविषयी मौन पाळत होते. अयोध्येतील हिंसाचारास कोणता पक्ष जबाबदार होता हेही लपवत होते. वर्षभर चाललेल्या शेतकरी आंदोलनात मरण पावलेल्या हजारभर शेतकऱ्यांच्या मृत्यूस कोण जबाबदार हेही लपवत होते आणि शेवटी गंगा नदीत कोरोनाग्रस्त रोग्यांची मढी सडून-कुजून गंगेत तरंगत होती तेव्हा ते कोणत्या पक्षाचे सरकार होते आणि त्याच पक्षाला मते द्या असे का सांगतो आहोत याविषयी भाष्य करत नव्हते. काँग्रेसने म्हणजे महाराष्ट्रानेच कोरोना पसरवला असा आरोप करताना, कोरोनाकाळात गोऱ्या ट्रम्प साहेबांच्या प्रचारासाठी लाखो लोक कोणी जमा केले यावरही ते मौन बाळगत होते. लोकांच्या प्रश्नांवर कोणी काहीच बोलत नव्हतं. मतदारांनी आपल्यालाच मते द्यावीत यासाठी कोणी मोफत वीज, कोणी मोफत लॅपटॉप, कोणी मोफत स्कुटी देण्याचे आश्वासन फेकत होते. खरे तर, निवडणूक आयोगाने अशा गोष्टींना म्हणजे मतदारांच्या पवित्र मतावर भ्रष्टाचाराची सावली टाकणाऱ्या गोष्टींना रोखायला हवं. एखाद्या उमेदवाराने मतासाठी कोंबडी दिली म्हणजे भ्रष्टाचार आणि आमचे सरकार आल्यावर पोल्ट्री देऊ म्हणणाऱ्यावर पांघरूण. रतन खत्रीने आकड्याचा खेळ केला की मटका आणि तोच शासनाने केला की लॉटरी. गुन्हेगार जमातींनी किंवा अन्य कोणी गाळली की हातभट्टी आणि तीच हातभट्टी सरकारने पेटवून तयार केली की दारू.. हा सर्व विरोधाभास राजकीय लोक प्रचारात आश्वासने देताना व्यक्त करतात. पण त्यांना विचारणार कोण? ज्याच्या हाती ससा तो पारधी. तर पाच राज्यांसाठीचा निवडणूक प्रचार अशा गोष्टींनीच रंगला. निवडणूक सभांमध्ये कसलेही आरोप केले जावेत, देशाच्या शिल्पकाराविषयी,

राष्ट्रपित्याविषयी यांनी काहीही बोलावं आणि जनतेने ते मोकाटपणे ऐकावं, असा हा प्रकार आहे. जोपर्यंत जनता सोशिकाची भूमिका घेणार, तोपर्यंत हे असेच चालणार आहे. जनतेपैकी कोणीही हिंदू राष्ट्र कधी मागितलं नाही. प्रोटिन्स किंवा सकस आहार म्हणून हिंदुत्व मागितलेलं नाही. जे मागितलेच नाही ते हे सत्ताधारी द्यायला निघाले आहेत. लोकांनी आपली ओंजळ बंद करायला हवी.

## अब तक सतरा करूनही पुन्हा बनतोय नवरा...

आपल्या देशात एकीकडे महिला सक्षमीकरणासाठी रोज कायदे, तिच्या आत्मसन्मानासाठी रोज समित्या, आयोग, तिच्या आरोग्यासाठी नव्यानव्या तरतुदी केल्या जात आहेत आणि ही चांगली गोष्ट आहे. या सर्व विकासासाठीच्या वाटा आणखी विस्तारत नेऊन आपला निम्मा भारत अधिक सुंदर केला पाहिजे. निम्मा भारत म्हणजे ७५ कोटी महिला. हे सारे एकीकडे आशादायक घडत असताना याच निम्म्या जगावरचे अन्याय-अत्याचारही रोज वाढत असतात. नव्यानव्या अन्यायाची आणि पिळवणुकीची भर त्यात पडत असते. कधी गर्भलिंग चाचणी, कधी गर्भाशयातच अर्भकाचे मृत्यू, कधी कुपोषण, कधी बलात्कार तर कधी केवळ महिला म्हणून अन्याय-अत्याचार होतच असतात. सर्वात जास्त पिळवणूक होते ती विवाहाच्या वेळी. प्रत्येक पुरूषाला स्वच्छ, सुंदर, कर्तबगार, कोवळी पत्नी पाहिजे असते. छुपा किंवा अछुपा हुंडा पाहिजे असतो. लग्नानंतरही तिच्या माहेरकडून सासरच्या अपेक्षा वाढलेल्या असतात. शिवाय चारित्र्याच्या पात्रता तिनेच पूर्ण करायच्या असतात. या साऱ्या कोंडमाऱ्यात अनेकदा महिला बळी ठरतात. त्यातही वय वाढले म्हणून लग्न न होणाऱ्या, घटस्फोटीत, परित्यक्ता आदी महिलांचा जास्त भरणा असतो. या अगतिकतेचा फायदा घेण्यात पुरूष मागे नसतात. असाच फायदा ओडिशातील रमेशचंद्र स्वाई याने उठवला. स्वतःविषयी खोटीनाटी माहिती देत त्याने एक नव्हे तर सतरा महिलांशी वेगवेगळ्या ठिकाणी विवाह केले. या महिलाही वेगवेगळ्या राज्यातील आहेत. दिल्लीतल्या एका शिक्षिकेशीही त्यानं लग्न केलं होतं. ही दहावी-बारावी पत्नी. पण तिच्या लक्षात नवऱ्याचा पराक्रम आला. आपण फसलो गेलो आहोत याची खात्री तिला झाली आणि तिनं या महापराक्रमी नवऱ्याविरूद्ध पोलिसात तक्रार केली. तक्रारीनंतर बरेच दिवस बेपत्ता झालेला हा नवरोबा अखेर कायद्याच्या कचाट्यात सापडलाच. तो मी नव्हेच असे म्हणण्याची संधी त्याला मिळाली नाही. कारण तो तोच आहे असे सांगत त्याच्या अनेक पत्नी पुढे आल्या. सगळ्याच्या सगळ्या म्हणजे १७ पत्नी पुढे येणार आहेत आणि नव्यानं जाळ्यात अडकू पाहणाऱ्या आणि तसा प्रयत्न झालेल्याही पुढं येणार आहेत. रंगा अंगानं बऱ्यापैकी असलेला, ओठावर साखरेचं पोतं ठेऊन बोलणारा, आपण केंद्र आणि राज्य सरकारमध्ये खूप मोठ्या पदावर आहोत अशी भूल देणारा आणि वयाच्या सहासष्ठाच्या वर्षीही तरूण दिसण्याचा प्रयत्न करणारा हा नवरोबा आहे. जिच्याशी लग्न केले, तिचा लैंगिक उपभोग तर घेतलाच; शिवाय तिच्याकडची संपत्तीही हडप केली. एकीकडची संपत्ती संपत आली की दुसरीसाठी सापळा रचायचा. मस्तपैकी विलासी आयुष्य जगायचं. सज्जनांच्या जगात फिरायचं.

संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करून रमेशचंद्र महिलेला सापळ्यात अडकवायचा. मग प्रत्यक्ष भेटायचा. तिला नादाला लावत तिच्याशी लग्न करायचा. बाकीच्या पत्नींना अंधारात ठेवून नव्या पत्नीबरोबर रहायचा. ओडिशा, आसाम, दिल्ली, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, पंजाब या राज्यांमधील त्याच्या पत्नी आहेत. कोणी शिक्षिका, कोणी डॉक्टर, कोणी व्यावसायिक, कोणी नोकरदार आहे. वैवाहिक जीवनात कोणत्या ना कोणत्या कारणाने अरिष्ट आल्यामुळे या साऱ्या जणींनी एक आशेचा किरण, आयुष्याची पुन्हा नव्याने सुरुवात म्हणून पाहिलं होतं आणि याचाच गैरलाभ तो घेत होता. शेवटी कधी ना कधी पापाचा घडा भरतच असतो, तसा तो याचाही भरला. तो 'आत' गेला, पण समाजजीवनात निर्माण होणाऱ्या अशा परिस्थितीचे आणि त्यात बळी जाणाऱ्या महिलांचे काय करायचे हा विषय शिल्लक राहतोच. जागतिकीकरण, चंगळवाद अशा जगात कुटुंबव्यवस्था तुटत आहे. कोणत्याही कारणाने व्यवस्थेला लकवा मारतो आणि असे काही घटक जन्माला येतात, की त्यांच्या वाट्याला एकाकी जीवन येते. अशाही जीवनात पालवी फुटू शकते अशी त्यांना आशाही असते. काहींना त्यात यश येते आणि यायलाही हवे. पण काहींच्या जीवनात पालवी फुटण्यापूर्वीच होरपळ येते. कारण खोटी स्वप्ने विकून सापळ्यात ओढणारे सैतानही तयार होतात. ●●●

**- पंक्चरवाला**





# लकवा भरलेल्या स्वातंत्र्याचा वेध



रत्नकला बनसोड


**माओवाद्यांचा मुख्य नेता म्हणून कोबाड गांधी यांना १० वर्षांची शिक्षा झाली. त्यांच्यावरील आरोप खोटे निघाल्यामुळे त्यांची सुटका झाली. 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' या कादंबरीत आपल्या एकुण व्यवस्थेचे दाहक वर्णन आहे.**

कोबाड गांधी हे प्रामाणिक आणि हुशार व्यक्तिमत्व. त्यांनी व त्यांच्या पत्नी अनुराधा यांनी 'फ्रॅक्चर्ड फ्रीडम' हे पुस्तक लिहिले आहे. एक कठीण ध्येय समोर ठेवून केलेल्या वाटचालीबद्दलचे हे त्यांचे आत्मचरित्र आहे. उपेक्षितांसाठी आयुष्य वेचलेल्या आणि न्याय्य समाजासाठी थेट कृती आवश्यक आहे, असे मानणाऱ्या या दोन लोकांची ही कहाणी आहे. दहा वर्षे भारतातील विविध तुरुंगांमध्ये शारीरिक त्रास सोसावे लागलेल्या कोबाड यांनी त्यांच्या तुरुंगवासाबद्दल, सहकैद्यांबद्दल, भारतीय कायदा व्यवस्थेच्या अनुभवाबद्दल लिहिले आहे. एक अन्याय्य व्यवस्था एका शूर, धैर्यवान माणसालाही कशी दुबळी बनवते, याविषयीचे प्रामाणिक आणि आडपडदा न ठेवता लिहिलेले वर्णन यात आहे. ही खरी कहाणी आहे एका उच्चभ्रू जगातल्या संपन्नतेची आणि आत्यंतिक निराशेची.

'फॅक्चर्ड फ्रीडम' हे मूळ पुस्तक इंग्रजीत आहे. त्याचा अनुवाद अनघा लेले यांनी केला आहे. लेखक व त्यांची पत्नी अनुराधा हे दोघेही मूळ मुंबईचे. त्यांच्या कुटुंबियांच्या सुधारक चळवळीच्या पार्श्वभूमीमुळे त्यांना सामाजिक कार्य हाती घेण्याची प्रेरणा मिळाली. त्यातून त्यांनी १९७० च्या दशकात तळागाळातल्या लोकांमध्ये कार्य करण्यास सुरुवात केली.

लेखकाची पत्नी अनुराधा ही एक आदर्शवत कार्यकर्ती ठरत गेली, याची सविस्तर मांडणी या पुस्तकात आहे. लेखक आणि पत्नी अनुराधा या दोघांच्या आयुष्यातील चढउताराच्या वेळी अनुराधाच्या आई-वडिलांनी पाठिंबा दिला. ते दोघेही जुन्या 'सीपीआय'च्या (अखिल भारतीय कम्यु.पक्ष) काळातील कम्युनिस्ट होते. या दोघांनाही त्यांच्या पूर्ण कामामध्ये त्यांचे सहकार्य होते.

अनुराधाची आई कुमुद औरंगाबादच्या एका कम्युनिस्ट कुटुंबातील होत्या. तिथे त्यांचे भाऊ कॉ. चंद्रगुप्त चौधरी हे दोन वेळा 'सीपीआय'चे आमदार झाले होते. त्यांच्या सहापैकी तीन बहिणी 'सीपीआय'च्या सदस्या होत्या. कुमुद यांच्याप्रमाणे त्या सर्वांनी देशभरातल्या विविध भागातील कम्युनिस्ट नेत्यांशी विवाह केले होते. अनुराधा या चंद्रगुप्त चौधरी यांच्या भाची होत्या. थोडक्यात, अनुराधा या सामाजिक चळवळीच्या वर्तुळातीलच होत्या.




**घरगुती समारंभात विवाहबद्ध**

नोव्हेंबर १९७७ मध्ये आणीबाणी उठल्यानंतर अनुराधा व कोबाड गांधी महाबळेश्वरच्या गांधी यांच्या घरात घरगुती समारंभात विवाहबद्ध झाले. त्या दोघांचे पालक आणि काही जवळचे नातेवाईक एवढेच लग्नाला उपस्थित होते. त्यावेळेस अनुराधा या मुंबई विद्यापीठातून समाजशास्त्रामध्ये एम.ए. आणि एम.फिल. झाल्या होत्या व त्या लेक्चररची नोकरी करत होत्या. अनुराधा यांनी त्यांच्या संपूर्ण राजकीय जीवनात अनेक लेख लिहिले. भारतातील जातीच्या समस्यांबद्दल तो सर्वात सर्वांगीण असा मार्क्सवादी दृष्टिकोन होता, त्यांचा पहिला निबंध होता, 'The Caste Question Returns'.

२००९ मध्ये कोबाड गांधींना अटक झाली. त्यावेळी ते ६२ वर्षांचे होते. शिवाय वेगवेगळे आजारसुद्धा होते. गोरगरिबांना मदत करणे हाच काय तो त्यांचा गुन्हा ठरला. माओवाद्यांचा मुख्य नेता म्हणून त्यांना १० वर्षाची शिक्षा झाली. नंतर त्यांच्यावरील हे सर्व आरोप खोटे निघाले. शेवटी त्यांची निर्दोष सुटका झाली. पण त्यामध्ये त्यांच्या आयुष्यातील १० वर्षे तुरुंगात गेली. कोबाड गांधींनी तुरुंगवासाच्या दहा वर्षांपैकी पावणेसात वर्षे तिहारमध्ये, जवळजवळ एक वर्ष हैदराबादच्या तुरुंगात, एक महिना पतियाळाच्या आणि सहा महिने विशाखापट्टणमच्या तुरुंगात काढली. एकदा सुटका होऊन पुन्हा अटक झाल्यानंतर पावणेदोन वर्षे झारखंडमधील तुरुंगामध्ये आणि शेवटी दोन महिने सुरतच्या तुरुंगात व कस्टडीमध्ये काढली.

**तुरूंगातील जीवन शब्दबद्ध**

प्रत्येक तुरूंगात लेखकाला भेटलेले कैदी आणि त्यांच्यात झालेल्या संवादातून, चर्चेतून मिळालेली माहिती तसेच प्रत्येक तुरुंगामधील कैद्यांचे जीवन, तेथील शिस्त, कठीण परिस्थिती या सर्वांचे वर्णन या पुस्तकात केलेले आहे. आपल्या देशातल्या शोषितांच्या सेवेमध्ये चार दशकांच्या कालावधीत लेखकाने जे काही काम केले, त्यापैकी कोणतेही काम बेकायदेशीर नव्हतेच. पण सरकारला यापैकी कोणतेच मुद्दे त्यांच्या आरोपपत्रात टाकता न आल्याने त्यांनी माओवाद्यांबरोबर त्यांचा संबंध असल्याचा

आरोप केला आणि पोलिसांसमोरच्या खोट्या कबुलीजबाबाच्या जोरावर देशभरात सगळीकडे त्यांच्यावर खटले दाखल केले. त्यांचे नाव हिंसक घटनांशी जोडले. त्यापैकी बहुतेकांबद्दल त्यांनी कधी ऐकलेही नव्हते; सहभागी होणे तर दूरचीच गोष्ट. त्यामुळे या सगळ्या खटल्यांतून लेखक निर्दोष सुटले. या तुरुंगवासात अनेक मानवाधिकार कार्यकर्त्यांनी, संस्थांनी त्यांना मदत केली. भाकपचे सरचिटणीस कॉ. ए.बी. बर्धन आणि माजी राज्यसभा सदस्य कॉ. डी.राजा यांनी त्यांना कायदेविषयक मदत केल्यामुळे ते सर्व आरोपांतून निर्दोष मुक्त झाले. तरीही त्यांना १० वर्षे तुरुंगातच का राहावे लागले; हा खरा प्रश्न आहे. याचे उत्तर लेखकाच्या मते असे आहे, की हा जो प्रश्न आहे तो राज्यकर्त्यांना आणि न्यायव्यवस्थेला विचारला पाहिजे. पोलीस आणि सरकार ही व्यवस्था आपल्याला हवी तशी वाकवून कोट्यवधी रुपयांची अफरातफर करणाऱ्या गुन्हेगाराला कायद्याच्या कचाट्यातून मोकळे करतात आणि गरीब लोकांसाठी काम करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना मात्र तुरुंगात डांबतात.

**आपण पूर्वीच्याच जागी आलो आहोत का?**

आजकाल राज्य व केंद्रातील दोन्ही सरकारे आपल्या विरोधातील आवाज चिरडून टाकण्यासाठी या व्यवस्थेचा वापर करीत आहेत. त्यामुळे अशा घटना वाढत्या प्रमाणात घडताना दिसतात. भारताचा राज्यकर्ता उच्चभ्रू वर्ग ब्रिटिशांप्रमाणेच या विरोधकांना देशद्रोही मानू लागला आहे. म्हणजे आपण पूर्वीच्याच जागी आलो आहोत का? आपण पुन्हा एक प्रकारच्या वसाहतिक राजवटीखाली आहोत का, जिथे गोऱ्यांची जागा काळ्यासावळ्या लोकांनी घेतली आहे, असे विचार लेखकाच्या मनात येतात.

कोबाड गांधी ज्येष्ठ नागरिक असताना त्यांच्यावर दहा वर्षांचा प्रदीर्घ तुरुंगवास लादला गेला. दिल्लीच्या एका प्रकरणात ओळख लपवण्याच्या किरकोळ ४२० शी संबंधित आरोप वगळता एकही गुन्हा त्यांच्यावर सिद्ध झालेला नाही. तरीही हा त्रासदायक तुरुंगवास भोगावा लागला. कच्चा कैदी म्हणून तुरुंगात असताना गांधी यांना दररोज मानहानी सहन करावी लागत असे, अगदी शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारापेक्षाही जास्त. कारण त्यांना निदान काही जबाबदाऱ्या तरी दिल्या गेल्या होत्या आणि ते तुलनेने गांधींपेक्षा अधिक मुक्तपणे तुरुंगात फिरत. गांधींना मात्र कोणतेही अधिकार नव्हते. त्यांचे जीवन तिथल्या कर्मचाऱ्यांवर अवलंबून होते आणि ते त्यांच्या लहरीनुसार त्यांना हवे तसे वागवत.

**झोपू न देण्याचा छळ**

तिहार तुरुंगात असताना भगभगीत दिव्यांच्या उजेडात त्यांना झोपावे लागे आणि या दिव्यांची बटणे कोठडीच्या बाहेर असत. जर कधी बल्ब झाकण्याचा प्रयत्न केलाच तर रात्री राऊंडवर येणारे वॉर्डन त्यांच्यावर ओरडत आणि त्यांना त्यांच्या आज्ञेचे पालन करावेच लागे, अन्यथा शिक्षा होत असे. खरे तर, हा एक प्रकारचा छळच होता, झोपू न देण्याचा. अंधारामुळे मेकॅटोनिन हे संप्रेरक तयार होते, त्यामुळे आपल्याला झोप लागते. प्रकाश असेल तर कोर्टिसोल हे संप्रेरक तयार होते आणि आपण जागे राहतो. लेखक गांधी हे तिहारमधल्या संपूर्ण वास्तव्यात 'सीसीटीव्ही' कॅमेरा असलेल्या कोठडीमध्ये होते आणि रात्रंदिवस त्यांच्यावर लक्ष ठेवले जात होते. बाथरुम, टॉयलेट वगळता बाकी २४ तास लेखक निगराणीमध्ये असत. विश्रांती घेताना, खाताना, झोपलेले असताना, व्यायाम करताना, वाचताना, प्रत्येक क्षणी 'बिग ब्रदर' त्यांच्यावर नजर ठेवून असत.

**लंडनमध्ये राहून आलेला मोठा नक्षलवादी नेता अशी प्रतिमा**

कोबाड गांधी तुरुंगात असताना सपाचे ब्रँडनेते अमरसिंग आणि जया प्रदा हे दोघे त्यांना भेटायला आले. त्या काळात अमरसिंग हे अमिताभ बच्चन यांचे जवळचे मित्र होते. त्यावेळी नक्षलवाद हा एक ज्वलंत विषय होता. त्या चळवळीची काहीतरी रोमँटिक रॉबिनहूडसारखी प्रतिमा होती. 'डून स्कूलमधून शिक्षण घेतलेला, लंडनमध्ये राहून आलेला मोठा नक्षलवादी नेता' अशी त्यांची प्रतिमा झाली होती. प्रसारमाध्यमांनी कोबाड गांधी यांचे असेच चित्र तयार केले होते. चित्रपटासाठी त्यांच्या जीवनाची त्यांना आदर्श स्टोरी वाटत होती. त्यांच्या जीवनावर तीन चित्रपट काढण्यात आले. त्यामुळेच लेखकांच्या अटकेनंतर त्यांचे जीवन आणि त्यांनी शोषितांसाठी करत असलेले काम यांच्यावरून प्रेरणा घेतल्याचा दावा करणारे तीन मुख्य धारेतील चित्रपट निघाले. पहिला चित्रपट प्रकाश झा यांचा 'चक्रव्यूह', ज्यामध्ये ओम पुरीने लेखकाची म्हणजे कोबाड गांधी यांची भूमिका केली होती. संशोधन करून चळवळीचे बरेचसे वास्तव चित्र उभे करणारा हा चित्रपट होता. दुसरा चित्रपट मणिरत्नम यांचा 'रावण'. त्यामध्ये अभिषेक बच्चनने कोबाड गांधींची भूमिका केल्याची जाहिरात करण्यात आली होती. तिसरा चित्रपट होता फारसा गाजावाजा न झालेला 'रेड अलर्ट'. या चित्रपटात भाजप नेता आणि अभिनेता विनोद खन्ना यांनी नक्षलवादी कार्यकर्त्याची भूमिका केली होती. १६ ऑक्टोबर २०१९ रोजी गांधी यांना जामीन मंजूर होऊन त्यांची मुक्तता झाली. अनेक राज्यांमधल्या अनेक खटल्यांसाठी १० वर्षांहून अधिक काळ तुरुंगात राहिल्यानंतर फक्त दिल्ली खटल्यात एक खोटी ओळख वापरल्याच्या गुन्ह्यात ते दोषी आढळले. शोध पत्रकारिता करणारे पत्रकार, अनेकदा खोटी ओळख वापरतात (आणि नंतर उघडपणे ते घोषितही करतात.) त्याशिवाय लाखो लोक कंपन्या आणि बेनामी मालमत्तेमध्ये खोटी ओळख वापरतात. पण अशा कुण्या व्यक्तीला कधी तुरुंगात टाकल्याचे ऐकिवात नाही.

**समाजात मिसळणे अवघड**

गांधींना पुन्हा समाजात मिसळताना थोडे अवघड जात होते. पत्नीचे निधन झालेले होते. जिथे परत जावे असे घर किंवा कुटुंब नव्हते. इतक्या वर्षांनंतर पुन्हा समाजात सुस्थापित होणे फारच अवघड होते. अगदी मोबाईल घेणे, आधार कार्ड मिळविणे, बँकेत खाते उघडणे, कायदेशीर ओळख आणि पत्ता मिळविणे अशा छोट्या गोष्टीसुद्धा त्यांना कठीण वाटत होत्या. या वयात उत्पन्नाचा स्रोत कोठून मिळवायचा, वैद्यकीय उपचाराचे काय, हा सर्व खर्च कसा चालवायचा, शिवाय न्यायालयात खटले चालूच होते.

| | | |
|---|---|---|
| **पुस्तकाचे नांव** | **:** | **फ्रॅक्चर्ड फ्रीडम : तुरुंगातील आठवणी व चिंतन** |
| **मूळ लेखक** | **:** | **कोबाड गांधी** |
| **मराठी अनुवाद** | **:** | **अनघा लेले** |
| **प्रकाशक** | **:** | **लोकवाङ्मय गृह, मुंबई** |

●●●

# स्वभाषांचा क्षय म्हणजे स्वसंस्कृती आणि कलांचाही क्षय



डॉ श्रीपाद भालचंद्र जोशी

**भाषेचे प्रश्न हे स्वभाषेतून शिक्षण, रोजगार, उपजीविका, विकास, उन्नती यासाठी संधी उपलब्ध होणे, न होणे यांच्याशी निगडित असतात. ते निव्वळ भाषेपुरतेच मर्यादित नसतात. अशा संधी देणारी धोरणे नसतील तिथे स्वभाषांचा क्षय हा अपरिहार्य असतो. स्वभाषांचा क्षय हा स्वसंस्कृती, कलांचाही क्षय असतो.**

भाषा, संस्कृती, साहित्य, लोक, त्यांचे साहित्य, बोली, लिपी, ज्ञानबोध, सौंदर्य अशा साऱ्या बाबींकडे बघण्याचे आपले दृष्टिकोन नेमके काय असतात, याकडे कसे बघावे याबाबत कोणत्या पाठशाळेत आपल्याला नेमके काय शिकवले गेले असते? भाषा, साहित्य, संस्कृती, कला , कलाविष्कार, कलाविचार इत्यादींच्या परिघात आपण कोणते लोक गृहीत धरतो? कोणते वगळतो? त्यांचे निकष काय ठरवतो? विविध निम्न जाती आणि आदिम जाती, जमाती, शोषित, वंचित, वगळलेले, गाळलेले, सीमांत, दूर ठेवले गेलेले लोक व त्यांच्या असंख्य बोली, त्यातला त्यांचा लिपीबद्ध नसलेला वाणीचा भाषिक व्यवहार, त्यांची अभिव्यक्ती, निर्मिती, कलारूपे, भाषारूपे, बोली रूपे, संस्कृती यांचे तौलनिक, सुसूत्र आणि एकात्म असे एखादे अध्ययन, संशोधन केंद्रही उपलब्ध नाही. अध्ययनही नाही.

### भाषिक समाज एकसंध राखण्यात अडथळे

लोकभाषा, लोकसाहित्य, त्याची भाषा ही नेमक्या कोणत्या वर्गाची असते? त्यांच्याकडूनही आपण प्रमाण म्हणजे तथाकथित शुद्ध लेखन आणि तथाकथित शुद्ध उच्चार याचीच अपेक्षा करायची असते का? ही प्रमाणता, त्याचे निकष, नियम यानुसारच त्याचा आग्रह धरणाऱ्यांचा तरी संपूर्ण भाषिक व्यवहार चालतो का? माणसे यांत्रिकरित्या केवळ प्रमाण भाषेतच आपसात बोलतात, वागतात आणि अप्रमाण असे कोणतेच भाषिक वर्तन करत नसतात का? मग एकाच एका, तथाकथित शुद्ध रूपाचा आग्रह धरत बाकी सर्व रूपे ही अप्रमाण, अशुद्ध, अस्वीकारार्ह, नियमबाह्य ठरवल्याने आपण प्रचंड मोठ्या लोकसंख्येला, बहुसंख्येला त्यांचा भाषिक व्यवहार हा दुय्यम दर्जाचा, कमअस्सल ठरवत जाऊन ते तथाकथित शुद्ध रूपांचे नसल्याने, भाषेच्या संदर्भात जे दुय्यम नागरिक असल्यासारखे बघू लागतो, त्याने प्रचंड मोठ्या लोकसंख्येमध्ये स्वतःच्याच भाषेबाबतचा मोठा न्यूनगंड निर्माण होतो. आपण अशुद्ध समजले जातो या भावनेने तथाकथित शुद्धतेची मोडतोड करणे म्हणजे आपले अस्तित्व जाणवून देणे, अशी बंडखोरीची भावना निर्माण होते. तथाकथित प्रमाण, शुद्ध बोलणाऱ्या,



लिहिणाऱ्या समाजाचा ते भाग समजले जात नाहीत. विलगतेची ही भावना मग भाषा, तथाकथित शुद्ध रूपे, संस्कृती इत्यादी बाबी यांकडे मूठभरांचेच वर्चस्व टिकवण्याची सामुग्री म्हणून बघितली जाऊ लागते. भाषिक समाज एकसंध राखण्यातले हे मोठे अडथळे होऊन बसतात.

**मूठभरांचे स्थान अबाधित**

स्वभाषेपेक्षा तथाकथित शुद्धता, प्रमाणता, नियम तुलनेने कमी क्लिष्ट असणाऱ्या अन्य भाषा, लिपी यांची समाजावर पकड मजबूत व्हायला ही स्थिति उपकारक ठरते. स्वभाषा ही अनेक बोलींच्या मोठ्या लोकसंख्येला परिभाषा वाटू लागते. भाषिक न्यूनगंड हा केवळ भाषेपुरता उरत नाही. तो त्यांच्या समग्र न्यूनगंडग्रस्त व्यक्तित्वाचा भाग होऊन जातो. मूठभरांचे स्थान मात्र या प्रक्रियेत अबाधित राहाते. सामाजिक भाषाशास्त्र हे सारे, ही भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक प्रक्रिया उलगडून सांगत असते. शंभर वर्षे होत आलेल्या आधुनिक भाषा विज्ञानाने, संस्कृती विज्ञानाने भाषा, साहित्य, संस्कृती यांच्याकडे बघण्याच्या पारंपारिक दृष्टिकोनात आमूलाग्र, क्रांतिकारक परिवर्तन जगभरच घडवून आणले आहे. मात्र ते जगभर अजूनही तळपातळीपर्यंत झिरपलेले नाही. कारण आपण भाषा शिकवतच नाही. भाषेच्या नावावर केवळ साहित्य शिकवले जाते. त्यामुळे भाषेचे केवळ साहित्यिक, वाङ्मयीन रूप म्हणजेच श्रेष्ठ, शुद्ध, प्रमाण रूप हा अतिशय अशास्त्रीय विचारच रूजवला जातो. भाषिक नियमांचे, प्रमाण वा शुद्ध रूपांचे महत्व प्रमाणाबाहेर ताणल्याने ही स्थिति निर्माण होते. भाषेच्या प्रमाणरूपाची गरज ही लेखनविद्या उदयाला आल्यानंतर, एकाच भाषेतल्या विविध बोलींच्या भाषकांना दळणवळण सुकर व्हावे यासाठी भाषेचे एक कोणते तरी रूप निश्चित व्हावे लागते म्हणून उद्भवते. वाहतुकीचे प्रमाण नियम पाळले नाहीत तर जसे अपघात संभवतात, तसे भाषेच्या दळणवळणातही संभवतात. ते टाळणे एवढाच प्रमाण रूपाचा हेतू असतो. वाहतुकीचे नियम हे जसे शुद्ध वा अशुद्ध असत नाहीत, तसेच हे आहे. मात्र भाषेचे नियम न पाळणाऱ्यांना सरळ गावंढळ, अडाणी, अशिक्षित घोषित करून जे बघितले जाते ते चुकीचे आहे. साहित्यकेंद्री भाषा शिक्षणामुळे व भाषा, भाषाविज्ञानकेंद्री भाषा शिक्षणच दिले जात नसल्याचा हा परिणाम आहे. ते तसे दिले तर सर्व भाषा, बोली यांच्याकडे समान दर्जा व गुणवत्तेने, समान न्यायाने बघितले जाण्याची दृष्टी लाभते. त्यातून समन्यायी, विवेकी, सहिष्णू, विचारी पद्धतीने भाषिक वर्तनाकडे बघणारा समाज निर्माण होऊ शकतो. हीच खरी भाषिक वर्चस्ववाद्यांची अडचण आहे.

**जनतेला भाषासाक्षर होऊ दिले जात नाही**

भाषेच्या विशिष्ट रूपाचा आग्रह हा भाषेपुरताच उरत नाही. भाषा ही संस्कृती आहे. अनेक उपसंस्कृतींमधून विखुरलेली ती असते. अनेक बाबतीत काही विशिष्टांच्या जीवनाच्या विशिष्ट रूपांबाबत आग्रही असण्याच्या सांस्कृतिक वृत्तीपर्यंत या आग्रहाचा विस्तार केला जातो. सांस्कृतिक, भाषिक वर्चस्ववादाची बाजू याला असते. त्यात अर्थकारण, सत्ताकारण, राजकारणही गुंतलेले असते. भाषेकडे,भाषिक प्रक्रियेकडे भाषा विज्ञानाच्या, संस्कृतीविज्ञानाच्या अंगाने बघितल्याशिवाय तसे बघण्याचे शिक्षण, प्रशिक्षण दिल्याशिवाय हा दृष्टिकोन प्राप्त होणार नाही आणि समाज भाषासाक्षर, संस्कृतीसाक्षर होणार नाही. तो तसा नसणे हे त्यावर जीवनाच्या विशिष्ट रूपांचा वरचष्मा हवा असणाऱ्या वर्चस्ववादाच्या सोयीचेच असते. म्हणूनच समाजाला भाषासाक्षर, संस्कृतीसाक्षर केले जात नसते.

साहित्यकेंद्री भाषाशिक्षण हे समाजात जैसे थे भाषिक स्थिती टिकवून धरण्यास सहाय्यभूत होणारी सामग्री आहे. त्यात बदल झाल्याशिवाय भाषिकसंदर्भात व्यापक परिवर्तन शक्य नाही. ते व्हावे यात धोरणकर्ते, राज्यकर्ते, निर्वाचित जनप्रतिनिधी, मग ते कोणत्याही जात, धर्म, पक्ष, पंथांचे, रंगांचे, झेंड्यांचे असोत, त्यांना रूची नाही. हे सारे समजून घेण्यात तर नाहीच नाही. परिणामी शासन करण्याला सोयीचा समाज टिकवून धरणे हेच समान धोरण साऱ्यांचेच झाले आहे. भाषा, बोली, उपबोली, संस्कृती, अशा बाबी या म्हणूनच कोणत्याही शासनाच्या, सत्तेच्या अग्रक्रमाच्या बाबीच नसतात. ज्या भाषिक समाजात राज्यकर्त्यांना या बाबी बहुसंख्याकांच्याच आहेत याचे भान असते, त्याच समाजात स्वभाषा, बोली, स्वसंस्कृती याबाबतची जागृतीही अधिक दिसते. सामंतवादी पद्धतीने सत्ताकारण जिथे चालते तिथे ही दृष्टीच नसते. भाषिक धोरणे ही त्याकरता बहुजनसन्मुख असावी लागतात. भाषा, संस्कृती ही मुळात त्याचीच असते. व्यवस्था त्याला त्यापासून विलग करत ती जणू मूठभरांची मक्तेदारी आहे हे सांगत, त्यांच्या भाषा, संस्कृती जतन, संवर्धन यावर पैसा खर्च करण्यातून आपली सुटका करून घेत असते. विविध बोली, विविध भाषा, संस्कृतीमधील विविध उपसंस्कृती यांच्यात परस्पर संघर्षाचे वातावरण कायम टिकवणे हा आधुनिक लोकशाहीत मतांच्या राजकारणासाठी एक स्थायीभाव झालेला आहे. लोकांना केवळ भाषेचा गर्व, अस्मिता, अभिमान अधिकाधिक टोकदार करायला लावणारे विकासकारण, सत्ताकारण, वर्चस्वकारण एवढ्याच पातळ्यांवर हाताळले जाते. ते अधिक सोपे असते. त्यातून अनेक प्रकारचे भेदभाव आपोआपच जपले जातात. भाषा ही एकाच वेळेला अशा रितीने समाजकारण, राजकारण, सत्ताकारण, वर्चस्वकारण, अर्थकारण, संस्कृतीकारण, विकासकारण अशा विविध पातळ्यांवर वावरत असते. केवळ तथाकथित शुद्ध , अशुद्ध एवढ्यापुरते हे प्रकरण अशा प्रकारे मर्यादित उरत नाही. भाषा, त्यातही स्वभाषा, स्वबोली हीच प्रत्येकाच्या विचार, कल्पना ग्रहण करण्याचे, व्यक्त होण्याचे, जगण्याचा आनंद घेण्याचे साधन असते. म्हणूनच स्वभाषा हेच सर्व स्तरावर, सर्व विषयांच्या अध्यापन, अध्ययनाची भाषा ज्या भाषिक समाजांची असते, त्यांची स्थिती तुलनेने तसे नसलेल्या समाजांपेक्षा उन्नत असते. जिथे स्वभाषा, स्वबोली सोडून अन्य भाषा ही शिक्षणाचे माध्यम म्हणून लादली जाते, तिथे ज्ञानग्रहण क्षमता आणि ग्रहण केलेले व्यक्त करण्याची क्षमता आणि सामर्थ्य हे कमकुवत झालेले असते. कारण शिक्षण माध्यमाशिवाय अन्य कोणतीही भाषा ही स्वभाविक वातावरणाचा कधीच भाग नसते. ती घरात, बाहेर, समाजात, सर्वत्र व्यवहार करताना, बोलली, ऐकली जात नसते. शिक्षण माध्यम असलेल्या अन्य भाषेतून इतर कोणताही जीवनव्यवहार होत नसल्याने, अन्य भाषेचे सामाजिक, सांस्कृतिक **(उर्वरित पान ३४ वर...)**

# बाबासाहेबांचे वैचारिक अनुबंध : श्रीधरपंत टिळक



– प्रा. डॉ. रोहिदास जाधव

**प्रारंभीच्या काळात स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केलेल्या लोकमान्य टिळकांनी आयुष्यभर सनातनी विचारांची पाठराखण केली. त्यांचेच पुत्र श्रीधरपंत टिळक यांनी मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी चळवळीत सहभागी होऊन तिला पाठबळ दिलं. पुण्यातल्या नारायण पेठेतील टिळकांच्या गायकवाड वाड्यात समता समाज संघाची स्थापना आणि डॉ. आंबेडकर, जेधे-जवळकर, पां. ना. राजभोज आदींना सहभोजन देऊन आपल्या सुधारणावादी कार्याला प्रारंभ केला होता. १ मार्च ही श्रीधरपंतांची जयंती. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण...**



टिळकांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात ब्राम्हणेतर चळवळींचा जोर वाढलेला होता. या चळवळींची प्रत्यक्षाप्रत्यक्ष झळ टिळकांना बसलेली होतीच. सत्यशोधक समाजाचे कार्यक्षेत्र वाढीस लागलेले होते आणि अनेक सुधारणावादी भूमिका हळूहळू पुढे येत होत्या. टिळक व टिळकांचे अनुयायी अशा भूमिकांना विरोध करण्यासाठी पुढे सरसावत होते. टिळकांचे दुर्दैव असे, की त्यांचे कनिष्ठ पुत्र श्रीधरपंत टिळक हे त्यांच्या विरोधी म्हणजे प्रागतिक विचारांचे अनुकरण करत. वडिलांनी आयुष्यभर सनातनी विचारांच्या लोकांचे नेतृत्व केले आणि मुलाने सुधारणावादी विचारांची कास धरली. वडील आणि मुलाच्या वैचारिक भूमिकांमध्ये मोठे अंतर राहिले. छत्रपती शाहू महाराजांच्या 'वेदोक्त प्रकरणा'त टिळकांनी धर्ममार्तंडांची तळी उचलून धरली, तर श्रीधरपंतांनी 'शक्य होईल तितक्या लवकर जातीयता नष्ट व्हायला हवी', अशा प्रकारचे विचार अनेक लेखांतून व्यक्त केले. १९२० नंतर छत्रपती शाहू महाराजांच्या उदार दृष्टीमुळे अस्पृश्य समाजाला चालना मिळाली व याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा व कर्तृत्वाचा उदय झाला.

### सुधारणावादी विचारांचा पूल

अच्युतराव कोल्हटकर, महादेव राजाराम बोडस आणि श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्याशी प्रारंभीच्या काळात श्रीधरपंत यांची मैत्री होती. अच्युतराव कोल्हटकर हे टिळकभक्त असले तरी त्यांचा ओढा ब्राम्हणेतर चळवळीकडे अधिक होता. दिनकरराव जवळकरांच्या लेखसंग्रहाला त्यांनी प्रस्तावना लिहिली होती. श्री.व्यं.केतकर यांनी 'स्वयंनिर्णयी संघा'ची स्थापना केली होती. याचे सेक्रेटरी म्हणून श्रीधरपंत काम पाहत होते. 'केसरी ट्रस्ट' ची स्थापना झाली त्यावेळी काय चुका झाल्या असणार, हे या तिघांनी पंतांना सांगितले असण-ार म्हणून त्यांनी ट्रस्टींविरोधात खटला दाखल केला. हा खटला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवावा अशी पंतांची मनोमन इच्छा होती; परंतु व्यवस्था पंतांना नीट जगू देणार नाही यास्तव बाबासाहेबांनी हे काम नम्रपणे नाकारले. या घटनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि श्रीधरपंत टिळकांमध्ये कटूता येण्याऐवजी मैत्रीचा व सुधारणावादी विचारांचा एक पूल बांधला गेला! त्यांच्यात कमालीचे स्नेहबंध निर्माण झाले.

१९२७ मध्ये बहिष्कृत विद्यार्थ्यांचे चौथे वार्षिक संमेलन पुणे येथे भरले होते. त्या संमेलनाला पंत जातीने हजर होते. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला त्यांना हजर राहता आले नाही. पण या सत्याग्रहाविषयीच्या सहानुभूतीची तार त्यांनी पाठवली. ती सत्याग्रह कमिटीचे सेक्रेटरी शिवतरकर यांनी वाचून दाखवली होती. समता समाज संघाची स्थापना पुण्यात व्हावी आणि त्याची कचेरी आपल्या घरी असावी अशी विनंती बाबासाहेबांना पंतांनी अनेकदा केली होती. यथावकाश या संघाची स्थापना झाली आणि टिळकवाड्यात सहभोजनाचा कार्यक्रमही झाला. हा कार्यक्रम उधळून लावण्याचा

प्रयत्न सनातन्यांनी केला. सहभोजनाच्या कार्यक्रमापासून पुण्यातल्या पुराणमतवादी मंडळींनी पंतांना कमालीचा त्रास दिला.

**जातियता नष्ट करणे हेच उभयतांचे ध्येय**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विद्वत्ता, विचार व कार्यामुळे पंत भारावून गेले. दोघांत स्नेह जडण्याचे कारणही तेच होते. दोघांचे ध्येय एकच होते, ते म्हणजे जातियता नष्ट करणे! दलितांवरील अन्यायाविरोधातील लढा आणि सत्यशोधक समाजाच्या कार्याचा जोर पंतांनी अनुभवला होता. त्यातून प्रेरणा घेऊन आपण काही करावे अशी त्यांची मनोमन इच्छा होती. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर यांच्या ते संपर्कात आले. यामुळे त्यांचे सामाजिक सुधारणेचे विचार काळाच्या पुढे गेले. इ.स.१९२७ हे म.जोतिराव फुल्यांच्या जयंतीचे शताब्दी वर्ष होते. महाराष्ट्रात जयंतीचे मोठमोठे कार्यक्रम होत होते. अशा कार्यक्रमांना पंतांची हजेरी लक्षणीय होती. त्यांच्या भाषण व विचारांमुळे जनमानसातील त्यांची प्रतिमा अधिक उजळून निघाली. म.जोतिराव फुल्यांची यथेच्छ टिंगलटवाळी टिळक आणि टिळकांच्या अनुयायांनी केली. पण टिळकांच्या मुलानेच म.फुल्यांचे समाजातील व विचारातील मोठेपण मान्य केले हे ऐतिहासिक वास्तव आहे. या काळात 'जागृती' नावाचे नियतकालिक प्रसिद्ध होत असे. पाळेकर हे त्याचे संपादन करीत. म. फुल्यांच्या विचारांनी भारावलेल्या पंतांच्या भूमिकेवर पाळेकरांनी, 'काळाने सूड उगवला' या शीर्षकाचा लेख लिहून वास्तव पुढे आणले. त्यांनी लिहिले, म. फुले यांचे आक्षेपक व प्रशंसक कोण कोण आहेत याचा विचार करताना मुख्यत्वे करून बाबुराव फुले आणि श्रीधरपंत टिळक या दोन व्यक्ती अंत:चक्षुंपुढे उभ्या राहिल्याखेरीज राहात नाहीत. बाबुराव फुल्यांनी जातीवर्चस्वाविरुद्ध ब्राम्हणबुवांच्या पुढ्यात शिरून आपल्या कुळास भूषणभूत असलेल्या जोतिराव फुल्यांची नाही नाही ती निंदा केली, त्यांच्यावर खोटे आरोप लादले आणि फुल्यांच्या कुळातला हा दुष्टमणी आपल्या हाती लागला म्हणून भटजींनी स्वत:चे अभिनंदन केले; परंतु कै.टिळकांचा मुलगा पुढे आला आणि त्याने म.फुल्यांचा गौरव केला. श्रीधरपंत टिळक बहुश्रुत व सुशिक्षित, आजकालचे राजकारण जाणणारे, उदार विचारांचा परामर्श घेणारे, राष्ट्रीय बुद्धीने सामाजिक व धार्मिक विचार करणारे! बाबुराव फुल्यांचा जन्म म.जोतिरावांच्या कुळातला; पण जोतिरावांच्या कार्याचे रहस्य त्यांना समजले नाही. उलटपक्षी श्रीधरपंत हे म. फुल्यांचा दुस्वास करणाऱ्या टिळक-चिपळूणकर सांप्रदायाच्या वातावरणात जन्मले, वाढले. तरीही म.फुल्यांच्या कार्याचे महत्त्व त्यांनी ओळखले. यावरून परिवर्तनवादी चळवळ व कार्यकर्त्यांविषयी पंत किती संवेदनशील होते ते कळते.

**आत्महत्येपूर्वी बाबासाहेबांसह दोघांना पत्र**

केसरी-मराठा ट्रस्टी आणि श्रीधरपंत यांच्यात कमालीचा वाद झाला. पंतांचे मेहुणे केतकर वकील यांनी, 'तुम्हाला सार्वजनिक ट्रस्टवर राहता येणार नाही' असे सांगितले आणि हे प्रकरण कोर्टदरबारी गेले. पंतांचे समाजसुधारणेबाबतचे विचार 'केसरी'च्या मूळ ध्येयधोरणाशी जुळणारे नव्हते. त्यामुळे या व्यवस्थेने पंतांचा यथेच्छ छळ केला. 'केसरी'ची मालकी आपल्याकडे यावी. तो चालवण्याइतकी व समाजाला बुद्धीवाद शिकवण्याइतकी अक्कल




आपल्याकडे असल्याचा सार्थ अभिमान त्यांना होता. त्यामुळेच एक ना एक दिवस 'केसरी' आपल्या हातात येईल या विचाराने ते कोर्टाची दारे ठोठावत राहिले. पण हे सर्व व्यर्थ ठरत होते. अपयशी ठरत होते. यामुळे त्यांच्या लेखनातून हताशतेचे आणि आत्महत्येचे विचार डोकावू लागले. पुढे या सर्व बाबींचा विपरीत परिणाम होऊन पंतांनी आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी पंतांनी केवळ दोनच व्यक्तींना पत्र पाठवून कळविले होते. त्यात पुण्याचे कलेक्टर आणि दुसरे होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर! कलेक्टरच्या पत्रात लिहिले होते, ''आयुष्याबद्दल निराश होऊन व आयुष्याला कंटाळून मी आज आत्महत्या करत आहे. मला नेहमी असे वाटे, की माझा जन्म, माझ्या देशाची, माझ्या समाजाची व माझ्या भाषेची सेवा करण्याकरिता आहे. माझ्या माता-पितरांचीही याहून भिन्न कल्पना नव्हती. माझा जन्म वकील व कायद्याची कोर्टे यांचे असहाय्य खेळणे बनण्याकरता नव्हता; परंतु दुर्दैवाने माझे वडील कै.बा.गं.टिळक यांचे पश्चात एका डांबिस टोळीने (A gang of raskals) आमचे जगाचे मार्गासंबंधी अज्ञान व अननुभवाचा फायदा उठवून आम्हास फसविले व आमचे कौटुंबिक संपत्तीचा बहुतेक भाग (म्हणजे छापखाना, वर्तमानपत्रे, सरकारी कर्जरोखे, बँकेतील शिल्लक इ.) आमचे हाता-वेगळा केला. बहुतांशी १९२३ सालचे अखेरपर्यंत माझे कृत्य व माझे लिखाण त्यांच्या नेतृत्वाने चालले व मी ज्या ज्यावर सह्या केल्या, जे जे प्रसिद्ध केले किंवा जे जे त्यास फायदेशीरपणा येईल असे त्या

काळात (१९२० ते १९२३) केले, ते सर्व त्यांच्या इच्छेनुरुप व त्यांचे वजनाचे दडपणामुळे केले. आमचे कायद्याचे अज्ञान व त्यांचेवर पूर्ण विश्वास यांचा त्यांनी पुरेपूर फायदा, आपले स्वार्थी व महत्त्वाकांक्षी आणि आमचे हितसंबंधास विघातक असे डाव साळसूदपणे खेळण्यात घेतला..... एखाद्या गरीब अपरिचित शेतकऱ्याचे झोपडीत माझे जीवितकार्य पुरे करण्याकरीता माझा पुनर्जन्म होवो, अशी मी आशा बाळगतो.'' यावरून श्रीधरपंतांच्या छळाच्या सीमारेखांचा अंदाज येतो.

**श्रीधरपंतांच्या मोठेपणाची साक्ष**

२५ मे १९२५ रोजी नेहमीप्रमाणे पंत भांबुर्ड्याला (आ-ताचे पुण्यातील शिवाजीनगर) फिरायला गेले आणि मुंबई-पुणे एक्स्प्रेसखाली स्वत:ला झोकून दिले. प्रस्थापित व्यवस्थेने एका प्रागतिक विचारवंताचा असा बळी घेतला. २६ मे १९२५ ला बाबासाहेब जळगाव येथील बहिष्कृत वर्गाच्या सभेसाठी गेले हो-ते. भाषण संपवून ते खाली बसतात तोच त्यांच्या हाती तार पडली. अर्थातच पुण्याच्या समता संघ शाखेचे उपाध्यक्ष श्रीधरपंत टिळक यांच्या निधनाची ती तार होती! या वार्तेने बाबासाहेबांना धक्का बसला. दुखवट्याचा ठराव मांडून त्यांनी जळगाव सोडले आणि तडक मुंबई गाठली. संपूर्ण प्रवासात त्यांची बेचैनी वाढली.

पंतांची आत्महत्या ही मोठी हृदयद्रावक घटना होती. पंतांच्या मरणानंतर बाबासाहेबांनी एक अप्रतिम लेख लिहिला. तो मुळा-तून वाचण्यासारखा आहे. या लेखात एके ठिकाणी ते लिहितात, ''श्रीधरपंत टिळक हे एका ब्राम्हण्याभिमानी गृहस्थाचे चिरंजीव! त्यांचे वडील बाळ गंगाधर टिळक यांना जेव्हा मी 'मूकनायक' पत्र चालवित असे त्यावेळी अंकांमधून शिव्याशापांची लाखोली वाहत असे. ब्राम्हण्याशी अहर्निश लढणाऱ्या माझ्यासारख्या अस्पृश्य ज्ञातीतील एका व्यक्तीने ब्राम्हण्याभिमानी व्यक्तीच्या पोटी जन्मास आलेल्या श्रीधरपंताचे मरणाने दु:खित व्हावे हा योगायोग तर त्याच्यापेक्षा विलक्षण आहे, हे कोणीही कबूल करील; परंतु हा योगायोगच श्रीधरपंतांच्या मोठेपणाची एक मोठी साक्ष आहे. कोणी काहीही म्हणो, श्रीधरपंतांच्या वडिलांना 'लोकमान्य' ही पदवी अयथार्थ होती. तेली, तांबोळी म्हणून बहुजन समाजाचा उपहास करणाऱ्या व्यक्तीला लोकमान्य म्हणणे म्हणजे 'लोकमान्य' या शब्दाचा विपर्यास करणे असे आमचे मत आहे. 'लोकमान्य' ही पदवी जर टिळक घराण्यापैकी कोणा एकास साजली असती तर ती श्रीधरपंतासच होय! टिळकांच्या हातून लोकसंग्रह झाला नाही. खरा लोकसंग्रह श्रीधरपंतच करु शकले असते. तो करण्यास ते उरले नाहीत ही महाराष्ट्रावरील नव्हे तर देशा-वरील मोठीच आपत्ती आहे. असे भिक्षुकशाहीच्या कच्छपी नसलेल्या कोणत्याही लोककल्याणेच्छू माणसास कबूल करणे भाग आहे.'' पंतांविषयीची आत्मियता, जिव्हाळा व त्यांचे मोठेपण बाबासाहेबांनी अधोरेखित केले. १ मार्च १८९६ हा श्रीधरपंतांचा जन्मदिवस! आज १२५ वर्षांनंतरही त्यांच्यासारखा 'लोकमान्य' जन्माला यावा अशीच आपणा सर्वांची इच्छा असू शकते. •••

**(लेखक फुले-शाहू-आंबेडकरी विचारांचे कार्यकर्ते आहेत)**

---

# स्वभाषांचा क्षय म्हणजे स्वसंस्कृती, कलांचाही क्षय

(पान ३१ वरून)

वातावरण घरात, बाहेर, कुठेही उपलध नसते. ज्या भाषेचे ते असते ती भाषा शिक्षणाचे माध्यम नसते. अशा स्थितीत असा समाज ना अन्य भाषेतून सक्षम, समर्थ होता ना त्यांच्या भाषा, बोलीतून त्यांच्या रोजगार, उपजीविका, विकास यांच्या संधी त्याला लाभत. आपल्याच भाषिक, सांस्कृतिक मुळांपासून तुटत जाणे आणि अन्य भाषेच्या भाषिक , सांस्कृतिक मुळंच त्याला नसणे असा त्रिशंकू होत जातो. या अवस्थेत तो काहीही समजून घेण्याचा, व्यक्त होण्याचा आत्मविश्वासच गमावून बसतो. विविध बोलींच्या भाषिक समाजाची अवस्था तर याहून वाईट असते. त्याच्या बोलीतून त्याला शिक्षण, न्याय अथवा अन्य सामाजिक, सांस्कृतिक व्यवहार करण्याची संधीच नसल्याने व प्रमाण भाषेत त्याची मुळं रूजलेली नसल्याने त्याच्यासाठी तर ती अन्य, परकीच भाषा असते. त्याच्या या अडचणींचे तर नागरी, महानगरी, समाजाला, त्यातल्या धोरणकर्त्यांना आकलनही नसते आणि गरजही वाटत नाही. प्रचंड मोठ्या लोकसंख्येला अक्षय, असमर्थ, पंगू करून सोडणारी ही स्थिती नेमके कोणाचे हित साधते ? यात बहुजनहिताय,बहुजनसुखाय या ब्रीदाचे नेमके काय होते, हे प्रश्न उपस्थित करणारी व त्याची उत्तरे शोधणारी शास्त्रशुद्ध संशोधने, अध्ययनेदेखील उपलब्ध नसतात. मग या प्रचंड मोठ्या लोकसंख्येच्या स्वत:च्याच राज्यात या मोठ्या लोकसंख्येच्या, बहुसंख्येच्या या समाजाचा, लोकांचा वाली कोण?

**म्हणून समाजाची एकूणच वाढ खुरटतेय**

भाषेचे प्रश्न हे स्वभाषेतून शिक्षण, रोजगार, उपजीविका, विकास, उन्नती यासाठी संधी उपलब्ध होणे, न होणे यांच्याशी निगडित असतात. ते निव्वळ भाषेपुरतेच मर्यादित नसतात. अशा संधी देणारी धोरणे नसतील तिथे स्वभाषांचा क्षय हा अपरिहार्य असतो. स्वभाषांचा क्षय हा स्वसंस्कृती, कला, यांचाही क्षय असतो. स्वसमाजाच्या आतून स्वत:शी सामाजिक, सांस्कृतिक नाळ तुटत जाणे आणि त्या जागी निर्मिल्या जात असलेल्या अन्य भाषेत, संस्कृतीत त्याची मुळं नसल्याने अशा समाजाची एकूणच बौद्धिक, वैचारिक, दार्शनिक वाढ ही खुरटतच जाते. सर्वहारा वर्ग हा सर्वच हरलेला नसतो. त्याच्याजवळ त्याची संस्कृती असते आणि त्यात त्यांची मुळं खोलवर रूजलेली असतात. त्यातच त्याचे संस्कृतीकारण, राजकारण, जीवनविषयक विचार, दर्शने, तत्त्वज्ञान असते. त्याच आधारावर तो आपल्या अस्तित्वाचा पुनर्शोध घेत असतो. प्रतिकार, प्रतिरोध करत असतो आणि अशा काळवंडलेल्या अवस्थेतही परिवर्तन घडवून आणण्याची दिशा शोधत असतो. सामाजिक, सांस्कृतिक बंडांच्या मागे हे वास्तवही नेहमीच रहात आले आहे. ती एकदा होऊन गेल्याने कायम परिवर्तन होत नाही. ते पुन:पुन्हा करत रहावे लागते. •••

# विचारधारा : वाटा आणि वळणे

( पान २२ वरून )

तंत्रज्ञशाही हीच सक्षमपणे व शास्त्रीय करते, त्यामुळे सर्व व्यवहार तिच्या हाती सोपवणारी धोरणे घ्यावीत. उपयुक्ततावादी नैतिकता म्हणजे 'जास्तीत जास्त संख्येसाठी' जे उपयुक्त ते नैतिक अशी घोषणा ठेवावी. हे दृष्टिकोन व या भूमिका हे भांडवल व्यवस्थेच्या रथाचे घोडे आहेत आणि यावर स्वार झालेला व्यवहारवाद हा सारथी आहे!

सहकार्याने नव्हे तर जणू गळेकापू स्पर्धेने मानवी गुणवत्ता वाढते आणि कल्याण होते असा आभास ती सतत निर्माण करते. विद्यमान व्यवस्थेतही जे सहकार्य असते ते गौण लेखायचे, दडवायचे, दडपायचे आणि भांडवलाच्या वर्चस्वासाठी वापरायचे. त्यातील मानवी कल्याणाच्या क्षमता सतत खच्ची करायच्या, हे या व्यवस्थेचे जीवितकार्य आहे. इथे विवेकवादाचा बोलबाला मोठा आहे, पण 'स्वातंत्र्या'च्या नावाने सर्व अविवेकी गोष्टींना मोकळे रान दिले गेले आहे! हा दुटप्पी-औपचारिक विवेकवाद गुंतागुंतीच्या सामाजिक-सांस्कृतिक वास्तवापासून आणि जनतेपासून दुरावलेला आहे. वर 'जनता अविवेकी आहे' असे म्हणायला आणि स्वत:ची सत्ता टिकवायला अभिजनांना ते सोयीचे ठरते आहे! यांत्रिक विज्ञानवाद आणि तंत्रज्ञशाही हे जणू सर्व सामाजिक-राजकीय समस्या सोडवणार आहे, अशी सतत हवा करून भांडवलाचे व अभिजनांचे वर्चस्व व सत्ता टिकवली जात आहे. उपयुक्तता वादावर पारखली जाणारी नैतिकता ही अर्थातच बाजार, नफा व भांडवल-संचयाला उपयुक्त ठरते आहे. मात्र मानव-मानव संबंध आणि मानव-निसर्ग संबंध यांचे ती वाटोळे करते आहे. आजच्या सामाजिक-सांस्कृतिक-पर्यावरणीय संकटाच्या मुळाशी तिचे हे 'कर्तृत्व' आहे आणि आज सामाजिक जीवनावर तिचेच वर्चस्व आहे.

या काळात अफाट वाढ आणि विस्तार होत आला आहे. विविध संस्थात्मक रचना उभ्या झाल्या आहेत. लोकांनी संघर्ष करून आहे ही चौकट रुंदावण्याचे व सखोल करण्याचे प्रयत्न केले आहेत. यांच्या जोरावर आणि सरंजामशाही व जात-वंश-धर्मवर्चस्व यापेक्षा जी काही ऐतिहासिक प्रगतिशील वैशिष्ट्ये या आधुनिक व्यवस्थेत आहेत, त्यांच्या आधारे भांडवलशाही ही 'उदारमतवादी स्वप्ने' सतत समोर ठेवत आली आहे. अशा स्वप्नांवर स्वत: ही व्यवस्था लोकांना जगवते. प्रचलित व्यवस्थेचा व्यवहारवाद-म्हणजे, खरे तर बऱ्याचदा व्यापारवाद-हा बालवाडी प्रवेशापासून मूलभूत विज्ञान-संशोधन क्षेत्रापर्यंत, कुटुंबापासून राजकारणापर्यंत आणि प्रेमापासून संस्कृतींपर्यंत सार्वत्रिक झालेला आहे. तो इतका, की अनेक परिवर्तनवादी प्रवाह, पक्ष, संघटना आणि अभ्यासक व विचारवंत हेदेखील बचावात्मक पवित्र्यावर गेले आहेत. अर्थात, याचे एक कारण हेही आहे, की विविध परिवर्तनवादी प्रवाहांतील व विचारांमधील आंतरिक क्षमता या आज निस्तेजलेल्या आहेत. परिणामी, परिवर्तनवादी प्रवाहातील एका विभागाला हा व्यवहारवाद व त्यावर आधारित राजकारण आणि विचारदृष्टी यातूनच 'काहीतरी होऊ शकेल' असे वाटू लागले आहे. या व्यवहारवादी चौकटीतच काही मार्ग, उपाय, सुधारणा शोधणे आणि त्या आधारे शक्य तेवढी 'प्रगतिशीलता' साधणे हेच आपल्या हाती

## केंद्रीकरणामुळे संकट गंभीर

तिसरे, भांडवल या सामाजिक-आर्थिक शक्तीचे आंतरिक तर्कशास्त्र आणि प्रथमपासूनचे स्वप्न हे आहे, की ते स्वत: जागतिक आणि संघटित बनले पाहिजे. मात्र श्रमिकांसह सर्व माणसे ही सुटीसुटी-विखुरलेली असली पाहिजेत. त्यांचे 'अण्वीकरण' झाले पाहिजे. म्हणजे ते अणुवत सुटेसुटे असले पाहिजेत. ते एकमेकांपासून तुटलेले, स्वमग्न, आत्मरत, स्वकेंद्री, स्वत:पुरते पाहणारे असे केवळ 'नागरिक' असले पाहिजेत-सरकारला कर देणारे आणि अधिमान्यता देणारे आणि तेही दुभंगलेले नागरिक असले पाहिजेत-म्हणजे माणूस म्हणून असलेले त्यांचे अस्तित्व हे तरंगते वा दुय्यम वा नाममात्र असावे आणि प्रत्यक्षात मात्र त्यांचे औपचारिक-कायदेशीर अस्तित्व एवढेच असावे. माणसे ही सर्व ठरल्याबरहुकूम-बसल्या वा असल्या जागी-उत्पादन व सेवा देणारी आणि शक्य तेवढा सतत उपभोग घेणारी रोबोवत 'व्यक्ती' म्हणून जगत असली पाहिजेत. थोडक्यात, समूह आणि व्यक्ती, नागरिक आणि माणसे ही दुभंगलेली-विखुरलेली असावीत, मात्र भांडवल आणि संबंधित सत्ता या अधिकाधिक संघटित असाव्यात! अशा रितीने जग आणि आपला देश हे आज कोरोना, नवफासिवाद आणि कार्पोरेट भांडवल यांच्या हुकूमशाहीखाली दबलेले आहेत. या त्रिकुटाचे भय आणि त्याची दहशत याखाली जग जगत आहे. हे कार्पोरेट भांडवल, लष्करी व शस्त्रास्त्र उद्योग, वैद्यक व औषधे-रसायने उद्योग, कृषी, वाहन, तेल-ऊर्जा व पायाभूत क्षेत्रातील बलाढ्य कंपन्या, खाण व जंगल उद्योग, तंत्रज्ञान व माध्यम कंपन्या, वित्त-व्यापार-विकास संस्था आणि देशोदेशीच्या नोकरशाह्या यांच्या माध्यमातून कार्यरत आहे. ही शक्ती आज सर्व क्षेत्रात व राजकारणात निर्णायक बनली आहे. थोडे शास्त्रीय भाषेत व अधिक नेमके बोलायचे तर जागतिक पातळीवर आज 'मक्तेदारी भांडवलाची सर्वाधिकारशाही' प्रस्थापित करण्याचे हे प्रयत्न आहेत. जगातील आणि आपल्या देशातील अत्यंत अल्पसंख्य पण शक्तिशाली गटांकडून आज सर्व सत्ता राबवली जात आहे. त्यासाठी जनतेमधून काही एक आधार मिळावा म्हणून हे गट सर्व माध्यमांमधून क्रियाशील आहेत. त्यासाठी उजव्या विचारांचा आधार ते घेत आहेत. या केंद्रीकरणाच्या परिणामी संसाधने आणि उत्पन्न यांचे वाटप आणखी विषम होत आहे. काही प्रमाणात सन २००० पासून व खास करून २००८ च्या वित्तीय महाअरिष्टापासून आणि आता कोविड महामारीचे निमित्त करून रोजगार मोठ्या प्रमाणावर घटवला जात आहे. तसेच वेतन आणि पगार यांमध्ये मोठी कपात केली जात आहे. परिणामी लोकांची खरेदीशक्ती सतत उतरत असून बाजारपेठेत मागणी घटत आहे आणि लोकांचे राहणीमान खालावत आहे. याच्या परिणामी विविध जुने-नवे संघर्ष अधिक तीव्र होत आहेत, तणाव आणि तंटे वाढत आहेत. वर्तमान संकट गंभीर बनले आहे.

आहे.

प्रस्थापित व्यवस्थेचे 'व्यवहारवादी' प्रवक्ते परिवर्तनवादी विरोधकांवर जे जे आरोप करतात ते खरेतर स्वत: या व्यवस्थेबाबतच खरे आहेत. उदा. संकुचित अस्मितावाद जोपासण्याचे व उचलून धरण्याचे काम हे जणू काही जातीचे-भाषेचे-सामाजिक न्यायाचे प्रश्न उपस्थित करणारे प्रवाह करत असतात, असे प्रस्थापित विचारवंत सतत भासवत राहातात. पण प्रत्यक्षात सामाजिक-राजकीय संकुचिततेला उचलून धरण्याचे काम वर्ण-जात-वंश-पुरूष वर्चस्ववाद आणि भांडवली 'उदारमतवादी' स्पर्धा हेच सतत करत आले आहेत. तसेच भांडवली विचारवंत मार्क्स विचारावर नेहमीच 'आर्थिक नियतीवादा'चा आरोप करतात. पण खरेतर उलट आहे. 'आर्थिक नियतीवाद' ही भांडवल व्यवस्थेची खासियत आहे. भांडवलाचे अर्थवादी गतिशास्त्र हे जणू 'नैसर्गिक' आहे असे म्हणून ते 'शास्त्र' म्हणून संपूर्ण मानवजातीवर आणि निसर्गावर आज लादले गेले आहे. मार्क्सपासून आजवर या व्यवस्थेचे हे केंद्रीय वैशिष्ट्य पुन:पुन्हा स्पष्ट केले गेले आहे. ते विद्यमान पर्वात ते अगदी उघडेवागडे समोर दिसते आहे. ही अशास्त्रीय गृहीतके आणि हे विध्वंसक गतिशास्त्र आजच्या सर्वग्रासी अरिष्टाच्या आणि सार्वत्रिक अध:पतनाच्या बुडाशी आहेत, हे कसे नाकारता येईल?

**समस्यांची मुळे तपासणे अनिवार्य**

धार्मिक जमातवाद, जातीयवाद, संकुचित-आक्रमक राष्ट्रवाद, नवफासिवाद हे या पर्वात का उभे झाले आहेत? तर असे भासवले जाते, की ते जणू आधुनिकता आणि उदारमतवाद यांच्या विरोधात असलेल्या केवळ 'परंपरावादी' राजकीय प्रवाहांचे कृत्य आहे. या समस्येला उजव्यांबरोबरच जणू डावेही जबाबदार आहेत, असेही भासवले जाते. जणू सत्ताधारी वर्ग हे आधुनिक आणि सकारात्मक अर्थी उदारमतवादी आहेत. ते जणू सर्व आधुनिक मानवी मूल्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत, असे आभास निर्माण केले जातात. असे करण्यातून प्रस्थापित व्यवस्थेचे उदारमतवादी प्रवक्ते हे स्वत:ला धार्मिक जमातवाद, जातीयवाद, संकुचित-आक्रमक राष्ट्रवाद, नवफासिवाद यापासून नेहमीच नामानिराळे ठेवू पाहतात. प्रत्यक्षात हे 'उजवे' प्रकार आणि प्रवाह यांच्या उदयात आणि ते फोफावण्यात या उदारमतवाद्यांच्या एका मोठ्या विभागाचा मोठा वाटा राहात आला आहे.

याचा थेट संबंध या वर्गांचे सत्तासंबंध आणि आर्थिक हितसंबंध यांच्याशी आहे. भारतातील ग्रामीण-शहरी व्यापारी-जमीनदार-व्यावसायिक वर्गच नव्हे, तर अगदी उच्चशिक्षित-परदेशस्थ उच्च-मध्यमवर्गाचा बहुतांश विभाग आणि औद्योगिक-कार्पोरेटवर्ग तसेच नोकरशाही व शासनयंत्रणा हे सारे या प्रतिगामी राजकारणात गुंतलेले आहेत. या सर्वांचे गाभ्याचे गतिशास्त्र हे भांडवली आहे आणि त्याचवेळी ते अगदी आतपर्यंत जात-जमात-लिंगभाव उतरंडी, विभागण्या आणि मूल्ये यांनीही लडबडलेले आहेत. धार्मिक जमातवाद, जातीयवाद, संकुचित-आक्रमक राष्ट्रवाद, नवफासिवाद हे सारे त्यांच्या जाणिवेचा, हितसंबंधांचा आणि अस्तित्वाचा स्वाभाविक भाग आहेत आणि ते वर्तमान व्यवस्थेतील त्यांच्या'आधुनिक' राजकारणाचीच खास निर्मिती आहेत. हे प्रवाह उदारमतवादी राजकीय चौकटीचाच वापर करतात हे उघडच आहे. पण ते केवळ वापर करतात असे नव्हे, तर ही सारी उदारमतवादाच्या अनेक अपत्यांपैकी आहेत. या समस्यांचे पितृत्व कोणाही पुरोगामी प्रवाहांकडे नाही. उलट, या उजव्या, जातिवादी, पुरूषसत्तावादी, नवफासिवादी प्रवाहांविरुध्द खऱ्या अर्थी लढतात ते प्रगतिशील व डावे प्रवाहच. प्रस्थापित मंडळी हे वास्तव जाणूनबुजून पुन:पुन्हा नाकारतात. अशा परिस्थितीत या समस्यांची आधुनिक व उदारमतवादी मुळे तपासणे हे आता अपरिहार्य होऊन बसले आहे.

आजही जगात आणि भारतात हे 'उजवे वळण' घडवण्यामध्ये कोरोना, नवफासिवाद आणि कार्पोरेट भांडवल यांची दहशत आणि या साऱ्याला वैचारिक वैधता व राजकीय चौकट पुरवणाऱ्या उदारमतवादाची नकारात्मक बाजू हे मोठी भूमिका बजावत आहेत. त्यांच्यात निश्चित असे आंतरिक संबंध आहेत आणि ते एकाधिकारशाही पोसणारे आहेत. ते उघडे पाडण्याचे प्रयत्न हे परिवर्तनवादी प्रवाहांकडून अधिक प्रभावीपणे व्हायला हवे आहेत. अन्यथा आज 'आम्ही जे जे करतो आहोत, तेच व्यवहार्य व उचित आहे' हा प्रस्थापितांचा दावा आणखी काही काळ आपले वर्चस्व टिकवून धरेल.

हे सर्व कथित 'व्यवहारी' वा 'व्यवहार्य' मार्ग वा उपाय हे दीर्घ टप्प्यात नुसतेच अव्यवहारी ठरले आहेत असे नव्हे, तर त्यातील बरेचसे विध्वंसक ठरले आहेत. मानवी मनोभंग आणि हरपलेपणापासून महायुध्दांपर्यंत आणि वाढत्या आत्महत्यांपासून ते पाळत ठेवणाऱ्यांत (सर्वेलन्स) राज्यसंस्थेपर्यंत असंख्य आधुनिक 'देणग्या' आपल्याला या व्यवहारावादानेच दिल्या आहेत. या कथित व्यवहारी उपायांनी आता अखिल मानवजातीचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. हे अलीकडचे जागतिकीकरण आणि कोविडचे राजकारण याबद्दल फक्त खरे आहे असे नाही. या काळात तर हे घडले आहेच, पण पहिल्या महायुध्दापासूनच्या गेल्या शतकभराला अगदी स्पष्टपणे आणि खरेतर एका अर्थी आधुनिक-भांडवली युगालाही काही प्रमाणात हे लागू आहे. हे फक्त युध्दे, हत्याकांडे, दंगली आणि हिंसाचार यापुरतेच खरे आहे, असे नाही. तर जो सर्वात मोठा आणि चिंताजनक आहे, असा अमेरिकेपासून भारतापर्यंतच्या राज्यसंस्थांचा स्वत:चा दहशतवाद आणि त्यांनी प्रायोजित केलेला व त्यांच्या 'विरोधा'त जन्माला घातला गेलेला दहशतवाद असा सर्व दहशतवादही यात येतो.

शिवाय पूर-दुष्काळ, हवामानबदल-जागतिक तापमानवाढ, कोरोनासह भयावह रोगसाथी आणि एकंदर पर्यावरणीय अरिष्ट हे सारे जणू 'नैसर्गिक' असल्यासारखे भासवले जाते आहे. त्यातील मानवी घटकांची आणि विशिष्ट हितसंबंधी-सत्ताधारी वर्गांची चिकित्सा सुरू केल्यास 'पुरे करा तुमचे कटकारस्थानवादी सिध्दांत' अशी त्याची खिल्लीही उडवली जाते आहे. विशेषत: आधुनिक जगात सत्ताधारी गट आणि संस्था, कंपन्या आणि यंत्रणा या जाणीवपूर्वक आणि योजनाबद्ध रितीने राजकारण-अर्थकारण करत असतात हे यात नजरेआड केले जाते. संकुचित व तात्कालिक लाभाची दृष्टी ठेवून ते समाजव्यवहारात-एका अर्थी इतिहासात-हस्तक्षेप करत असतात याचे भान यामध्ये ठेवले जात नसते. आज प्रत्यक्षात हा मुद्दा

मानवी अस्तित्वाचा प्रश्न म्हणूनही अतिशय महत्त्वाचा बनला आहे. तो विकास आणि प्रगती यांच्या विशिष्ट स्वरूपाबाबतही तितकाच लागू आहे. प्रचलित राजकारण आणि सामाजिक क्षेत्र तसेच आजची सांस्कृतिक-नैतिक आणि वैचारिक स्थितीशीलता हीच कोंडी दर्शवते आहे.

**अस्थिर स्थितीशीलता आणि विचारसरणींची कोंडी**

वर्तमान कालखंड हा एका अर्थी अनिश्चित कोंडीचा व अस्थिर स्थितीशीलतेचा आहे. एक प्रकारे हा 'संधीकाल' (interregnum) म्हणावा असा कालखंड आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वैचारिक जगाने 'विचारप्रणालीचा अंत'पासून ते विविध 'उत्तर'-प्रणालींपर्यंत साऱ्यांचे 'दर्शन' घेतले. जगाने सर्जनशील-क्रांतिकारी मार्क्सवादाचे दर्शन घेतले तसेच अगदी यांत्रिक मार्क्सवादाचे आणि 'उत्तर-मार्क्सवादा'चेही ('Post-Marxism'!) 'निम्नजन'वाद (sub-alternism), वसाहतोत्तरवाद, स्त्रीवाद, पर्यावरणवाद हेही या काळात पुढे आले. त्यातील काहींना, तसेच आपल्या येथे गांधी-आंबेडकरी विचारांना या'उत्तर'-विचारप्रणालींशी जोडूनही बघितले गेले. या साऱ्या मंथनातून आणि चिंतनातून बरेच नवे हाताला लागले. नवी अंतर्दृष्टी, नव्या विश्लेषणपध्दती आणि नव्या समस्या असे बरेच काही नवे! पण वर्तमान कोंडी फोडण्याच्या आणि'नवे जग शक्य आहे' ही घोषणा साकारण्याच्या दिशेने घसघशीत असे हाताला फारसे लागलेले आढळत नाही. म्हणून जुन्या-नव्या सर्व परिवर्तनवादी-क्रांतिकारी विचारप्रणालींनी स्वत:कडे फेरनजर टाकण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

प्रचलित समाजविज्ञान आणि एकंदर विज्ञानविचार, तसेच विचारसरणी आणि मानवमुक्तीविचार याबाबतची अवरुध्दता आणि कोंडी हीदेखील याचीच निदर्शक आहे. ही कोंडी कशातून उद्‌भवली आहे? हे अरिष्ट केवळ एखाद्या विचारसरणीचे आहे, की सर्वच विचारसरणींचे? हे अरिष्ट 'विचारसरणी' या प्रकाराचेच आहे का म्हणजे ते 'विचारसरणींचा अंत' असे आहे का? मानवी-सामाजिक जीवनात जाणिवेची विविध रूपे आणि त्यांच्या सर्व प्रकारच्या कल्पनांच्या व्यवस्था निर्माण होत राहाणे आणि त्या अस्तित्वात असणे हे अटळ आहे. समाजात जोवर उतरंड व विषमता यावर आधारित विविध हितसंबंधी गट आहेत, तोवर त्यांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध विचारसरणी अस्तित्वात असणे हेही अपरिहार्य आहे. मग आज विचारसरणींबाबत जी कोंडी आहे ती काय आहे? तर एकीकडे पृष्ठभागीय वास्तवालाच 'सत्य' मानणाऱ्या अयांत्रिक, द्वैती, एकांगी, खंडित व अमूर्त अशा आधुनिकवादी-भांडवली विचारसरणींची ती कोंडी आहे. दुसरीकडे, ती अशा स्वरूपाच्या यांत्रिक वा पठडीबध्द परिवर्तनवादी विचारसरणींचीही कोंडी आहे. याबाबतही कोणा एका विचारसरणीची मक्तेदारी नाही हे इथे आवर्जून नोंदवले पाहिजे! ही कोंडी आपल्याला स्पष्टपणे सांगते आहे, की परिवर्तनवादी-क्रांतिकारी विचारसरणींची-विशेषत: त्यांच्या यांत्रिक आवृत्त्यांची-चिकित्सक तपासणी करण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर-सर्वप्रथम विसाव्या शतकातील 'समाजवादा'बद्दलही पुरेसे टीकात्मक राहिले पाहिजे हे ओघानेच आले. पण फक्त तेवढेच पुरेसे नाही. कारण तो कोसळल्यानंतर कोणत्याही टप्प्यावर कोणताही अतिप्रगत-श्रीमंत आणि 'लोकशाही' देश अगदी साध्या-छोट्या 'समाजवादी' देशाच्या जवळपास जाण्यासारखी सार्वत्रिक कल्याणकारी व्यवस्था आणि सर्वांना किमान सुरक्षितता का देऊ शकला नाही, या मौलिक प्रश्नाला उत्तर आहे काय? मार्क्सवादाचे एकवेळ राहू द्या, पण त्याला पाण्यात पाहणाऱ्या वा त्यावर मैत्रीपूर्ण बरीवाईट टीका करणाऱ्या वा तो संपला आहे असे म्हणणाऱ्या कोणत्याही परिवर्तनवादी विचारसरणीला-अगदी 'उत्तर' विचारप्रणालींनादेखील-स्वत:ला अधिक प्रभावी का बनता आले नाही? त्यांना स्वत:चे सामाजिक-वैचारिक धुरिणत्व का प्रस्थापित करता आले नाही? समाजवाद सोडा, नव्या पर्यायी समतावादी व्यवस्थेच्या दिशेने त्यांना काहीच प्रगती का करता आली नाही? एखादे प्रारूप वा ठोस दृष्टीस्वप्न ते लोकांसमोर का ठेवू शकले नाहीत? प्रस्थापित व्यवस्थेत लोकशाही पोकळ होताना आणि धर्मनिरपेक्षता पोखरली जात असताना ही प्रक्रिया त्यांना का थांबवता आली नाही?

अगदी अत्यंत योग्य मुद्दे वा प्रश्न उपस्थित करणाऱ्या आणि काहीएक नवी दृष्टी पुढे आणणाऱ्या स्त्रीवाद, पर्यावरणवाद, आधुनिकोत्तरवाद वा भारतात फुले-आंबेडकरवाद, लोकशाही समाजवाद यांनादेखील अधिक पुढे का जाता आले नाही? उलट विद्यमान कालखंडात सर्वच प्रस्थापितविरोधी, समतावादी, परिवर्तनवादी आणि क्रांतिकारी विचारसरणी का ढेपाळल्या? प्रचलित डावे पक्ष जाऊ द्या, पण नव-डाव्या वा नव्या सामाजिक चळवळी यादेखील राजकीयदृष्ट्या प्रभावहीन का बनल्या? हे प्रश्न टाळतो म्हणून टाळता येणारे नाहीत! इथे या विविध परिवर्तनवादी विचारसरणींमध्ये आणि राजकीय प्रवाहांमध्ये केवळ दोष शोधणे हा उद्देश नाही. एकीकडे विद्यमान वैचारिक-राजकीय अरिष्ट वा कोंडी ही कशी व किती सार्वत्रिक आहे याकडे लक्ष वेधण्याचा उद्देश आहे. तर दुसरीकडे, सर्वच विचारसरणींनी आपल्यातील यांत्रिकपणा वा पठडीबाजपणा, संकुचितपणा व चाकोरीबध्दता यांचे अंश मागे टाकून स्वत:तील अधिक व्यापक व गतिमान आशय वाढवण्याची गरज आहे, हे समोर ठेवण्याचाही उद्देश आहे.

**आधुनिकोत्तर आणि 'सत्योत्तर': तरीही 'वास्तव' आहेच!**

व्यवहारवादी वातावरणात पहिला बळी जातो तो नैतिकतेचा हे वर म्हटलेच आहे. आता तर वास्तव काय आणि सत्य काय हा मुद्दाच धूसर बनून जात असल्याने नैतिक कसोट्या लावून निर्णय करणे, हे प्रस्थापित व्यवस्थेत व राजकारणात निरर्थक ठरवले जाते आहे. वास्तव काय, सत्य काय आणि नैतिक काय हा सनातन प्रश्न कथित 'सत्योत्तरी' जगात पुन्हा नव्या रूपात उपस्थित झाला आहे. अंतिम आणि गाभाभूत सत्य असे काही असते का, ती सत्याची अमूर्त कल्पना असते का, हे प्रश्न आत्ता आपण बाजूला ठेवू. आता प्रश्न असा आहे, की 'सत्योत्तर' असे काही असू शकते का? हे 'सत्योत्तर' प्रकरण उभे करण्यात कोणते सत्ताकारण, माध्यमे व प्रचाराचे राजकारण आणि सत्याचा अपलाप वा त्याची चलाख हाताळणी करण्याचे संस्कृतीकरण यांची भूमिका आहे का?

**(उत्तरार्ध पुढील अंकात...)**

## राजकीय खो खो ची जय हो

तुम्ही गेलात ते आले
ते गेले तुम्ही आलात
आता तुम्ही जाल आणि ते येतील
अगदी वाजत गाजत

७५ वर्षे झाली हा सुरूच आहे अखंड तुमचा
राजकीय खो खो

तुमच्या या राजकीय खो खो ने
शेवटच्या माणसाला नेमकं काय दिलं?

कधीही पूर्ण न होणारी भाराभर स्वप्नं
आणि राशनचे किडलेले गहू, तांदूळ फक्त
व्वा !
तुमच्या या राजकीय खो खो ची जय हो

**– डी.के. शेख, उस्मानाबाद**



## गझल माझी

माणसाला शोधणारी गझल माझी
श्वापदांना ठेचणारी गझल माझी

वादळाने गाव होते फाटलेले
वादळाला बांधणारी गझल माझी

ते मनूचे राज्य आणू पाहणारे
संविधाना रक्षणारी गझल माझी

नेहरू, गांधी, पटेला वंदनारी
बाटग्यांशी झुंजणारी गझल माझी

भंपकांना दावते जागा तयांची
सत्य सारे सांगणारी गझल माझी

**– भीमराव धुळूबुळू,** मिरज

---

## आपलंच थोडं दुर्लक्ष होतंय

एकावर एक फ्री मिळाली
म्हणून
डोळ्यांत कोंबून कोंबून भरली स्वप्ने
गॅरंटी नसलेली
वॉरंटी संपण्याआधीच
आग लागलेल्या दुकानातून
करासहित रक्कम अदा केलेल्या
खरेदी पावत्या
फडफडताहेत उरात

ओठांवर करता येत नाही
सक्ती काळजाच्या भाषेची
सांकेतिक चिन्हे करतात सांत्वन
आपल्या परीनं
आपल्यालाच करता येत नाही
आतली भळभळ व्हायरल

आभासी शुभेच्छांचं...

उत्तेजक घेतलं की
तात्पुरती तरतरी येते
जगण्याच्या जिद्दीला
टिकावू आधाराचे पार्ट
बनवणारे कारखाने
बंद पडू लागलेत हळूहळू
आपल्यावरच्या आर्थिक मंदीचे
सावट पाहून

पुन्हा पुन्हा वेल्ड मारून
जोडून घेतलेला जिव्हाळा
तुटतो पुन्हा पुन्हा
सगळे नियम सगळ्या अटी
मान्य केल्या तरी
अचानक करार फाडतात
रक्ताची नाती
कसलीच पूर्वकल्पना न देता

ऐपत नसताना
आपण तरी का घेतो
दांडग्या दांडग्या शपथा
हमीभावाची खात्री नसलेल्या
वचनांवरती
वेळीच उतरायला हवी होती
विमा पॉलिसी
पिळून घेतलेलं आयुष्य
फेकून देण्याची कला
व्हायलाच हवी अवगत
असं वारंवार बजावतोय
युज अँड थ्रो वस्तूच्या
विक्रमी विक्रीचा आलेख

आपलंच थोडं दुर्लक्ष होतंय

**– आबासाहेब पाटील**
**मंगसुळी, जि. बेळगाव**

# वाचकांची पत्रे

## अंक वाखाणण्याजोगा

अर्थसंकल्पावर आधारित १६ ते २८ फेब्रुवारीचा अंक खास होता. प्रो. सुखदेव थोरात, गौतम कांबळे, प्रा.डॉ. विनोद मिश्रा आदींचे अर्थसंकल्पावरील लेख वाचनीय होते. थोरात आणि कांबळे यांच्या अभ्यासपूर्ण लेखनीने अर्थसंकल्पाचं केलेलं टीकात्मक विश्लेषण खूप आवडलं. कॉर्पोरेटधार्जिण्या अर्थसंकल्पात गरिबांच्या हिताचा विचार केलेला दिसत नाही, या लेखात नमूद केलेल्या मताशी आम्ही सहमत आहोत.

– **संजय पाटील**, विजय पाटील, पुणे

## डोळे यांचा लेख उत्तमच

'इतना सन्नाटा क्यूं...' या नव्याने सुरू केलेल्या सदरातील जयदेव डोळे यांचा 'थडगी बघ्यांची' हा लेख असंवेदनशील समाजाच्या मानसिकतेवर कोरडे ओढणारा होता. समकालिन राजकारण आणि सामाजिक प्रश्नांवर डोळे यांचं लिखाण समाजाला ताळ्यावर आणणारं असतं. त्यांच्या नवीन सदरातील लेखही छानच आहे.

– **सुवर्णलता गायकवाड**, नांदेड

## एकमेवाद्वितीय गानकोकिळा

जीवंतपणीच दंतकथा बनून गेलेल्या लता मंगेशकर यांच्याविषयी व्यक्तिविशेष सदरात लिहिलेला लेख त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा होता. आम्ही अनेक वृत्तपत्रांमध्ये लताजींवर लेख वाचले; पण द पीपल्स पोस्टमधील लेखात बरीच माहिती नवीन होती. त्यांचं पहिलं आणि शेवटचं गाणं तसंच पार्श्वगायकांसाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल या लेखात घेतली गेली. लेख उत्कृष्ट होता.

– **संजय वाघमारे**, नागपूर

## लता मंगेशकरांवरील लेख उत्तमच

गानकोकिळा लता मंगेशकर यांच्यावरील व्यक्तिविशेष सदरात लिहिलेला लेख उत्कृष्टच होता. गायिका, संगीतकार, चित्रपट निर्मात्या म्हणून त्या सदैव स्मरणात राहणार आहेत. लेखाबद्दल अभिनंदन.

– **संजय कुलकर्णी**, पुणे

## अर्थसंकल्पावरील लेख आवडले

केंद्रीय अर्थसंकल्पात गोरगरिबांसाठी फार काही तरतूद केलेली नाही. रोजगारनिर्मितीच्याही दृष्टीने अर्थसंकल्पाने सामान्यजनांची घोर निराशा केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर १६ ते २८ फेब्रुवारीच्या अंकातील अर्थसंकल्पावरील लेख सरकारच्या कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणावर ताशेरे ओढणारे होते.

– **सुधाकर रायवाल**, पुणे

## नवीन सदरांचे स्वागत

१६ ते २८ फेब्रुवारीच्या अंकापासून सुरू करण्यात आलेली 'इतना सन्नाटा क्यूं...' (जयदेव डोळे) आणि 'माहिती, ज्ञान आणि मनोरंजन' (प्रा.डॉ. सूर्यनारायण रणसुभे) ही दोन नवी सदरे नवीन माहिती देणारी आहेत. सामाजिक असंवेदनशीलतेवर टीकास्त्र सोडणारं जयदेव डोळे यांचं 'इतना सन्नाटा क्यूं...' हे सदर बेजबाबदार प्रवृत्तींना खबरदार करणारं आहे. प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांच्या सदरातून तर नवीन माहिती मिळते आहे. दोन्ही लेखकांचे अभिनंदन.

– **सुहास बारगजे**, मुंबई

## जयदेव डोळेंची लेखनी धारदार

ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ जयदेव डोळे वास्तवाला भिडणारे लेखक आहेत. द पीपल्स पोस्टमध्ये प्रसिद्ध होणारे त्यांचे लेख वाचकांना अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारे असतात. इतना सन्नाटा क्यूं... या सदरातील त्यांचं लिखाणही मनाला भिडणारं आहे.

– **शंकर मानवतकर**, कोल्हापूर

## अर्थसंकल्पाचं वर्णन योग्यच

द पीपल्स पोस्टच्या कव्हरवर वरून उघडा, खालून नागडा असं अर्थसंकल्पाचं जे वर्णन करण्यात आलंय, ते अगदी स्तुत्य आहे. लोकांच्या हितासाठी आम्ही खूप काही करतोय असं दाखवायचं आणि प्रत्यक्षात लोकांची फसवणूक करायची, हे मोदी सरकारचं धोरणच आहे की काय, अशी शंका येते. अलीकडेच सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प याचे उत्तम उदाहरण ठरावे.

– **सारंग नागपूरकर**, ठाणे

## सरकारच्या धोरणाची चिरफाड करणारे लेख

१६ ते २८ फेब्रुवारीच्या अंकात केंद्रीय अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने चार लेख प्रसिद्ध झाले आहेत. हे चारही लेख केंद्र सरकारच्या धोरणाची चिरफाड करणारे होते. गोरगरिबांसाठी निराशादायक असलेला हा अर्थसंकल्प म्हणजे केंद्राचा छुपा अजेंडाच आहे की काय, अशी शंका येते.

– **मालू सुर्वे**, कल्याण

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460







With Best
Compliments
Form



AJIT CONSTRUCTION